
CMYK
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, १७ जुलै २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २४८ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपल्या भोवतालच्या सामाजिक जीवनात उपयोगी असणाऱ्या कार्यांना यथाशक्ती मदत करण्याची तसेच समाजहितास हानिकारक कार्यांना दूर करण्याच्या कामात पुढाकार घेण्याची सामाजिक प्रवृत्ती स्वयंसेवकांची असली पाहिजे.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान धनधान्य कृषी योजना

- केंद्रीय मंत्रिमंडळाचा धोरणात्मक निर्णय
- देशातील १०० जिल्ह्यांत योजना राबवणार
- १ कोटी ७० लाख शेतकऱ्यांना मिळणार फायदा
- २४ हजार कोटी रुपये दरवर्षी खर्च करणार

**नवी दिल्ली, १६ जुलै**

देशातील छोट्या आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना दिलासा देत केंद्र सरकारने आज महत्त्वाकांक्षी अशा पंतप्रधान धनधान्य कृषी योजनेला मंजुरी दिली. देशातील १ कोटी ७० लाख शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा मिळणार आहे. एकूण १०० जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविली जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयासह आणखी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. नंतर माहिती आणि प्रसारण तसेच रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी एका पत्रपरिषदेत या निर्णयांची माहिती दिली.



### ३६ योजना एकाच छत्राखाली

११ मंत्रालयाच्या वेगवेगळ्या ३६ योजनांचा समावेश करीत पंतप्रधान धनधान्य कृषी योजना तयार करण्यात आली, याकडे लक्ष वेधत वैष्णव म्हणाले की, यावर्षापासून पुढील सहा वर्षांसाठी ही योजना देशात राबविली जाणार आहे. प्रत्येक राज्यातील किमान एक जिल्हा या योजनेत समाविष्ट करण्यात आला आहे. या योजनेवर दरवर्षी २४ हजार कोटी खर्च केले जाणार आहेत.

शेतीतून होणारे उत्पन्न सरासरीपेक्षा कमी असलेल्या देशातील १०० जिल्ह्यात पंतप्रधान धनधान्य कृषी योजना राबविली जाणार आहे, असे स्पष्ट करत वैष्णव म्हणाले की, छोट्या अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या व्यापक कल्याणासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानासह उत्कृष्ट बी-बियाणे, मोफत खत तसेच सिंचनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. देशातील १ कोटी ७० लाख शेतकऱ्यांना या योजनेचा थेट लाभ मिळणार आहे. विशेष म्हणजे महिला शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळेल, याला प्राधान्य दिले जाणार आहे.

**कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी योजना**

नीती आयोगाच्या आकांक्षी जिल्हा कार्यक्रमापासून प्रेरणा घेत कृषी आणि संबंधित क्षेत्राच्या विकासावर लक्ष केंद्रित करणारी ही देशातील पहिली योजना आहे, असे स्पष्ट करत वैष्णव म्हणाले की, कृषी उत्पादनात वाढ करण्यासोबत पंचायत आणि प्रखंड स्तरावर साठवण क्षमता वाढवणारी आणि मजबूत करणारी ही योजना आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती.

*(तभा वृत्तसेवा)*

# चीनचा अंतराळातही कावेबाजपणा

## जगाला अंधारात ठेवून ॲक्टिव्ह केला उपग्रह

**बीजिंग, १६ जुलै**

चीन हा पळवापळवी आणि लपवाछपवी करणारा देश म्हणून कुप्रसिद्ध आहे. सीमेवर, समुद्रात कावेबाज हालचालींसाठी असलेल्या चीनने अवकाशात सोडलेला उपग्रह तब्बल सहा दिवस जगापासून लपवून ठेवला. अखेर अमेरिकेला त्याचा माग मिळाल्याने चीनच्या अंतराळ मोहिमेतील गुढ पाऊल जगासाठी चिंतेचा विषय ठरला



आहे. ३ जुलै २०२५ रोजी चीनने शियान-२८बी ०१ नावाचा एक रहस्यमय उपग्रह झिचांग सॅटेलाईट सेंटरवरून सोडला.

वास्तविक पाहता अवकाशात प्रक्षेपित केल्यानंतर साधारणतः २४ ते ४८ तासांमध्ये उपग्रहाची माहिती मिळते. या उपग्रहाचे सिंग्नल मात्र, तब्बल सहा दिवस कोणत्याही देशाला मिळाले नव्हते. १४४ तासांपर्यंत या उपग्रहाने कोणतेही सिंग्नल दिले नव्हते. अखेर ९ जुलै रोजी यूएस स्पेस फोर्सच्या स्पेस डोमेन अवेरनेस युनिटने चीनच्या उपग्रहाचा शोध घेतला. शियान उपग्रह मालिका अंतराळ अभ्यासासाठी उपयोगात आणली जात असल्याचा दावा चीन करीत असला तरी उपग्रह लष्करी प्रायोगिक हेतुसाठी वापरले जात असावेत, अशी शंका उपस्थित केली जात आहे.

## महत्त्वाचे

### निमिषा प्रियाला फाशीच देण्याची मागणी

**नवी दिल्ली** : केरळमधील ३६ वर्षीय नर्स निमिषा प्रियाला माफी न देता फाशीचीच शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी मृतकाचा भाऊ अब्दुल फतेहने केली आहे. तसेच नुकसान भरपाई स्वीकारण्यासही नकार दिला आहे. अब्दुलचा भाऊ तलालचा खून केल्याचा आरोप प्रियावर असून ही घटना २०१७ मध्ये घडली होती. याप्रकरणी न्यायालयाने मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली आहे. दरम्यान गेल्या दोन दिवसांपासून प्रियाची फाशी टळल्याच्या बातम्या सुरू होत्या. पण, अब्दुलने नुकसान भरपाई स्वीकारण्यास नकार दिला आहे. मृतकाच्या नातेवाईकांनी माफ केले तरच गुन्हेगाराची शिक्षा रद्द केली जाऊ शकते, अशी तरतूद येमेनसह अनेक मुस्लिम देशांमध्ये आहे.

### राष्ट्र सेविका समितीची आजपासून अ.भा. प्रतिनिधी सभा

**नागपूर** : राष्ट्र सेविका समितीची अ.भा. प्रतिनिधी सभा रेशीमबागेतील स्मृती मंदिर परिसरात १७ ते २० जुलै दरम्यान होणार आहे. या बैठकीस ३८ प्रांतातून सुमारे ६०० प्रतिनिधी येणार आहेत, अशी माहिती समितीच्या प्रमुख कार्यवाहिका सीता गायत्री यांनी आज दिली. या बैठकीत ग्रीष्मकालीन प्रशिक्षण वर्गांची समीक्षा तसेच कार्य विस्तार करताना येणाऱ्या अनुभवांचे आदान प्रदान होईल. रा.स्व. संघाच्या शतकपूर्ती समारंभानिमित्त आयोजित विभिन्न कार्यक्रम, उपक्रमांमध्ये समितीचा संपूर्ण सहभाग राहील. 'ऑपरेशन सिंदूर'साठी शासनाचे अभिनंदन करणारे पत्र प्रतिनिधींकडून दिले जाईल. त्याचप्रमाणे युवा वर्गातील वाढत्या व्यसनाधीनतेच्या संदर्भात प्रस्ताव मांडण्यात येणार आहे.

# झुडपी जंगल, जमीन क्षेत्रात वास्तव्य असलेला कुणीही बेघर होणार नाही

## महसूल मंत्री बावनकुळे यांची विधानसभेत ग्वाही

**मुंबई, १६ जुलै**

सर्वोच्च न्यायालयाने २२ मे २०२५ रोजी आदेश पारित करून विदर्भातील झुडपी जंगल जमीन वन क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे पूर्ण पालन करीत झुडपी जंगल क्षेत्रावर घर असलेल्या नागरिकांना शासन बेघर होऊ देणार नाही, अशी ग्वाही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.



विदर्भातील सहा जिल्ह्यातील कुठलेही शासकीय प्रकल्प, घरकुलं किंवा कुठल्याही विकासात्मक बाबींसाठी झुडपी जंगलं अडसर ठरत असल्याबाबतीची लक्षवेधी सूचना विधानसभा सदस्य नाना पटोले यांनी उपस्थित केली होती. २७५६० हेक्टरवर अतिक्रमण : झुडपी जंगल क्षेत्र ९२ हजार ११५ हेक्टर आहे. यामध्ये अतिक्रमण असलेले २७ हजार ५६० हेक्टर, वनेतर वापर २६ हजार ६७२ हेक्टर क्षेत्रावर आहे.

यामध्ये वनीकरण अयोग्य असलेली जमीन ८६ हजार हेक्टर आहे. तसेच वन व महसूल विभागाच्या नावाने असलेले ३२ हजार हेक्टर संरक्षित क्षेत्र आहे. झुडपी असलेले ३ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र संरक्षित वने घोषित करण्यात आले आहे. हे क्षेत्र वापरता येतील, या जमिनीचे हस्तांतरण करण्याची गरज नाही, असेही महसूल मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

### सिंगापूर आशियातील सर्वांत महागडे शहर

नवी दिल्ली : स्विस बँकेच्या ज्युलियस बेअरच्या नवीन रँकिंग मध्ये सिंगापूर सर्वात महागडे शहर म्हणून अव्वल ठरले आहे. लंडन आणि हाँगकाँगला मागे टाकत सिंगापूर सलग तिसऱ्या वर्षी अव्वल ठरले आहे.

लोकमान्य टिळकांचे पणतू

### दीपक टिळक यांचे निधन

**पुणे, १६ जुलै**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे पणतू आणि केसरी वृत्तपत्राचे विश्वस्त संपादक दीपक टिळक यांचे बुधवारी पहाटे येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले, अशी माहिती कौटुंबिक सूत्रांनी दिली. ते ७८ वर्षांचे होते. वार्धक्याशी निगडित आजारां मुळे त्यांचे निधन झाल्याचे सांगण्यात आले. टिळक यांच्या मागे मुलगा- मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. अन्त्यदर्शनासाठी त्यांचे पार्थिव बुधवारी ऐतिहासिक टिळकवाडा येथे सकाळी आठ ते अकरा वाजेपर्यंत ठेवण्यात आले होते. त्यांच्या पार्थिवावर दुपारी वैकुंठधाम येथे अन्त्यसंस्कार करण्यात आला. काही काळ येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरूही होते.








नवी दिल्ली येथे थिंक टँक सेंटर फॉर जॉईंट वॉरफेअर स्टडीजच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित शस्त्र प्रदर्शनात ड्रोन्सची पाहणी करताना सीडीएस जनरल अनिल चौहान.

# सरसंघचालक डॉ.मोहनजी भागवत निंबाळ येथील आश्रमात दाखल

- आज हुतात्मा स्मृती मंदिरात कार्यक्रम;
- उद्योगवर्धिनी की सेवाव्रती पुस्तकाचे सरसंघचालकांच्या हस्ते प्रकाशन आणि परिवार उत्सव कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जुलै-**

प.पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत नियोजित प्रवासानुसार मंगळवारी सायंकाळी विजयपूर जिल्ह्यातील अध्यात्मिक गुरूदेव रानडे यांच्या निंबाळ येथील आश्रमात दाखल झाले आहेत. दोन दिवसीय वास्तवानंतर गुरुवार, १७ जुलै रोजी त्यांचे सोलापुरात आगमन होणार आहे.उद्योगवर्धिनी संस्थेला २१ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल परिवार उत्सव कार्यक्रमास उपस्थित राहणार असून उद्योगवर्धिनी की सेवाव्रती या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. भागवत यांच्या हस्ते होणार आहे.



सोलापूर : गुरुवारी सकाळी सरसंघचालक मोहन भागवत यांच्यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. त्याप्रसंगी वाहतुकीचा सराव करताना पोलिसांच्या ताफा.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक भारतरत्न स्व. नानाजी देशमुख यांच्या हस्ते २४ वर्षांपूर्वी उद्योगवर्धिनी संस्थेचे नामकरण झाले होते. त्यानंतर तीन वर्षांनी उद्योगवर्धिनी संस्थेची स्थापना झाली. मागील २४ वर्षांत हजारो महिलांनी विविध संकटांवर मात करत समृद्ध आणि स्वाभिमानी आयुष्याचा प्रवास उद्योगवर्धिनी सोबत केला आहे. उद्योगवर्धिनीच्या माध्यमातून शेकडो महिलांना शिलाई, खाद्य पदार्थ, स्वयंपाक आदींच्या माध्यमातून रोजगार मिळवून देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनविण्यात उद्योगवर्धिनीला यश आले आहे. यातून शेकडो उद्योजिका घडल्या आहेत, असे उद्योगवर्धिनीच्या संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा चंद्रिका चौहान यांनी सांगितले. सरसंघचालकांचे गुरुवारी सकाळी सोलापुरात आगमन झाल्यानंतर ते उद्योगवर्धिनीच्या कार्यालयास भेट देतील. येथे सेवाव्रती महिलांशी ते संवाद साधणार आहेत. हुतात्मा स्मृती मंदिरात गुरुवारी सकाळी १० वाजता प्रख्यात लेखिका नयनबेन जोशी यांनी लिहिलेल्या आणि ज्येष्ठ पत्रकार अरुण करमरकर संपादित उद्योगवर्धिनी की सेवाव्रती या पुस्तकाचे प्रकाशन व उद्योगवर्धिनीच्या कार्यावर आधारित अखंड यात्रा माहितीपटाचे उद्घाटन सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते होणार आहे. यानिमित्त परिवार उत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

हुतात्मा स्मृती मंदिरातील कार्यक्रम उद्योगवर्धिनीच्या निमंत्रित मान्यवरांसाठी असून त्यांना निमंत्रण प्रवेशिका देण्यात आल्या आहेत, असे उद्योगवर्धिनीच्या सचिवा मेधा राजोपाध्ये यांनी यावेळी सांगितले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### देवदर्शनाला गेल्यानंतर मार्डीत महिलेला मारहाण

**सोलापर, दि. १६ जुलै-**

देवदर्शनासाठी गेल्यानंतर घरगुती कारणातून ६० वर्षाच्या वृध्द महिलेला मारहाण करण्यात आली. ही घटना मंगळवारी दुपारी ४.३० वाजता झाली. त्रिवेणी देविदास काळे (वय ६०, रा. लिंबेवाडी, शहानगर) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. त्रिवेणी या मंगळवारी उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथे यमाई मंदिर येथे देवदर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी दत्ता चंदू काळे व इतर तीन यांनी घरगुती वादातून लोखंडी रॉडने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने सायंकाळी ६.३० वाजता मेघा काळे यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




### वडाळ्यात तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापर, दि. १६ जुलै-**

अज्ञात कारणातून तरुणाने पिकावर फवारणीचे किटकनाशक औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार मंगळवारी रात्री ८ वाजता उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा गाव परिसरात घडला. समाधान सुनील गायकवाड (वय २६, रा. वडाळा ता. उ.सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री आठच्या सुमारास समाधान हा त्याच्या वडाळा गावाच्या परिसरातील शेतात होता. तेथे त्याने अज्ञात कारणातून पिकावर फवारणीचे किटक नाशक प्राशन केले. वडाळा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री ९.३० वाजता मित्र संदिप भोसले याने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### लग्न जमवणाऱ्या मध्यस्थीला लाकडाने मारहाण; वाघोली येथील घटना

**सोलापर, दि. १६ जुलै-**

मुलीचे लग्न जमवून मुलीचे वाटोळे झाले या कारणावरून ६६ वर्षाच्या वृध्दाला लाकूड तसेच दगडाने मारहाण केली. हा प्रकार बुधवारी सकाळी दहा वाजता मोहोळ तालुक्यातील वाघोली येथे घडला. श्रीमंत गणपत दभाडे (वय ६६, रा. वाघोली ता. मोहोळ) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. गौडप्पा विचुरे यांनी श्रीमंत यांना मुलीचे लग्न जमवून मुलीचे वाटोळे केले असे म्हणून बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास लाकडाने आणि दगडाने मारहाण केली. कामती येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून अशोक कोरे याने दुपारी १.५० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### विहीरीतील पाण्यात बुडून कुमठेतील वृध्दाचा मृत्यू

**सोलापर, दि. १६ जुलै-**

दोन दिवसांपूर्वी घरातून शेतात जातो म्हणून जेवणाचा डबा घेऊन बाहेर पडलेल्या व्यक्तीचा परिसरातील विहीरीतील पाण्यात बुडून मृत्यू झाला. हा प्रकार बुधवारी सकाळी ८.१५ वाजता उघडकीस आला. मशाक बाशा नदाफ (वय ६५, रा. कुमठे ता. उ.सोलापूर) असे मृत पावलेल्या वृध्दाचे नाव आहे. मशाक हे १४ रोजी घरातून शेतात जात असल्याचे सांगून जेवणाचा डबा घेऊन घराबाहेर पडले. ते १५ रोजी घरी परतले नाहीत. दरम्यान बुधवार १६ रोजी सकाळी ८.१५ च्या सुमारास कुमठे परिसरातील रेळेकर यांच्या शेतातील विहीरीतील पाण्यावर तरंगताना मशाक आढळून आले. तेथील लोकांच्या मदतीने त्यांना बाहेर काढून हवालदार सांगळे यांनी सकाळी ९.३५ वाजता उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वी मशाक हे मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### कुत्तरवाडी परिसरातील विहीरीत पडून तरुणाचा मृत्यू

**सोलापर, दि. १६ जुलै-**

मजरेवाडी भागातील कुत्तरवाडी भागातील मंदिराजवळ असलेल्या विहीरीत पडून तरुणाचा मृत्यू झाला. हा प्रकार बुधवारी सकाळी ९.१५ च्या सुमारास उघडकीस आला. नागेश धोडिराम मंजोरे (वय ३२, रा. शांती नगर, मजरेवाडी) असे मृत तरुणाचे नाव आहे. कुत्तरवाडी भागातील अंबाबाई मंदिराजवळ विहीर आहे. नागेश हा या विहीरीतील पाण्यात पडल्याचे बुधवारी सकाळी ९.१५ वाजता दिसून आले. ही बाब लक्षात आल्यानंतर नातेवाईकांनी विहीरीतील पाण्यातून बाहेर काढले. त्यानंतर सचिन पवार याने सकाळी १०.१० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मैंदर्गी प्रकरणातील आरोपींना दोन दिवस पोलीस कोठडी

**अक्कलकोट दि.१६ जुलै**

तालुक्यातील मैंदर्गी येथे मंगळवारी १५ जुलै रोजी सकाळी साडेअकरा वा. सुमारास समाजमाध्यमावर छत्रपती शिवाजी महाराज बद्दल आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्याना आज दोन आरोपींना कोर्टात हजर केले असता दोन आरोपींना दोन दिवसाची पोलिस कोठडी देण्यात आला आहे.यातील एक आरोपी सोहेल रुस्तुम हा अद्याप फरार आहे. याबाबत फिर्याद अनिल पाटील (वय ४८ वर्षे) व्यवसाय शेती स.गौरी कट्टा गैंदर्गी यांनी दिली होती. तीन आरोपीवर गुन्हा दाखल झाला असून यातील दोन आरोपी अमन अखिल हवालदार, रुमन शकील हवालदार, रा. मैंदर्गी ता. अक्कलकोट यांना अटक केले होते. त्यांना बुधवारी न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी मिळाल्याची माहिती तपास अधिकारी सपोनि प्रशांत बदे यांनी दिली. यावेळी कडक पोलीस बंदोबस्त होता.



## केंद्रीय पथकाकडून जलजीवन मिशनच्या कामांची पाहणी

- बीबीदारफळ गावाला भेट
- गावस्तरीय पाणी व स्वच्छता समिती बळकट करा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १६ जुलै-**

जिल्ह्यात जलजीवन मिशन च्या कामांना गती देऊन लोकांना योजनेचा लाभ मिळवून द्या. कामांच्या दर्जावर लक्ष ठेऊन पाणी गुणवत्ता सांभाळा. गाव स्तरीय पाणी व स्वच्छता समिती बळकट करा असे आवाहन केंद्रीय शासनाचे पाणी व स्वच्छता सल्लागार शिष्यपाल शेठी यांनी व्यक्त केले. सोलापूर जिल्ह्यात पाहणी दौंयावर आलेले शिष्यपाल शेठी यांनी आज जिल्हा परिषदेला भेट देऊन जिल्ह्यातील जल जीवन मिशन च्या कामांचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी बीबीदारफळ ग्रामपंचायतीस भेट दिली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, उपकार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, उत्तर सोलापूरचे गटविकास अधिकारी राजाराम भोंग जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, सहाय्यक लेखा बापू शेंडगे यांच्यासह उप अभियंता योगीराज बेंबळगी, नाबार्ड चे महेश शिरपूर, पी. एच कुलकर्णी, शाखा अभियंता जयवंत जाधव उपस्थित होते प्रारंभी प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी स्वागत करून जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनच्या कामांची माहिती दिली. निधी अभावी अनेक कामांच्या प्रगतीवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी जलजीवन मिशन च्या कामांची परिपूर्ण माहिती देऊन फोटो सह सादरीकरण केले. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली योजना पुर्णात्वास नेत असल्याचे प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी सांगितले.

बिबीदारफळ ग्रामपंचायत येथे ग्रामस्थांशी संवाद साधला. सरपंच अर्चना ननवरे , उप सरपंच नारायण सर्वगोड उपस्थित होते. गावातील पाण्याची विहीर व पाईपलाईन तसेच पाण्याच्या टाकीची पाहणी केली. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सार्वजनिक शौचालय व वैयक्तिक शौचालयांची पाहणी केली. बीबीदारफळ तलावातून अकोलेकाटी ग्रामपंचायतीस पाणी पुरवठा करणारे योजनेची पाहणी शिष्यपाल शेठी यांनी केली.

#### दीड किलो मीटर पायी चालून पाहणी

केंद्र शासनाचे वॉश सल्लागार शिष्यपाल सेठी यांनी दीड किलोमीटर पायी चालत योजनेची पाहणी केली. ग्रामपंचायत कार्यालयात महिलांकडून पाणी नमुने तपासून घेतले. पाणी पुरवठा योजनेची नळ कनेक्शनची पाहणी केली. पाणी सोडायला सांगून पाण्याचा दाब विचारून घेतला. गावातील पाण्याची गरज ओळखून योजना लवकर पुर्ण करा असे सांगून पाईप, टाकीचे बांधकाम, विहिरींचे बांधकाम पाहिले. विहिरीची पाणी पातळी पाहून सुखावून गेले. दीड किमी अंतर पायी चालत तलावातील विहीर व पाईप लाईनची चारी जेसीबीने खोदून पाहणी केली. या प्रसंगी कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी सर्व कामांची परिपूर्ण माहिती दिली. उप कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांनी इंग्रजी व हिंदीतून सोलापूर जिल्हा दुष्काळी स्थितीमुळे पाण्याचे स्त्रोत वारंवार बदलत असल्याचे निदर्शनास आणून दिले. लोकसंख्या वाढीमुळे पाण्याची मागणी वाढत असल्याचे निदर्शनास आणून दिले. बीआरसी मोनिका दिनकर, आम्रपाली गजघाटे यांनी पाणी व स्वच्छता समितीची माहिती दिली. पाणी गुणवत्तेची माहिती सोनाली कुलकर्णी यांनी दिली.

## श्री विठ्ठल रुक्मिणीची प्रक्षाळपुजा भक्तिभावात







**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१६ जुलै -**

आषाढी एकादशी रविवारी ६ जुलै रोजी संपन्न झाली. दरवर्षी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, चांगला महुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. त्यानुसार दि. २७ जून रोजी श्रींचा पलंग परंपरेनुसार काढण्यात आला होता व श्री विठ्ठलास लोड व श्री रूक्मिणीमातेस तक्या देण्यात आला होता. त्यामुळे काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इत्यादी राजोपचार प्रक्षाळपुजेपर्यंत बंद ठेवून भाविकांना जास्तीत जास्त वेळ दर्शन उपलब्ध करून देण्यात येत होते.

दरम्यान बुधवारी, दि. १६ जुलै मुहूर्तानुसार श्री विठ्ठलाची व श्री रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा अनुक्रमे मंदिर समिती सदस्य श्री भास्करगिरी बाबा व ह.भ.प. प्रकाश जवंजाळ यांच्या हस्ते संपन्न झाली. सदर पुजेच्या सुरवातीला व्यवस्थापक मनोज श्रोत्री व लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते श्रींस पहिले स्नान घालण्यात आले. तसेच श्रीस अलंकार परिधान करण्यात आले. याशिवाय, देवाचा शिणवटा व थकवा घालविण्यासाठी आर्युवेदीक काढा श्रीस नैवेद्य म्हणून रात्री शेजारती वेळी दाखविण्यात येणार आहे. आजपासून श्री विठ्ठलास व श्री रूक्मिणी मातेस पहाटे होणारी काकडा आरती, नित्यपुजा, महानैवेद्य, पोषाख, धुपारती व शेजारती इथेपर्यंतचे सर्व राजोपचार परंपरेनुसार सुरू करण्यात येत आहेत.

या पूजेच्या वेळी मंदिरात सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्या शकुंतलाताई नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखाधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ व पौराहित्य करणारे कर्मचारी उपस्थित होते.

प्रक्षाळपुजे निमित्त वि विठ्ठल रुक्मिणी पारंपारिक सोन्याचे दुर्मिळ आलंकार परिधान करण्यात आले होते. या परिधान करण्यात आलेल्या सोन्याच्या दुर्मिळ अलंकाराचा तपशील पुढील प्रमाणे.

**श्री विठ्ठल -** सोने मुकुट, मोत्याचा तुरा, कौस्तुभ मणी, हिऱ्याचा कंगनजोड, दंडपेट्याजोड, नाम हिऱ्याचा, शिरपेच, मोत्याची कंटी, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, तोडे जोड, तुळशीची माळ, मत्स्य जोड इत्यादी

**श्री रुक्मिणी माता -** सोने मुकुट, वाक्या जोड, तोडेजोड, तांबडी चिंचपेटी, जवं मणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मी हार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी



## प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याप्रकरणी टेंभुर्णीत रास्ता रोको

### सर्व पुरोगामी संघटना एकवटल्या

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१६ जुलै-**

अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांचेवर शाईफेक करून हल्ला केल्याचे निषेधार्थ टेंभुर्णीत १५ जुलै रोजी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्यासमोर संभाजी ब्रिगेडचे वतीने निषेध करून रास्ता रोको करण्यात आला.

यावेळी विविध पक्ष व पुरोगामी विचारांच्या संघटनांचे पदाधिकारी यांनी सरकारने या हल्लेखोरांच्या मुसक्या आवळून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी करीत जवळपास दीड तास रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, शिवाजी पाटील चांदजकर, रावसाहेब देशमुख, औदुंबर देशमुख, मधुकर देशमुख, तुकाराम राऊत महावीर वजाळे, महेंद्र सोनवणे ,विशाल नवगिरे , रणजीत गायकवाड, विठ्ठल मस्के , सुरेश लोंढे , हर्षल बागल यांनी भाषणातून कारवाईची मागणी केली. यावेळी संजय पाटील, दत्तात्रय ढवळे, अमोल जगदाळे, राजू येवले, रामभाऊ वाघमारे, विजय कोकाटे, यशपाल लोंढे, वैभव देशमुख, सुधीर पाटील, आदित्य जाधव, अजित पाटील, समीर जहागिरदार, अजित शेख, राजू तांबोळी, अब्दुल मुलाणी, विशाल नवगिरे, महावीर वजाळे, विलास देशमुख, हनुमंत चव्हाण, विठ्ठल मस्के,सचिन खुळे, राजाराम येवले,गोरख देशमुख , सोमनाथ महाडिक ,राजकुमार धोत्रे, संजय देशमुख, सिध्देश्वर काळभोर, पपेश पाटील ,राहुल टिपाले,प्रशांत सोनवणे, मदनलाल शहा, ऋतुराज काळे उपस्थित होते. पोलीस निरीक्षक नारायण पवार व मंडल अधिकारी सुजीत शेळवणे यांना निवेदन देण्यात आले.

## तहसीलदारांच्या लेखी आश्वासनानंतर अक्कलकोट उबाठाचे आंदोलन स्थगित




**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१६ जुलै-**

३१ जुलै पर्यंत सर्व शेतकऱ्यांची ऊस बिल देण्याचे तसेच इतर सर्व मागण्या संदर्भात संबंधित विभागाशी मीटिंग लावण्याच्या लेखी आश्वासन तहसीलदार विनायक मगर यांनी दिल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ३१ जुलै पर्यंत आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याची माहिती आनंद बुक्कानुरे यांनी दिली.

तहसीलदार अक्कलकोट यांचे अध्यक्षतेखाली दि.१५ जुलै रोजी ऊस बिल थकबाकी विषयीची नवीन तहसील कार्यालय अक्कलकोट येथे बैठकीचे आयोजन केले होते. सदर बैठकिस ऊस उत्पादक शेतकरी व जय हिंद कारखाना यांचे प्रतिनिधी दत्तात्रय तोरणे, गोकुळ कारखाना यांचे प्रतिनिधी श्री. अनिल कस्तुरे उपस्थित होते.अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील गोकुळ शुगर कारखाना, धोत्री जय हिंद शुगर कारखाना आचेगाव, मातोश्री शुगर कारखाना, सिद्धेश्वर साखर कारखाना थकबाकी ठेवलेले ऊस बिल लवकर शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे, अक्कलकोट तालुक्यातील सर्व गावातील तलावांना उजनी पाण्याने जोड देऊन देगाव कालवा एक्सप्रेस पाईपलाईन द्वारे जेऊर जिल्हा परिषद मंगरूळ जिल्हा परिषद नागणसूर जिल्हा परिषद मधील प्रत्येक गावातील प्रत्येक तलावाला पाईपलाईनने जोड देऊन पाणी सोडावे व एकरूप उपसा सिंचन योजनेद्वारे अक्कलकोट मैंदर्गी दुधनी नगरपरिषद तसेच सलगर चपळगाव वागदरी जिल्हा परिषद मधील सर्व गावाला जोड देऊन सर्व गावातील तलाव भरण्यात यावा, अक्कलकोट तालुक्यातील सोलर कंपन्यांनी करोडो झाडांची कत्तल केली आहे त्या संबंधित अधिकाऱ्यासहित कंपन्यावरती गुन्हे दाखल व्हावे नुकसान केलेले झाडाची पुनर लागवड करावी नवीन सोलर कंपनीला परवानगी देऊ नये सध्या कार्यरत असलेल्या सोलर कंपनीमध्ये स्थानिकांना रोजगार द्यावा या प्रमुख मागण्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या महिन्याभरापासून तहसील कार्यालय येथे बोंबाबोंब कडाक्याचा हलगी नाद विविध लोक कला जागरण गोंधळ रास्ता रोको यासारखे अनोखे आंदोलन शिवसेना पदाधिकारी व शेतकऱ्याच्या वतीने करण्यात आले.

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सर्व पदाधिकारी सोपान निकते, महांतेश हत्तुरे, राम जाधव महमूद पठाण मल्लिनाथ अर्वतकल, शांतवीर कळसगोंडा, गुरनिंगप्पा पाटील, नितीन मोरे,संतोष पाटील, सिद्धाराम बिराजदार,धनराज चव्हाण,उमेश साळुंखे अफसर मकानदार, सुनील धर्मसाले, शिवा परीट, शरणू हंदरळ सह शेतकरी शिवसैनिक व पदाधिकारी मोठे संख्येने उपस्थित होते

## धमकावल्या प्रकरणातील खानला सशर्त जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. १६ जुलै**

फसवणूक आणि धमकावल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या सोहेल हजरत खान पटेल (रा. कांदा बाजार, अक्कलकोट, जि. सोलापूर) याला जिल्हा व सत्र न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला आहे.

एम.आय.डी.सी. सोलापूर पोलीस स्टेशनमध्ये त्याच्याविरुद्ध दि. २७ मे २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत फिर्यादी सलीम शमशुद्दीन वळसंगकर (वय ६८, सेवानिवृत्त शिक्षक, रा. रमाकांत कर्णिक नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये असे म्हटले आहे की, आरोपी सोहेल पटेल हा त्यांचा जुना विद्यार्थी होता. जुलै २०२३ मध्ये सोहेलने त्यांच्याशी संपर्क साधला आणि स्वतःला 'अमेझॉन इंटरनॅशनल कंपनी' आणि 'भारत पे नॅशनल कंपनी' मध्ये मोठा गुंतवणूकदार असल्याचे भासवले. त्याने वळसंगकर आणि त्यांच्या पत्नी हसिना यांचा विश्वास संपादन केला.

सोहेलने त्यांना एक आकर्षक गुंतवणूक योजना सांगितली: अडीच लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर दररोज १ हजार रुपये बँक खात्यात मिळतील, ज्यामुळे एका वर्षात ३ लाख ६५ हजार रुपये परत मिळतील, म्हणजेच १ लाख १५ हजार रुपयांचा अतिरिक्त परतावा. या मोठ्या लाभाच्या आमिषाने वळसंगकर कुटुंबीय त्याच्या जाळ्यात अडकले. २१ ऑगस्ट २०२३ ते २५ जानेवारी २०२४ या कालावधीत, सलीम वळसंगकर यांनी सोहेल पटेलला एकूण १२ लाख ५० हजार रुपये दिले. यापैकी ६ लाख ३५ हजार रुपये फोन पे द्वारे तर ६ लाख १५ हजार रुपये रोख स्वरूपात दिले गेले. सोहेलने सलीम वळसंगकर यांच्या नावावर तीन आयडी, त्यांचा मुलगा नाजिम सलीम वळसंगकर याच्या नावावर एक आयडी, आणि सून समरीन नाजिम वळसंगकर हिच्या नावावर एक आयडी असे एकूण ५ आयडी काढून देण्याचे आश्वासन दिले होते. या गुंतवणुकीसंदर्भात कागदपत्रांची मागणी केली असता, उडवाउडवीची उत्तरे देऊन टाळाटाळ केली. सुरुवातीला आरोपीने वळसंगकर यांच्या मुलाच्या आणि सुनेच्या बँक खात्यांमध्ये १ लाख ५५ हजार रुपये जमा केले, परंतु नंतर तीच रक्कम परत आपल्या फोन पे खात्यावर वर्ग करून घेतली. त्यानंतर सोहेल पटेलने केलेल्या गुंतवणुकीचा कोणताही परतावा दिला नाही. वारंवार विचारणा केली असता, सोहेलने उडवाउडवीची उत्तरे दिली आणि अखेरीस 'मला बीपी शुगरचा त्रास आहे, तुम्ही मला परत पैसे मागितले तर मी तुमच्या नावे चिठ्ठी लिहून आत्महत्या करेन' अशी धमकी दिली.सदरप्रकरणात आरोपी सोहेल पटेलला (मे २०२५) अटक झाल्यानंतर आरोपीने मे. जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर येथे जामिनासाठी अर्ज केला होता. या प्रकरणात प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती.कुलकर्णी यांनी आरोपी सोहेल पटेलचा जामीन अर्ज सशर्त मंजूर केला आहे.

वरील प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. कदीर औटी, ॲड. दत्तात्रय कापूरे, ॲड. वैभव बोंगे आणि ॲड.ओंकार फडतरे यांनी काम पाहिले, सरकारतर्फे श्रीमती. बनसोडे यांनी तर फिर्यादीतर्फे ॲड. रियाज शेख यांनी बाजू मांडली.

## राज्यातील शेतकऱ्यांना देशाबाहेर अभ्यास दौरा; राज्य पुरस्कृत योजनेचा लाभ घ्यावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१६ जुलै-**

राज्यातील शेतक-यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय यापुढे न राहता उत्पादीत होणा-या शेतीमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतक-यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीशी निगडीत घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेले बदल, विकसित होत असलेले तंत्रज्ञान हे शेतक-यांपर्यंत त्यांच्या गरजेनुरुप योग्यवेळी पोहचविणे आणि त्यासाठी आवश्यक सहाय्य व सोयीसुविधा पुरविणे निकडीचे आहे.

त्यानुसार सन २०२५-२६ मध्ये राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेरील अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत युरोप- नेदरलँड, जर्मनी, फ्रांस, स्वित्झलँड, इस्त्राईल, जपान, व्हिएतनाम, मलेशिया फिलीपाईन्स, चीन, द. कोरीया, इत्यादी संभाव्य देशाची निवड करण्यात आली आहे. शेतकरी अभ्यास दौ-याकरिता शेतक-यांनी दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत. तसेच अर्ज केलेले शेतकरी बांधव ४ ऑगस्ट रोजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, सोलापूर येथे दुपारी २.०० वाजता उपस्थित रहावे. प्राप्त अर्जातून जिल्हास्तरीय समितीसमोर सोडत काढण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व कृषि बंधु व भगिनींना जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.




# चड्डी बनियान गँग विरोधात विधान भवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१६ जुलै**

महाराष्ट्रात लुटारू आणि दरोडेखोर चड्डी बनियान गँग फिरत असल्याने बुधवारी विधान भवनाच्या पायऱ्यांवर महाविकास आघाडीच्या आमदारांनी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले.

महाराष्ट्रात चड्डी बनियान गँगने हौदास घातला आहे. वेगवेगळ्या कंत्राटाच्या माध्यमातून चड्डी बनियन गँग राज्यात जनतेच्या पैशांवर दरोडे टाकत आहे. सर्वसामान्य माणसाला मारहाण करत चड्डी बनियनवर अंधश्रद्धा पसरवणारे होमहवन केले जात असल्याने असल्याने या गंभीर घटनांचा निषेध करण्यासाठी आंदोलन केले असल्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितले. यावेळी. पन्नास खोके एकदम ओके,.चड्डी बनियन गँग हाय हाय,.महाराष्ट्राला लुटणाऱ्या धिक्कार असो, दरोडेखोर चड्डी बनियान गँगचा धिक्कार असो, अशा जोरदार घोषणाबाजी यावेळी महाविकास आघाडीच्या आमदारांनी दिल्या.

# उद्धवजी, तुम्हाला इकडे येण्याचा स्कोप!

## दानवेच्या निरोपावेळी मुख्यमंत्र्यांची खुली ऑफर

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१६ जुलै**

सत्ताधारी व विरोधकांच्या आरोप - प्रत्यारोप आणि वादग्रस्त वक्तव्यामुळे पावसाळी अधिवेशन गाजत असताना बुधवारमात्र त्याला काहीसा अपवाद ठरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सुसंवाद करीत एकमेकांना हलकेफुलके टोलेही लगाविले. इतकेच नव्हे तर फडणवीस यांनी ठाकरे यांना आपल्याकडे येण्याची चक्क ऑफर दिली.

त्यासाठी निमित्त होते विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निरोप समारंभाची. विधानपरिषदेतील भाषणात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,२०२९ पर्यंत आम्हाला विरोधी पक्षात बसण्याचा स्कोप नाही. तुम्हाला मात्र इकडे येण्याचा स्कोप आहे, अशी खुली ऑफर दिली.त्यापूर्वी विधान भवनाच्या दालनात दोघांच्यात समोरासमोर आल्यानंतर थोडावेळ चर्चा झाली. त्यामुळे त्यांचे हे विधान राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनला. त्याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. अंबादास दानवे यांच्या सदस्यत्वाचा कार्यकाळ संपत असल्याने विधीमंडळच्यावतीने निरोप देण्यात आला. यावेळी चांगलीच राजकीय टोलेबाजी रंगली. मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,





शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची विधान परिषदेत अंबादास दानवे यांना निरोप देताना भाषणांमध्ये चांगली टोलेबाजी रंगली. यावेळी फडणवीस म्हणाले की, उद्धवजी आता २०२९ पर्यंत काही करायचचे नाही. आम्हाला तिकडे यायचा स्कोप उरला नाही. मात्र तुम्हाला इकडे यायचा स्कोप आहे. त्यावर वेगळ्या पद्धतीने विचार करता येईल. आपण वेगळ्या पद्धतीने बोलूया, असे सांगून ते म्हणाले, ''अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपत आला आहे. अनिल परब तुम्ही आता तयारी करा. दानवे वेगवेगळे योग जुळवून आणतात. हिंदुत्ववाची कडवट भूमिका घेणारा कार्यकर्ता म्हणजे दानवे. भोंग्याविरोधात त्यांनी अनेक निवेदनं दिली. ते जरी ते बंटी पाटील यांच्या बाजूला ते बसले असतील तरीही ते सावरकरांचे भक्त असून मूळचे भाजपच्या मुशीत घडलेले कार्यकर्ते आहेत. हिंदुत्ववाची कडवट भूमिका घेणारे आणि कट्टर सावरकरवादी कार्यकर्ते म्हणजे दानवे. पण जागावाटपात




विधानपरिषदेची जागा शिवसेनेला गेली. मग दानवेंना शिवसेनेत जावे लागले.ते आता पुन्हा येतील, अशी आशा करूया, असेही त्यांनी सांगितले.

उद्धव ठाकरे यांनी आबाचा दानवे यांचे जोरदार कौतुक केलं. माझ्याकडे कधीही कोणते पद न मागायला आलेला शिवसैनिक म्हणजे अंबादास दानवे असल्याचे ते म्हणाले. पावसाळा असल्याने कोणी कधी इकडे तिकडे उड्या मारू शकतो असं म्हणत त्यांनी शिवसेना शिंदे गटावरती जोरदार टीका केली. फडणवीसांच्या भाषणाचा संदर्भ घेऊन उद्धव ठाकरे म्हणाले की, ''भाजपच्या आणि संघाच्या मुशीत घडलेला असा अंबादास दानवे हा कार्यकर्ता आम्हाला दिला याबद्दल मी मुख्यमंत्री फडणवीसांचे आभार मानतो. मात्र त्यांनी माझ्याकडून घेतलेल्या नेत्यांबद्दल मुख्यमंत्री माझे आभार मानू शकतील की नाही?,याबद्दल शंका आहे. दानवे त्यांची टर्म पूर्ण करत आहेत. निवृत्त होत आहेत असं म्हणणार नाही. दानवे तुम्ही सुद्धा म्हटलं पाहिजे मी पुन्हा येईन. काहीजण आज कौतुक करत असले तरी आंबादास यांना विरोधी पक्ष मिळते केल्यानंतर तेव्हा यांचे चेहरे कसे झाले माहित होते. ते भाजपच्या तालमीत तयार झालेल्या अंबादास तुम्ही दिल्याबद्दल तुमचे आम्ही आभार मी मानतो. मात्र, तुम्ही माझे नेले त्यामुळे तुम्ही माझे आभार मानणार का? अशी विचारणा त्यांनी यावेळी केली. अंबादास यांनी भरल्या ताटाशी कधीच प्रतारणा केली नाही, असा टोलाही शिंदेना लगावला.

**'शिंदे-ठाकरे' मध्ये शाब्दिक गुद्दे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना अंबादास दानवे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले नाहीत. मात्र त्यांनी चांगले काम केले. गरिबांचे जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न केला आहे, असा उद्धव ठाकरे यांना टोला लगावला.त्याला प्रत्युत्तर देताना ठाकरे म्हणाले, काही लोक म्हणाले की ते सोन्याचा चमचा घेऊन आले नाहीत. मात्र काही लोक असे आहेत जे भरलेल्या ताटातून उधळून गेले आहेत. पद मिळाले नाही म्हणून दुसऱ्याच्या रेस्टॉरंटमध्ये गेले. पण अंबादास यांनी भरल्या ताटाशी कधीच प्रतारणा केली नाही. मृणालताई गोरे या कधीही पदासाठी डगमगल्या नाहीत.

**ठाकरेंचा शिंदेच्या शेजारी बसण्यास नकार :** दानवे यांच्या निरोप समारंभ नंतर विधान भवनाच्या द्वारा समोर परिषदेतील सर्व सदस्यांचे फोटोसेशन करण्यात आले. यावेळी शिंदे यांच्या शेजारी उद्धव ठाकरे यांच्यासाठी खुर्ची ठेवण्यात आली होती.मात्र बसण्यास नकार दिला नीलम गोऱ्हे यांनी विनंती करूनही त्यांनी त्याला नकार दिला.त्यामुळे त्या दोघांच्या मध्ये गोऱ्हे बसल्या. त्याचप्रमाणे फोटोसेशनसाठी येताना त्यांनी शिंदेकडे पाहण्याचे टाळले. तर शिंदे यांनी चष्मा पुसण्याच्या बाहण्याने त्यांच्याकडे पाठ फिरवली.

# शिवसेना शिंदे गट व आनंदराज आंबेडकर सेनेची युती

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१६ जुलै**

सर्वसामान्यांच्या आयुष्यात चांगले दिवस आणण्यासाठी विचार, विश्वास आणि विकास या त्रिसुत्रीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आणि आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन सेना या दोन पक्षांनी युती केली. नरिमन पॉइंट येथील महिला विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत दोन्ही प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत युतीची घोषणा करण्यात आली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकाच्या पाश्वभूमीवर ही



युती करण्यात आली आहे.

यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, आ. दिपक केसरकर, आ. दिलीप लांडे आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शिवसेना आणि रिपब्लिकन सेना या दोन्ही रस्त्यावर अन्यायाविरोधांत लढणाऱ्या सेना आहेत. एक बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा घेऊन चालणारी तर दुसरी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्ताचा वारसा घेऊन चालणारी आहे. संविधान सर्वोच्च असून त्यात सर्वसामान्य घटकाला न्याय मिळाला पाहिजे, तो मुख्य प्रवाहात आला पाहिजे. दोन्ही पक्ष हे कार्यकर्त्यांचे पक्ष आहेत त्यामुळे ही युतीची जोडी जमेल, असे सांगितले. आनंदराज आंबेडकर म्हणाले की, शिवसेना रिपब्लिकन सेनेच्या युतीमुळे राज्यात सामाजिक आणि राजकीय बदल घडून येतील. आंबेडकरी कार्यकर्त्यांना सत्तेत सामावून घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# दानवेंनी भरलेल्या ताटाशी प्रतारणा केली नाही

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंच्या निरोप समारंभात उद्धव ठाकरे यांचा एकनाथ शिंदे यांना टोला

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१६ जुलै**

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आपल्या कारकिर्दीत केव्हाही भरलेल्या ताटाशी प्रतारणा केली नाही, अशा शब्दांत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना टोला हाणला.

अंबादास दानवे यांच्या एक निस्वार्थी शिवसैनिक आहेत. त्यांनी आतापर्यंत कोणत्याही पदाच्या लालसेशिवाय काम केले. कोणत्याही व्यक्तीला जनतेप्रती असणारी निष्ठा त्यांना एक नवी उंची प्रदान करते. दानवे यांनी ही उंची प्राप्त केली आहे. ही उंची ते आपल्या स्वभावानुसार



आणखी वाढवतील, असे ते म्हणाले.

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची टर्म पुढील महिन्यात संपुष्टात येणार आहेत. आज त्यांना सभागृहाने निरोप दिला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी त्यांचे तोंडभरून कौतुक केले. ते म्हणाले, आज आपल्या सभागृहाचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आपल्या पहिल्या कारकिर्दीची टर्म पूर्ण करत आहेत. ही टर्म पूर्ण करताना अंबादास दानवेंनी मी पुन्हा येईन असे म्हणावे. त्याला एक वेगळे महत्त्व आहे. पण त्यांनी आमच्याच पक्षातून यावे. मला अंबादास दानवेंचे कौतुक ऐकताना फार बरे वाटले. कारण, काहीजण असे आहेत की, आज ते त्यांचे कौतुक करत असले तरी, मी त्यांना जेव्हा उमेदवारी दिली होती, तेव्हा त्यांचे चेहरे जरा वेगळे होते. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. तुम्ही भाजप किंवा संघाच्या मुशीत तयार झालेला एक चांगला कार्यकर्ता मला दिला. आत्ता त्यांनी माझे अनेक नेते घेतलेत. त्यामुळे ते मला धन्यवाद देतील की नाही याविषयी शंका आहे.

तुमच्या कल्पकतेचे मुख्यमंत्र्यांनीही कौतुक केले. हा माणूस फार कल्पक आहे. ते साधे शिवसैनिक होते तेव्हापासून मी त्यांच्याकडे पाहतो. ते सतत काही ना काहीतरी करत असतात. अभिनव पद्धतीने करत असतात. मला शिवसेनाप्रमुखांनी ज्या काही गोष्टी मला सांगितल्या, त्यात एक गोष्ट मुद्दाम सांगितली पाहिजे. ते म्हणाले होते, उद्धव मुख्यमंत्री पद हे महत्त्वाचे असतेच, पण विरोधी पक्षनेतेपदही तेवढ्याच तोलामोलाचे किंवा काकणभर जास्त जबाबदारीचे असते. विरोधी पक्षनेता हा आक्रमक असला पाहिजे, पण आक्रस्ताळ असता कामा नये.

### अंबादास दानवे यांचा मला अभिमान वाटतो

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, अंबादास दानवे यांचा मला अभिमान आहे. पदे येतात व जातात. पण शेवटी जनतेच्या मनात आपली प्रतिमा काय म्हणून राहते हे आपल्या आयुष्याचे फलित असतात. अनेकजण पदासाठी धडपडत असतात. ते टिकवण्याचा प्रयत्न करत असतात. म घाशी इथे उल्लेख झाला त्यानुसार अंबादास तुम्ही तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्मला आला नाहीत, पण भरलेल्या ताटाशी प्रतारणाही केली नाहीत. ज्यांनी ताट वाढून दिले त्या पक्षाशी प्रतारणा तुम्ही केली नाही. यासाठी खास तुम्हाला सगळी जनता धन्यवाद देत असेल.

# देशातील १५ टक्के युवा बेरोजगार

**नवी दिल्ली, दि.१६ जुलै**

रोजगारनिर्मितीवर केंद्र आणि प्रत्येक राज्य सरकारचा भर असतो. त्यासाठी दरवर्षीच्या अर्थसंकल्पातही भरघोस तरतूद केली जाते. त्याचा काही अंशी फायदाही होतो.

मात्र, तरी देशात १५ टक्के युवावर्ग बेरोजगारीच्या छायेत आहेत, असे सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीने सिद्ध केले आहे. १५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या युवांबाबत बेरोजगारीचा दर जूनमध्ये ५.६ टक्के होता. यापूर्वीच्या महिन्यांच्या तुलनेत यात कोणताही बदल झालेला नाही. १५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या लोकांचा कामगार सहभागीता दर जूनमध्ये ५४.२ टक्के होता, तर मे महिन्यात हा दर ५४.८ टक्के होता.

# जितेंद्र आव्हाड गोपीचंद पडळकर यांच्यात राडा

**● विधानभवनाच्या गेटवरच एकमेकांना शिवीगाळ; आव्हाडांवर गाडी घालण्याचा प्रयत्न?**



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१६ जुलै**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड व सत्ताधारी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यात आज विधानभवनाच्या गेटवरच जोरदार बाचाबाची झाली. यावेळी आव्हाड यांनी पडळकर यांच्यावर गाडी अंगावर घालण्याचा आरोप केला. यामुळे या घटनेचे गांभिर्य वाढले आहे. विधानभवनाच्या गेटवरच हा प्रकार घडल्यामुळे तिथे मोठी गर्दी जमली होती.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार तथा मुख्य प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी गत आठवड्यात विधिमंडळ परिसरात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे पाहून 'मंगळसूत्र चोरांचा' अशी घोषणाबाजी केली होती. यामुळे पडळकर चांगलेच संतापले होते. या घटनेला ५ दिवस लोटत नाहीत तोच आज विधान भवनाच्या गेटवर या दोन्ही नेत्यांत पुन्हा बाका प्रसंग उद्भवला. उल्लेखनीय बाब म्हणजे भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार व त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांच्यावर अश्लाघ्य शब्दांत टीका केली होती. सासू ख्रिश्चन, नवरा ब्राह्मण, बाप मराठा व आई दुसरीच असे एक कॉकटेल घर पुण्यात आहे, असे ते म्हणाले होते. यावेळी त्यांनी पवार कुटुंबीयांचे नाव घेतले नव्हते. पण त्यांचा रोख त्यांच्याच दिशेने होता. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गत आठवड्यात त्यांच्या जवळून जाताना मंगळसूत्र चोर अशी नारेबाजी करत त्यांच्या टीकेला जशासतसे प्रत्युत्तर दिले. त्याचा वचपा आज गोपीचंद पडळकर यांनी काढल्याची चर्चा विधिमंडळ परिसरात रंगली होती.

### मी एकटाच आहे, कधीही ये : पडळकर

जितेंद्र आव्हाड विधिमंडळ प्रवेशद्वाराच्या जवळून पायी जात होते. त्यावेळी आमदार गोपीचंद पडळकर यांची गाडी थेट त्यांच्या दिशेने आली. यावेळी पडळकर यांच्या गाडीचा दरवाजा आपल्याला लागल्याचा आरोप आव्हाड यांनी केला. त्याचा जाब त्यांनी पडळकरांना विचारला. यावेळी दोन्ही नेत्यांत चांगलेच वाक्युद्ध रंगले. मी एकटाच आहे. कधीही ये. तुझ्यासारखी अशी कुत्री घेऊन मी फिरत नाही, असे पडळकर यावेळी म्हणाले. त्यावर जितेंद्र आव्हाड यांनीही त्यांना त्याच शब्दांत प्रत्युत्तर दिले. मी आयुष्यभर मुंबईत राहिलो. धमकी कुणाला देतो, असे ते म्हणाले.

### माझ्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न – आव्हाड

जितेंद्र आव्हाड यांनी त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना पडळकरांनी माझ्या अंगावर गाडी आणल्याचा आरोप केला. मी मंगळसूत्र चोर म्हणालो होतो. त्याचा राग गोपीचंद पडळकर यांना का यावा? त्यांनी माझ्या अंगावर गाडी का आणली? त्यांनी माझ्या दिशेने गाडी आणली नसती तर हे प्रकरणच घडले नसते, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनीही पडळकर यांच्याविषयी बोलताना अत्यंत शिवराळ भाषेचा वापर केला. हा काय बालिशपणा आहे. त्यांनी दरवाजाला लाथ मारली. त्यानंतर तो दरवाजा मला लागला. अशा छोट्या-मोठ्या गोष्टींकडे कोण लक्ष देते म्हणून मी पुढे आलो. मी आयुष्यभर मुंबईत राहिलो. पण ही कुठली पद्धत आहे? आमच्या अंगावर गाड्या घालायच्या? कोण ऐकूण घेणार? कशाला आमच्या अंगावर गाडी घालायची? व्हिडिओत दिसेलच काय झाले ते. यापूर्वीही असेच झाले होते. जाणिवपूर्वक खोड काढायची. तुम्हाला एवढा राग का येतो? तुम्हाला एवढे वाईट का वाटावे? असेही आव्हाड यावेळी बोलताना म्हणाले.

# वाढवण बंदरामुळे भारताची सागरी महासत्तेकडे वाटचाल

**मुंबई, दि. १६ जुलैः**

वाढवण बंदराच्या उभारणीमुळे महाराष्ट्र आणि भारत सागरी महासत्ता होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत असून, हा प्रकल्प केवळ बंदर नव्हे तर एक आर्थिक क्रांती घडवून आणणारा केंद्रबिंदू ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केले.

राज्य शासनाच्या मत्स्य व्यवसाय व बंदरे विभाग आणि महाराष्ट्र सागरी मंडळाच्या वतीने आयोजित सागरी शिखर परिषद २०२५ चे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे, परिवहन व बंदरे विकास विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, उद्योग विभागाचे सचिव पी अन्बलगन, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी., जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटीचे अध्यक्ष उमेश वाघ आदी उपस्थित होते. भारत मेरीटाइम व्हिजन २०३०' आणि 'अमृतकाल मेरीटाइम व्हिजन २०४७' मध्ये महाराष्ट्राचा सहभाग

केंद्र शासनाच्या मेरीटाइम व्हिजनचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भविष्यात भारत हा जागतिक सप्लाय चेनमधला महत्वाचा भागीदार बनू शकतो. म्हणूनच केंद्र सरकारने 'इंडिया मेरीटाईम व्हिजन २०३०' आणि 'अमृतकाल मेरीटाईम व्हिजन २०४७' तयार केले आहेत. या दोन्ही व्हिजनचा अभ्यास करून, महाराष्ट्रासाठी एक मजबूत मेरीटाईम व्हिजन तयार करण्याचे आपले उद्दिष्ट आहे. या धोरणासाठी आजच्या चर्चासत्रातील सर्व शिफारशी संकलित करून आम्ही त्या अमलात आणू. मुंबई ही आपली आर्थिक, व्यावसायिक, मनोरंजन आणि आर्थिक राजधानी आहे. मुंबईला भारताचे आर्थिक इंजिन बनवणारे मुंबई पोर्ट आणि जेएनपीटी पोर्ट ही बंदरे आहेत. ही दोन बंदरे मुंबईला आघाडीवर घेऊन आली.

# शरद पवार गटाच्या प्रदेश सरचिटणीसपदी रोहित पवार

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१६ जुलै**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नवे प्रदेशाध्यक्ष तथा आ. शशिकांत शिंदे यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर २४ तास पूर्ण होण्यापूर्वीच संघटनेत महत्वपूर्ण बदल केला आहे. पक्षाच्या प्रदेश सरचिटणीसपदी तसेच सर्व फ्रंटल आणि सेलच्या प्रभारीपदी आमदार रोहित पवार यांची नियुक्ती केली आहे.



दरम्यान, शिंदे यांचे प्रदेश कार्यालयात आगमन झाल्यानंतर त्यांचं फटाके फोडत स्वागत करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची काल झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्ष पदावर राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी नियुक्ती केले होते. यावेळी शिंदे बोलताना म्हणाले की , शरद पवार साहेब यांच्या विचाराच्या पक्षाच्या माध्यमातून जयंत पाटील, महासंसदरत्न खासदार सुप्रिया सुळे यांच्या विचारातून जयंत पाटील यांच्या नेतृत्वात जी पक्ष संघटना मजबुतीने चालली पक्ष संघटनेमधील पूर्वीचे पदाधिकारी त्या सर्वांबरोबर विचार करून त्या सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन भविष्य काळामध्ये पुढील वाटचालीचे नियोजन आम्ही करणार आहोत. नवीन काही लोकांना जबाबदारी देण्यात याव्या चळवळीतून हा पक्ष आक्रमकतेपणे उभा राहावा म्हणून जनरल सेक्रेटरी म्हणून रोहित पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नवीन नियुक्त्या झाल्यामुळे यापूर्वीच्या नियुक्त्यांच काय असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला असेल तर तो त्यांनी दूर करावा यापूर्वी असलेल्या कमिट्या सक्षमपणे त्या तशाच राहणार आहे. असे त्यांनी स्पष्ट करून ते म्हणाले,' यावेळी रोहित पवार म्हणाले की , माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला आपण ही मोठी जबाबदारी दिली आहे. शरद पवार साहेब यांच्या विचाराने तुम्ही चाललात.

तुमच्यावर कितीही अडचणी आल्या तरी न घाबरता तुम्ही विचाराबरोबर आणि साहेबा बरोबर तुम्ही राहिलात. जसा मी आणि महाराष्ट्रातील इतर तमाम कार्यकर्ते हे पवार साहेबांबरोबर एक निष्ठेने राहिले आहे. यापुढे देखील अधिक ताकतीने एकत्रितपणे आपण लढू या असा आपल्याला मी विश्वास देतो.

# विश्व हिंदू परिषद प्रबंध समितीची आजपासून आंतरराष्ट्रीयस्तर बैठक

## जळगावात होणार कामांचे चिंतन अन् आगामी कामांची ठरणार दिशा

**तभा वृत्तसेवा,**
**जळगाव, १६ जुलै-**

महाराष्ट्रात पुणे, मुंबई आणि नागपूरपाठोपाठ विश्व हिंदू परिषदेची गुरुवारपासून (१७ जुलै) आंतरराष्ट्रीय बैठक होणार आहे. ही प्रबंध समितीची बैठक असून, २१ जुलैपर्यंत सुरू राहणाऱ्या या बैठकीत सहा महिन्यांत झालेल्या कामांचे चिंतन आणि आगामी काळातील कामांची दिशा ठरविली जाणार आहे.

विविध पाच देशांतील ३१० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती विश्व हिंदू परिषदेचे देवगिरी प्रांतमंत्री योगेश्वर गर्गे यांनी दिली. शहरातील रेल्वेस्थानक मार्गावरील विश्व



हिंदू परिषदेच्या 'अयोध्या' या जिल्हा कार्यालयात बुधवारी (१६ जुलै) दुपारी आंतरराष्ट्रीय बैठकीच्या नियोजनासंदर्भात पत्रकार परिषद घेण्यात आली. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे क्षेत्रमंत्री गोविंद शेंडे, देवगिरी प्रांत सहमंत्री ललित चौधरी, जिल्हाध्यक्ष हरीशभाई मुंदडा आदी उपस्थित होते. विश्व हिंदू परिषदेचे जगभरातील ४० देशांत कार्य सुरू आहे. परिषदेतर्फे महाराष्ट्रात यापूर्वी पुणे, मुंबई व नागपूर येथे आंतरराष्ट्रीय बैठक बोलाविण्यात आल्या होत्या. यंदा देवगिरी प्रांत स्तरावर जिल्हास्तरावर म्हणजे जळगाव येथे आंतरराष्ट्रीय बैठक घेण्याचा निर्णय झाला.

त्याअनुषंगाने १७ ते २१ जुलैदरम्यान शहरातील बालाणी लॉन्स्च्या नवीन इमारतीत आंतरराष्ट्रीय बैठक घेण्यात आली असून, बैठकीला ४० पैकी पाच देशांतील केंद्रीय प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. जळगावसारख्या शहराला पहिल्यांदाच या बैठकीचा मान मिळाला असून, १९ जुलैला सकाळी साडेनऊला उद्घाटन होणार आहे. बैठकीला विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष अलोक कुमार, राष्ट्रीय महामंत्री बजरंग लालजी बागडा, संघटन महामंत्री मिलिंद परांडे, अयोध्या श्रीराम मंदिर न्यासचे सचिव चंपतराय यांच्यासह विविध पाच देशांतील ३१० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. बैठकीमध्ये सहा महिन्यांत झालेल्या कामांचे चिंतन तसेच भविष्यातील कामांची दिशा यासाठी नियोजन केले जाणार आहे.

### वर्षातून दोनवेळा आंतरराष्ट्रीय स्तर बैठका

विश्व हिंदू परिषद केंद्रीय प्रन्यासी मंडळ आणि केंद्रीय प्रबंध समिती यांची वर्षातून दोन वेळा आंतरराष्ट्रीय स्तराची बैठक होते. यावेळी ही बैठक जळगाव शहरामध्ये होत आहे. देवगिरी प्रांतस्तरावर जळगावमध्ये प्रबंध समितीची आंतरराष्ट्रीय बैठक घेण्याचे ठरविण्यात आल्याचे देवगिरी प्रांतमंत्री योगेश्वर गर्गे यांनी सांगितले.

### विविध २१ समित्यांतील ७५ कार्यकर्ते सेवेला!

बैठकीसाठी येणाऱ्या प्रतिनिधींची निवासव्यवस्था बालाणी लॉन्स येथे करण्यात आली आहे. बैठकीच्या नियोजनासाठी भोजन, निवास, यातायात, वैद्यकीय सेवा अशा विविध २१ समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. सर्व समित्यांमध्ये तब्बल ७५ कार्यकर्ते काम करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# 'अर्थ' साक्षरतेचा अर्थ

२०२४-२०२५ या आर्थिक वर्षात एकट्या स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये २,१२२ कोटी रुपयांनी फसवणूक झाल्याची माहिती एका माहिती अधिकार अंतर्गत नुकतीच देण्यात आली आहे. गेल्या २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात देशातील सर्व बँकांची मिळून १४,५९५ कोटी रुपयांनी फसवणूक झाल्याचे सांगण्यात आले होते. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणात ६३ सरकारी बँका आहेत. त्यांची ही एकत्रित फसवणूक होती. या वर्षात एकट्या स्टेट बँकेचीच फसवणूक २,१२२ कोटी रुपयांची असल्याची अधिकृत माहिती आहे. देशातील सर्वांत मोठी सरकारी बँक स्टेट बँकच असल्यामुळे सर्वाधिक व्यवहार, उलाढाल आणि सर्वाधिक फसवणूक या बँकेतच किंवा या बँकेमुळेच होणेही स्वाभाविकच आहे. गेल्या एकाच आर्थिक वर्षात स्टेट बँकेच्या तक्रार निवारण विभागाकडे तब्बल २८ लाख ५० हजार ५२० तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. ३१ मे २०२५ या दिवशी स्टेट बँकेचे सुमारे २.५ लाख कर्मचारी, २२,९६२ शाखा आणि ६३,७९१ एटीएम असल्याची माहिती देण्यात आली आहे. या काळात सायबर फसवणुकीच्या १०,२६० प्रकरणांमध्ये ६६.७७ कोटी रुपये, इंटरनेट बँकिंगच्या ५००२ प्रकरणांत ३६.२६ कोटी रुपये, मोबाईल बँकिंगच्या आठच प्रकरणांमध्ये १७ लाख रुपये, योनोच्या १५६ प्रकरणांत २.३४ कोटी रुपये, यूपीआयच्या ४,८२९ प्रकरणांत २६.४७ कोटी रुपये आणि ईपीईएसच्या २६५ प्रकरणांमध्ये ४६ लाख रुपयांच्या फसवणुकीचा समावेश आहे. स्टेट बँकेच्या या साऱ्या प्रकरणांसोबत सर्वांत गंभीर प्रकरण तर वेगळेच आहे. या बँकेने आपल्याच १०० कर्मचाऱ्यांची ७.९८ कोटी रुपयांची फसवणूक केली असल्याची धक्कादायक माहिती दिली आहे. याचा अर्थ सर्वसामान्य नागरिक किंवा स्टेट बँक खातेदारांच्या आर्थिक फसवणुकीत याच स्टेट बँकेचे कर्मचारी सहभागी असतात असाच निघतो. अशाच एका ऑनलाईन फसवणुकीच्या तक्रारीची माहिती समाज माध्यमांवर आली होती. त्यात स्टेट बँकेच्या एका ग्राहकाच्या फसवणुकीबाबत सांगितले होते. स्टेट बँकेच्या खात्यातून ऑनलाईन व्यवहार करण्यासाठी 'योनो' नावाची सुविधा खातेदाराने मागितल्यानंतर बँकेला 'प्रोव्हाईड' करायची असते. या प्रकरणात ग्राहकाने 'योनो' मागितले नसतानाही त्याला ते त्याच्या नकळत देण्यात आले. विशेष म्हणजे या खात्याशी जोडलेला अधिकृत भ्रमणध्वनी क्रमांक थेट बँकेच्या 'सॉफ्टवेअर'मधून बदलण्यात आला. या बदललेल्या क्रमांकाला त्या खात्याशी काहीही संबंध नसताना जोडण्यात आले. कारण स्टेट बँक योनो व्यवहार मोबाईलमार्फत करते. या जोडलेल्या अनधिकृत क्रमांकावरून स्टेट बँकेच्या अधिकृत खात्यावर 'योनो'ची मागणी केली गेली. बँकेच्या 'अतिकार्यक्षम' यंत्रणेनेही लगेच योनो देऊन टाकले. ज्या भामट्याने आपला मोबाईल क्रमांक स्टेट बँकेच्या अधिकृत खात्यात घुसवला होता, त्याने ठरवल्याप्रमाणे त्या खात्यातील सारी रक्कम साफ करून टाकली. त्या खातेदाराने पोलिस आणि स्टेट बँकेकडे तक्रार केली. 'डिस्प्युट' निर्माण केला. बँकेच्या ग्राहक तक्रार निवारणवाल्यांनी काही महिन्यांनंतर 'स्टिरिओ' उत्तर देऊन त्या तक्रारीचे 'क्लोजर'ही करून टाकले. हे इतके सारे बँकेच्या कर्मचाऱ्याच्या 'भागीदारी'शिवाय कसे होईल, असा प्रश्न संबंधित खातेदार विचारत राहिला.

आजच्या डिजिटल युगात बँकिंगने अभूतपूर्व गतीसह सुविधा दिली आहे. युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) आणि मोबाईल बँकिंगमुळे शहरी व ग्रामीण भागांमध्येही आर्थिक व्यवहारांचे स्वरूप बदलले आहे. २०२४ मध्ये एनपीसीआय (नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) नुसार, भारतात यूपीआय व्यवहारांनी १०० अब्ज व्यवहारांचा टप्पा ओलांडला आहे. त्यामुळे भारत जगातील सर्वांत वेगाने वाढणारी डिजिटल पेमेंट प्रणाली बनला आहे. शहरी भागात, तरुण आणि व्यवसायी मोबाईलद्वारे पैसे हस्तांतरण, बिल पेमेंट आणि ऑनलाईन खरेदीसाठी यूपीआयचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. ग्रामीण भागातही, डिजिटल इंडिया उपक्रम आणि इंटरनेटच्या वाढत्या उपलब्धतेमुळे यूपीआय व्यवहार वाढले आहेत. मात्र, ही सुविधा सोबतच जोखीम घेऊन आली आहे. डिजिटल बँकिंगच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे सायबर गुन्हेगारांनी फसवणुकीच्या नवीन पद्धती विकसित केल्या आहेत. यामुळे सामान्य ग्राहकांचे आर्थिक नुकसान होण्याचे प्रमाण वाढले आहे. बँकिंग फसवणुकीचे अनेक प्रकार आजकाल प्रचलित आहेत, ज्यामुळे ग्राहकांना आपली मेहनतीची कमाई गमवावी लागते. यात 'फिशिंग' हा एक असा प्रकार आहे ज्यामध्ये सायबर गुन्हेगार बनावट ई-मेल, मेसेज किंवा वेबसाईट्सद्वारे ग्राहकांचा बँक खाते तपशील, पासवर्ड किंवा ओटीपी चोरतात. बँक ग्राहकाला एखादा ई-मेल येऊ शकतो जो बँकेकडूनच आल्यासारखा दिसतो, ज्यामध्ये तुम्हाला तुमचे खाते 'अपडेट' करण्यासाठी लिंकवर क्लिक करण्यास सांगितले जाते. स्मिशिंग या प्रकारात 'एसएमएस'द्वारे पाठवले जाणारे फसवे मेसेजेस यामध्ये ग्राहकांना बनावट लिंक्सवर क्लिक करण्यास किंवा ओटीपी देण्यास प्रवृत्त केले जाते.

क्यूआर कोड स्कॅन करून पेमेंट करणे यूपीआयमुळे सोपे झाले आहे. पण गुन्हेगार बनावट क्यूआर कोड्स तयार करून पैसे थेट त्यांच्या खात्यात हस्तांतरित करतात. 'ॲप क्लोनिंग'मध्ये सायबर गुन्हेगार बँकांच्या अधिकृत ॲप्ससारखे दिसणारे बनावट ॲप्स तयार करतात. ग्राहक चुकीच्या ॲप्सवर 'लॉगिन' करतात आणि त्यांची माहिती चोरीला जाते. ओटीपी कॉल्स आणि कस्टमर केअर फ्रॉडमध्ये फसवणूक करणारे स्वतःला बँक अधिकारी किंवा कस्टमर केअर प्रतिनिधी म्हणवून ग्राहकांना फोन करतात आणि ओटीपी मागतात. अशा कॉल्समुळे अनेक ग्राहक आपली माहिती शेअर करून मोकळे आणि रिकामे होतात. सायबर फसवणुकीला बळी पडण्यामागे अनेक मानसशास्त्रीय कारणे आहेत. अनेक ग्राहकांना डिजिटल बँकिंगच्या जोखमींबद्दल माहिती नसते. विशेषतः ग्रामीण भागातील लोकांना यूपीआय, ओटीपी किंवा फिशिंग याबद्दल कमी माहिती असते. सायबर गुन्हेगार 'तुमचे खाते २४ तासांत बंद होईल' असे मेसेज पाठवून ग्राहकांवर तातडीने निर्णय घेण्याचा दबाव टाकतात. अनेक ग्राहकांना वाटते की, बँकेकडून येणारा प्रत्येक मेसेज किंवा कॉल खरा आहे. यामुळे ते बँकेच्या नावाने येणाऱ्या बनावट कॉल्सवर विश्वास ठेवतात. काही फसवणुकींमध्ये ग्राहकांना मोफत ऑफर्स, कॅशबॅक किंवा लॉटरीचे आमिष दाखवले जाते, ज्यामुळे ते चुकीच्या लिंक्सवर क्लिक करतात. बँकिंग फसवणुकीला आळा घालण्यासाठी बँक आणि सरकार दोघांचीही महत्त्वाची जबाबदारी आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) याबाबत अनेक धोरणे आणि मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. आरबीआयने बँकांना 'केवायसी' (तुमचा ग्राहक जाणून घ्या) प्रक्रिया कठोर करण्याचे आणि ग्राहकांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक करण्याचे निर्देश दिले आहेत. २०२३ मध्ये त्यांनी डिजिटल फसवणुकीविरुद्ध ग्राहक संरक्षणासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. त्यात बँकेच्या निष्काळजीपणामुळे नुकसान झाले असेल तर बँकांना ग्राहकांच्या नुकसानासाठी जबाबदार धरण्याची तरतूद आहे. भारत सरकारने तातडीने अशा फसवणुकीची तक्रार नोंदवण्यासाठी १९३० ही राष्ट्रीय 'सायबर क्राईम हेल्पलाईन' सुरू केली आहे. कोणत्याही परिस्थितीत ओटीपी कोणाशीही शेअर करू नका. बँक कधीही ओटीपी मागत नाही. संशयास्पद कॉल्सला प्रतिसादच देऊ नका. डिजिटल बँकिंगने आपले जीवन सोपे केले आहे. परंतु सोबतच सायबर फसवणुकीचा धोका वाढला आहे. सामान्य ग्राहक म्हणून आपण सतर्क राहणे आणि आपली वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक साक्षरता वाढवणे, बँकिंग व्यवहारांबाबत जागरूक राहणे आणि सायबर सुरक्षेच्या उपायांचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे. रिझर्व्ह बँक आणि सरकारने अनेक पावले उचलली असली, तरी खरी जबाबदारी स्वतःचीच आहे. 'सतर्क ग्राहक : सुरक्षित ग्राहक' हा मंत्र प्रत्येकाने अंगीकारला, तरच आपण सायबर गुन्हेगारांना रोखू शकतो. आपली जागरूकता हीच आपली सर्वांत मोठी ढाल आहे.

## प्रासंगिक

# रोजगार संलग्न प्रोत्साहन योजनेची भूमिका

हिरण्यमय पंड्या

भारत सरकारने अलिकडेच बहुप्रतीक्षित रोजगार संलग्न प्रोत्साहन योजना (ईएलआय) मंजूर केली. ही योजना देशातील कामगारांसाठी एक स्वागतार्ह दिलासा आहे. एक कामगार संघटना म्हणून, आमची ही एक दीर्घकाळापासूनची मागणी होती, तिला अखेर मूर्त स्वरूप आले आहे. हे एक सक्रिय धोरण असून रोजगार निर्मिती, कौशल्य विकास आणि औपचारिकीकरणासाठी सरकारच्या वचनबद्धतेची पुष्टी याद्वारे होते. अशा प्रकारच्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात केल्याबद्दल आम्ही सरकारचे कौतुक करतो. याचा लाभ ३.५ कोटींहून अधिक कामगारांना होण्याची अपेक्षा असून यात प्रथमच कार्यदलाचा भाग होणाऱ्या १.९ कोटींहून अधिक जणांचा समावेश आहे. भारतीय मजदूर संघ याकडे राष्ट्रनिर्माण प्रक्रियेत कामगारांना प्राधान्य देण्याच्या सरकारच्या उद्दिष्टाची प्रतिबद्धता म्हणून पाहतो.

ईएलआय योजना ही एका व्यापक रोजगार साहाय्य चौकटीचा भाग असून सरकारने गेल्या वर्षी सुरू केलेल्या इंटर्नशिप आणि कौशल्य विकास योजनांसारख्या विद्यमान उपक्रमांना पूरक आहे. एकत्रितपणे, या कार्यक्रमांचा उद्देश रोजगारक्षमता सुधारणे, औपचारिक नोकरीचे मार्ग तयार करणे आणि कामगारांच्या हितसंरक्षणाला बळकटी देण्याचा आहे. विशेषतः नोकरीची उपलब्धता आणि सामाजिक सुरक्षा व्याप्ती याबाबत ऐतिहासिकदृष्ट्या पिछाडीवर असलेल्या श्रेणी २ आणि श्रेणी ३ शहरांमधील तरुणांना याचा फायदा होईल.

कर्मचाऱ्यांच्या खात्यात थेट योगदान देऊन, ही योजना नियोक्त्यांसाठी औपचारिकीकरणाचा खर्च कमी करते आणि तरुणांना, पहिल्यांदाच काम करणाऱ्या कामगारांना औपचारिक कार्यदलात प्रवेश करण्यास प्रोत्साहित करते. यामुळे त्यांच्यासाठी पेन्शन, आरोग्यसेवा आणि इतर महत्त्वपूर्ण सामाजिक सुरक्षा लाभांमध्ये प्रवेश सुनिश्चित होतो. शिवाय, वस्तुनिर्माण क्षेत्र आणि एमएसएमईंना अतिरिक्त साहाय्य देऊन, क्षेत्रीय आणि सामुदायिक समान आर्थिक वाढीला चालना देताना रोजगार निर्मितीला चालना देण्याची ग्वाही यातून मिळते. कामगारांसाठी केवळ एक नवीन संधीच नाही तर सन्माननीय, स्थिर आणि समावेशक रोजगाराच्या दिशेने जाणारा एक अर्थपूर्ण



बदल या योजनेतून दिसून येतो.

**कामगार दल प्रवेश आणि औद्योगिक संबंध मजबूत करणे**

ईएलआय योजनेचा सर्वांत प्रशंसनीय पैलू म्हणजे औपचारिक रोजगार आणि आर्थिक साक्षरतेशी जोडलेल्या १५,००० रुपयांपर्यंतच्या थेट प्रोत्साहनाद्वारे नोकऱ्यांमध्ये नवीन प्रवेश करणाऱ्यांना सक्षम बनवण्यावर लक्ष केंद्रित करणे, हा आहे. सामाजिक सुरक्षा आणि कामाच्या ठिकाणी संरक्षणासह संरचित कामाच्या वातावरणात काम करण्याची अशा प्रकारची संधी याद्वारे अनेकांना प्रथमच मिळणार आहे. अनौपचारिक व्यवस्थेतून हक्क-आधारित, सन्माननीय रोजगाराकडे वळण्याची संधी यातून मिळेल. भारतीय मजदूर संघाने कामगार सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणाऱ्या अशा संक्रमणासाठी दीर्घकाळ धोरणवकिली केली आहे.

औपचारिकीकरण म्हणजे केवळ वेतन अनुपालन नाही, तर मूलतः ते नियोक्ता-कर्मचारी संबंधांचे स्वरूप बदलते. संरक्षित आणि मौल्यवान कामगार अधिक योगदान देतात, जास्त काळ टिकतात आणि विश्वासनिर्मिती होते. यातून कामगारांसाठी पेन्शन, वैद्यकीय फायदे, भविष्य निर्वाह निधी बचत आणि गरज पडल्यास कायदेशीर मदत याबाबत पोहोच सुनिश्चित करते. ही योजना कामगार संघटनांचा अर्थपूर्ण सहभाग, संस्थात्मक तक्रार निवारण आणि कामाच्या ठिकाणी वाद कमी करण्यासाठी वाव निर्माण करते. अशाप्रकारे, ईएलआय योजना केवळ रोजगार निर्माण करण्याबद्दल नाही तर परस्पर आदर आणि सामायिक वाढीवर आधारित कामाच्या अधिक न्याय्य आणि सहभागी जगाला आकार देण्याबद्दल देखील आहे.

**कौशल्य, गतिशीलता आणि शाश्वत रोजगार**

ईएलआय योजनेचे एक प्रमुख बलस्थान म्हणजे भारताच्या व्यापक कौशल्य आणि रोजगार चौकटीशी त्याचे संरेखन, शाश्वत आणि सक्षम करणारा, रोजगार सुनिश्चित करणे. आर्थिक साक्षरता, प्रशिक्षण कार्यक्रम, आयटीआय सुधारणा आणि प्लेसमेंट-संबंधित कौशल्य यांना जोडून, ती कौशल्य-संपादनापासून सन्माननीय कामापर्यंत एक स्पष्ट मार्ग तयार करते. योजनेअंतर्गत गतिशीलता आणि करीअर प्रगतीवरील लक्ष, केवळ नोकरीतल्या प्रवेश स्तरावरच मर्यादित नाही तर तरुण कामगारांना औपचारिक कामगार बाजारपेठेत जोडून ठेवण्यातही साहाय्यभूत आहे. विशेषतः महामारीनंतरच्या अनिश्चितता आणि जलद तांत्रिक बदल या पृष्ठभूमीवर दीर्घकालीन रोजगारक्षमता आणि विकास सुनिश्चित करण्यातही ती साहाय्यभूत आहे.

**राष्ट्रीय प्रगतीसाठी सामायिक जबाबदारी**

ईएलआय योजना योग्य साधन पुरवते; मात्र तिचे यश सर्व भागधारक जसे की विविध संघटना आणि इतर सर्व संबंधित यासाठी कशाप्रकारे सहभाग नोंदवतात, यावर अवलंबून आहे. ही योजना कामगार संघटनांना नवीन औपचारिक कामगारांशी संबंध वाढवण्याची संधी देते, जेणेकरून ते त्यांच्या हक्कांबाबत जागरूक असतील आणि त्यांच्या कार्यस्थळाच्या जडणघडणीत अर्थपूर्णपणे सहभागी होऊ शकतील. रोजगार निर्मितीसोबतच कार्यस्थळी मजबूत लोकशाही, सुधारित कामगार-व्यवस्थापन संवाद आणि सहयोगी समस्या सोडवण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

भविष्याचा विचार करता, ईएलआय योजना भारताच्या विकासाच्या संकल्पात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. विकसित भारत २०४७च्या दिशेने आपण प्रगती करत असताना आपले उद्दिष्ट, वाढ किंवा औद्योगिक विस्ताराच्या पलीकडे जात कुशल, संरक्षित, प्रेरित आणि अर्थव्यवस्थेत औपचारिकरित्या जोडलेले कार्यदल निर्माण करावयाचे असायला हवे. ईएलआय योजना या संकल्पाशी अनुरूप आहे. भविष्यासाठी ती पाया रचणारी असून या अंतर्गत युवा पिढीला सक्षम केले जाईल आणि औद्योगिक संबंध सहकार्यात्मक असतील. भारतीय मजदूर संघ या दूरदर्शी पावलाचे कौतुक करतो आणि कामगार आणि राष्ट्राच्या भल्यासाठी रचनात्मक पाठिंबा दर्शवतो.

(लेखक भारतीय मजदूर संघ या संघटनेचे अध्यक्ष आहेत.)

# विचारधारेच्या गोळ्या झाडणारे अर्बन नक्षली

देशात दहशतवादासोबतच गुप्त, कपटी, धोकादायक आणि खोलवर शिरलेली विघातक प्रवृत्ती म्हणजे 'अर्बन नक्षलवाद'. हा फोफावत चालला आहे. ही केवळ कल्पना नाही, तर हे वास्तव आहे. ही प्रवृत्ती शहरातील गुप्त सभा, काही संघटनांचे विचारमंच, व्याख्यानांमधून आणि सोशल मीडियाच्या थेट प्रसारणांतून अधिक वेगाने झिरपत आहे. सरकारने नुकताच आणलेला 'जनसुरक्षा कायदा - महाराष्ट्र स्पेशल पब्लिक सिक्युरिटी ॲक्ट २०२४' हा या अर्बन नक्षलवादाविरोधात एक निर्णायक हत्यार ठरू शकतो. जर योग्य पद्धतीने आणि वेळेत लागू केला गेला, तर.

**जनसुरक्षा कायदा नेमका काय आहे?**

महाराष्ट्र विधानसभेत २०२४ च्या उन्हाळी अधिवेशनात सादर करण्यात आलेला आणि नंतर संमत झालेला हा कायदा, 'अर्बन नक्षल' किंवा 'स्लिपर सेल' कार्यकर्त्यांवर लक्ष ठेवण्यासाठी, त्यांच्यावर बंदी आणण्यासाठी आणि त्यांना आर्थिक पाठबळ देणाऱ्यांना अटक करण्यासाठी लागू करण्यात आला आहे.

या कायद्यानुसार राज्य सरकार एखाद्या व्यक्ती, संस्था किंवा गटाला थेट 'धोकादायक संघटना' म्हणून घोषित करू शकते.

UP (Unlawful ctivities Prevention ct) च्या धर्तीवर पण अधिक काटेकोर आणि राज्यस्तरीय नियंत्रणासाठी हा कायदा उपयोगी आहे.

**अर्बन नक्षलवाद म्हणजे काय?**

'नक्षलवादी' हा शब्द ऐकताच जंगलातील बंदूकधारी गोरिल्ला लढवय्ये आठवतात. पण याच लढाईचा शहरी चेहरा अधिक घातक आणि गुप्त स्वरूपाचा आहे. हे लोक बुद्धिजीवी, सामाजिक कार्यकर्ते, लेखक, छत्रछ च्या नावाखाली काम करणारे लोक, आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनांतले काही नेते असू शकतात.

**त्यांचे काम म्हणजे -**

१. हिंसक नक्षलवादाचं समर्थन २. राज्यविरोधी भावना पसरवणं ३. पोलिसांवर अविश्वास निर्माण करणं ४. भारतीय लोकशाही संस्थांबद्दल अवमान ५. देशद्रोही विचारसरणीचं उदात्तीकरण

**स्लिपर सेल्स कसे काम करतात?**

* हे लोक प्रत्यक्ष जंगलात लढत नाहीत, पण शहरात बसून नक्षलवाद्यांना माहिती, लॉजिस्टिक सपोर्ट, रुग्णसेवा, पैसे, प्रचार साहित्य, नकाशे, निवारा, प्रशिक्षण, आणि हत्यारंही पोचवतात.
* NI व महाराष्ट्र TS च्या अहवालानुसार, शहरांमध्ये काम करणारे काही बुद्धिजीवी हे प्रत्यक्ष माओवाद्यांपेक्षा अधिक घातक आहेत.

**शहरातील सामान्य नागरिकांना धोका कसा?**

* अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा गैरवापर करून काही समाजात कट्टर भावना पेरल्या जातात.
* कॉलेजांमध्ये आणि सोशल मीडियावर 'शोषण', विविध घोषणांच्या आड देशविरोधी विष पेरलं जातं.
* शहरांतील विद्यार्थी, बेरोजगार, बुद्धिजीवी वर्ग यांना हाताशी धरून 'भारतातील संसदीय लोकशाही मोडीत काढणे'या लोकांचा उद्देश आहे. दहशतवादी 'मरतात', पण अर्बन नक्षल 'विचार पेरतात'. हे पिढ्या बरबाद करतात.

**जनसुरक्षा कायदा - गरज आणि लाभ**

* स्लिपर सेल्सवर थेट कारवाई - आता तपासयंत्रणा कोणताही गोंधळ न होता थेट अटक, जप्ती आणि चौकशी करू शकतात.
* राजकीय दुर्बलता बाजूला - पूर्वी नक्षल समर्थकांना 'सामाजिक कार्यकर्ते' म्हणत दुर्लक्ष केलं जात होतं, आता तसं शक्य नाही.
* डिजिटल युद्धात वापर - सोशल मीडियावर जाणीवपूर्वक चालवले जाणारे प्रोपगंडा हँडल्स आता या कायद्याच्या टप्प्यात येतील.

अर्बन नक्षलवाद हा बंदुकीचा आवाज नसून, स्वातंत्र्याच्या नावावर चालवलेले मेंदूवर नियंत्रण आहे. ते अधिक घातक आहे, कारण ते शिक्षण, अभिव्यक्ती, आणि विचार या तीन मूलभूत गोष्टींनाच भ्रष्ट करते. आजच्या काळात गोळी झाडणाऱ्या दहशतवाद्यांपेक्षा अर्बन नक्षलवाद अधिक धोकादायक बनत आहे. जनसुरक्षा कायदा ही त्या विषाला तोंड देणारी तलवार आहे, पण ती वेळेत उपसावी लागेल.

- नितीन फलटणकर

## दिल्ली वार्तापत्र

# राज्यसभेत भाजपा शतकाच्या उंबरठ्यावर

श्यामकांत जहागीरदार

राज्यसभेत भाजपा शतकाच्या उंबरठ्यावर उभा आहे, भाजपाचा एक सदस्य वाढला तरी राज्यसभेत भाजपाचे शतक पूर्ण होणार आहे. भाजपाचे सभागृहात सध्या ९९ सदस्य आहेत, हा एक विक्रम म्हटला पाहिजे. कधीकाळी लोकसभेत भाजपाचे स्पष्ट बहुमत होते, मात्र राज्यसभेत भाजपा अल्पमतात होती. आता लोकसभेत भाजपाचे स्वबळावर स्पष्ट बहुमत नसले तरी रालोआतील मित्रपक्षांच्या मदतीने भाजपाने बहुमतासाठी आवश्यक असलेला आकडा गाठला आहे. दुसरीकडे राज्यसभेत भाजपाची स्वबळावर बहुमताच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. २०२६ मध्ये राज्यसभेतील जवळपास ७५ सदस्यांचा कार्यकाळ संपल्यामुळे या जागांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीनंतर राज्यसभेतही भाजपाचे स्वबळावर स्पष्ट बहुमत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यसभेच्या या निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे.

लोकसभा सदस्यांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो, तर राज्यसभा सदस्यांचा कार्यकाळ सहा वर्षांचा, म्हणजे लोकसभा सदस्यांपेक्षा एक वर्षाने जास्त असतो. विशेष म्हणजे राज्यसभा हे ज्येष्ठांचे सभागृह म्हणून ओळखले जाते. लोकसभा दर पाच वर्षांनी बरखास्त होत असते, राज्यसभा मात्र कधीच बरखास्त होत नाही, तर दर दोन वर्षांनी त्यातील काही जागांसाठी निवडणूक होत असते. २४५ सदस्यांच्या राज्यसभेत २३३ सदस्य निर्वाचित असतात, म्हणजे विविध राज्यांतील विधानसभांचे सदस्य त्यांना निवडून देत असतात, तर १२ सदस्य राष्ट्रपतींद्वारा नामनियुक्त असतात. सध्या राज्यसभेचे संख्याबळ २४० आहे. जम्मू-काश्मिरातील ४ तर पंजाबमधील एक जागा सध्या रिक्त आहे. २४० सदस्यांच्या सभागृहात साध्या बहुमतासाठी १२१ सदस्य पाहिजेत. भाजपा आणि रालोआतील मित्रपक्षांचे सदस्य धरून रालोआचे संख्याबळ १२५ होते. म्हणजे आज भाजपाजवळ राज्यसभेत स्वबळावर स्पष्ट बहुमत नसले तरी रालोआजवळ मात्र आवश्यक बहुमतापेक्षा चार जागा जास्त आहे.

मागील आठवड्यात राष्ट्रपतींनी चार मान्यवरांची नामनियुक्त सदस्य म्हणून राज्यसभेवर नियुक्ती केली आहे. मुंबई बॉम्बस्फोट खटल्यातील विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन शृंगला, केरळमधील सामाजिक कार्यकर्ते सी. सदानंदन् मास्टर आणि इतिहासकार मीनाक्षी जैन यांचा यात समावेश आहे. राष्ट्रपतींनी ज्या लोकांना राज्यसभेवर नामनियुक्त करणे अभिप्रेत असते, यावेळी पहिल्यांदा तशा लोकांना म्हणजे समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील नामवंतांना नामनियुक्त करण्यात आले असे म्हणावे लागेल.

रालोआत भाजपाखालोखाल जदयु आणि अण्णाद्रमुकचे प्रत्येकी चार सदस्य आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तीन तर तेलगू देसमचे दोन सदस्य आहेत. दोन अपक्ष सदस्यांचाही भाजपाला पाठिंबा आहे. अन्य छोट्या पक्षांचे ११ सदस्यही भाजपासोबत आहे. दुसरीकडे लोकसभा निवडणुकीच्या काळात उभ्या झालेल्या पण आता अस्तित्वाचा गंभीर प्रश्न निर्माण झालेल्या इंडिया आघाडीचे संख्याबळ राज्यसभेत ८५ आहे. यात सर्वाधिक म्हणजे २७ सदस्य काँग्रेसचे आहेत. इंडिया आघाडीत तृणमूल काँग्रेसचे १३, द्रमुकचे १० तर आपचे ९ सदस्य आहेत. लोकसभा निवडणुकीपर्यंत आप इंडिया आघाडीत होता. मात्र लोकसभा निवडणुकीनंतर आप या आघाडीतून पूर्णपणे बाहेर पडला आहे. दिल्ली आणि हरयाणा विधानसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेस यांच्यात आघाडी झाली नव्हती. तर दोन्ही पक्ष या दोन्ही राज्यात एकदुसऱ्याविरुध्द लढले होते. राजदचे पाच, तर माकप आणि समाजवादी पक्षाचे प्रत्येकी चार सदस्य आहेत. झामुमोचे तीन सदस्य आहेत. शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, भाकप आणि इंडियन युनियन मुस्लिम लीगचे प्रत्येकी दोन सदस्य आहेत. केरळ काँग्रेस मणि गट आणि एक अपक्ष सदस्य इंडिया आघाडीत आहे.

रालोआ आणि इंडिया आघाडीसोबत नसणाऱ्या तिसऱ्या आघाडीचे संख्याबळ २० आहे. यात वायएसआर काँग्रेस आणि बिजू जनता दलाचे प्रत्येकी ७ सदस्य आहेत. भारत राष्ट्र समितीचे चार तर बसपाचा आणि एमडीएमकेचा प्रत्येकी एक सदस्यही या आघाडीत आहे. तिसऱ्या आघाडीतील वायएसआर काँग्रेस, बिजू जनता दल आणि भारत राष्ट्र समिती मोदी सरकारला मुद्यांवर आधारित पाठिंबा देत असतात.

२०२६ च्या एप्रिल, मे आणि जून महिन्यात राज्यसभेतील ७५ जागांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीनंतर राज्यसभेतील संख्याबळात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. काँग्रेसच्या काही जागा कमी होऊ शकतात, तर भाजपाच्या वाढू शकतात. लोकसभा असो की राज्यसभा विरोधी पक्षनेतेपदासाठी दोन्ही सभागृहांत एकूण सदस्यसंख्येच्या दहा टक्के सदस्य निवडून येणे आवश्यक असते. राज्यसभेत सध्याच काँग्रेसला काठावरचे बहुमत आहे. २०२६ च्या निवडणुकीनंतर काँग्रेसचे संख्याबळ २५ च्या खाली गेले तर काँग्रेसवर राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदही गमावण्याची वेळ येऊ शकते.

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला दहा टक्के म्हणजे ५५ जागा लोकसभेत जिंकता न आल्यामुळे विरोधी पक्ष नेतेपदापासून वंचित राहावे लागले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसला लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद मिळाले आहे. सध्या राहुल गांधी लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. २०१४ ते २०१९ मध्ये अधीररंजन चौधरी तर २०१९ ते २०२४ या काळात मल्लिकार्जुन खडगे लोकसभेत काँग्रेस पक्षाचे गटनेते होते. सध्या कर्नाटक, तेलंगणा आणि हिमाचलप्रदेश अशा देशातील फक्त तीनच राज्यांत काँग्रेसची सत्ता आहे. त्यामुळे निवृत्त होणाऱ्या सदस्यांना पुन्हा राज्यसभेत पाठवणे काँग्रेससमोरील अशक्यप्राय असे आव्हान आहे.

राज्यसभेतील अनेक ज्येष्ठ सदस्यांचा कार्यकाळ पुढील वर्षी संपत आहे. यात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार, राज्यसभेचे उपसभापती हरिवंशनारायण सिंह यांच्यासह अनेक सदस्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे खडगे आणि देवेगौडा कर्नाटकमधूनच राज्यसभेवर निवडून आले आहेत. कर्नाटकात काँग्रेसचे सरकार असल्यामुळे खडगेंना पक्षाने उमेदवारी दिली तर पुन्हा निवडून येऊ शकतात. केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी, बी. एल. वर्मा, रवनीतसिंग बिट्टू, जॉर्ज कुरियन, रामदास आठवले, काँग्रेसचे दिग्विजयसिंह, अभिषेक मनु सिंघवी, शक्तिसिंह गोहील, झामुमोचे शिबू सोरेन यांचा निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये समावेश आहे. माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांचा कार्यकाळही पुढील वर्षी संपत आहे. गोगोई पण राष्ट्रपतींद्वारा नामनियुक्त सदस्य होते. त्यामुळेच बहुधा सरकारने कायदेतज्ज्ञ म्हणून ॲड. निकम यांना पसंती दिली असावी.

त्यामुळे २०२६ मध्ये होणाऱ्या राज्यसभेच्या द्विवार्षिक निवडणुकीनंतर राज्यसभेची समीकरणे मोठ्या प्रमाणात बदलण्याची शक्यता आहे. राज्यसभेत स्पष्ट आणि निर्विवाद बहुमत मिळवण्याचे भाजपाचे स्वप्न पुढील वर्षी साकार होण्याची शक्यता आहे. राज्यसभेत बहुमत नसल्यामुळे आतापर्यंत अनेक महत्त्वपूर्ण विधेयके पारित करून घेताना सरकारची अडचण होत होती. आता मात्र ही अडचण कायमस्वरूपी दूर होणार आहे, हा भाजपाच्या दृष्टीने शुभसंकेत म्हटला पाहिजे.

९८८१७१७८१७

## नौसैनिक गिर्यारोहकाचे आशीर्वाद

आम्ही कैलास मानसरोवर यात्रा करून आल्यावर त्या यात्रेचे फोटोग्राफ काढले होते. ते मोठे करून त्याचे प्रदर्शन सिस्फाच्या छोट्या गॅलरीत आयोजित केले होते. त्याच्या उद्घाटन सोहळ्याला श्री नरकेसरी प्रकाशन लि.चे अध्यक्ष प्रभाकरराव मुंडले अध्यक्षस्थानी होते. त्या समारंभाला एक सरदारजी अचानक आले होते. आणि त्यांचे स्वागत करून त्यांना भाषण करण्याची विनंती करावी असे प्रभाकररावांनी मला सांगितले.

त्यांच्या भाषणातून त्यांनी या छायाचित्रणाबद्दल अतिशय मोकळेपणाने माझे कौतुक केले. हे गृहस्थ कोण होते हे मात्र मला त्या क्षणी अजिबात माहीत नव्हते. कार्यक्रम संपता संपता निखिल मुंडले यांनी त्यांच्या मला परिचय करून दिला. त्यावेळी लक्षात आले की किती महान व्यक्तीचे आशीर्वाद आपल्या छायाचित्रण प्रदर्शनाला मिळाले आहेत. ती व्यक्ती होती कॅप्टन मनमोहन सिंग कोहली. कॅप्टन कोहली हे नौसेनेमध्ये होते आणि त्यानंतर भारत सरकारने हिमालयाच्या ज्या मोहिमा आखल्या त्याचे नेतृत्व कॅप्टन साहेबांकडेच होते. एका अर्थाने हिमालयाचा परिपूर्ण अभ्यास असणारे आणि अतिशय धाडसी असे ते व्यक्तिमत्त्व होते.

कॅप्टन कोहली यांच्या आशीर्वादाने माझे जीवन उजळून गेले. आज आता आठवण पुन्हा ताजी होते. कारण २३ जून २०२५ ला कॅप्टन कोहली यांचे निधन झाले. कॅप्टन साहेबांचे वर्धा मार्गावर व्यावसायिक प्रतिष्ठान होते व त्यांचे त्यांचे राहणेही वर्धा मार्गावरच होते १९६२ साली नंदादेवी शिखरावर अमेरिकन तांत्रिक शोध उपकरण ठेवण्यात आले होते. ते ठेवण्यामध्ये कॅप्टन कोहली यांची महत्त्वाची भूमिका होती. सिस्फा छोटा गॅलरीत झालेला हा सोहळा आगळावेगळा होता. दोन-तीन दिवसांच्या या समारंभात एक दिवस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयातून फोन आला आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत हे प्रदर्शन पाहायला येणार आहेत असे सांगितले गेले. मोहनजी दुपारी चारच्या सुमाराला आलेत आणि त्यांनी त्याचा मनमुराद आनंद घेतला. त्यांना झालेला आनंद त्यांनी आपल्या अभिप्रायातून व्यक्त केला. कॅप्टन कोहली यांची या निमित्ताने खूप आठवण होते आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**निरंजन अत्रे**/९८८१७१७८४२

## वाचक पत्रे

### मोबाईलचा दुरुपयोग

रिलायन्स उद्योगसमूहाचे सर्वेसर्वा धीरूभाई अंबानी यांनी सन २०२० मध्ये प्रत्येकाच्या हातात एक सेल फोन असेल असे स्वप्न बघितले. ते तंतोतंत खरे झाले. अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण या मूलभूत गरजांची लांबी वाढत जाऊन यात आता मोबाईल फोन हा अत्यावश्यक जीवनावश्यक घटक बनला आहे. एकवेळ खायला अन्न नसले तरी चालेल पण हातात फोन हवा असे चित्र बघायला मिळते. कुठलेही तंत्रज्ञान मनुष्याच्या सुविधांसाठी निर्माण करण्यात येते. त्याचा वापर जबाबदारीने करणे हे आपले कर्तव्य आहे. स्मार्टफोन्स आपल्याला कर लो दुनिया मुठ्ठी में ही भावना देतात. त्याबद्दल प्रगत तंत्रज्ञानाचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.

परंतु याची दुसरी बाजू अशी की वापरकर्त्याला त्याच्या उपयुक्ततेच्या पलीकडे जाऊन स्वकर्तव्याचे भान राहत नसेल तर ते घातक ठरते. सध्या जो, तो त्या छोट्या यंत्रात डोके खुपसून स्वतःला वर्तमान जगापासून विलग करतो आहे. बरेचदा कामाच्या ठिकाणी कर्मचारी स्वतःचे काम सोडून मोबाईलमध्ये गेम खेळताना किंवा व्हॉट्सॲप, इन्स्टा, फेसबुक याचा वापर करताना दिसून येतात. अशा वेळी आपण दुसऱ्याच्या वेळेचा अपव्यय करतो आहे हे त्यांच्या गावी नसते. तसेच एखाद्या कार्यक्रमात गेल्यावर कार्यक्रमाचा पूर्ण आनंद घ्यावा किंवा पुढच्याचे ऐकावे असे असताना वारंवार फोनमध्ये लक्ष घालतात. यात बरेचदा समोरच्याचा अवमान होतो. एकंदर आपला संयम कमी झाला आहे. कुठलाही एक कार्यक्रम लवकरच कंटाळवाणा होतो. त्यामुळे तिथे बसून सर्फिंग करणे सोईचे वाटते. प्रश्न हा आहे की ती निर्जीव वस्तू आपली गुलाम की आपण तिचे गुलाम बनलोय. ज्यांची नोकरी अथवा उद्योग त्यावर असेल अशा व्यक्ती वगळता इतरांनी वेळीच सावध व्हावे.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### देव मंदिरातच असतो का?

जळी -स्थळी -पाषाणी ईश्वर भरलेला आहे असे अनेक वर्षे संत, महंत, कीर्तनकार, प्रवचनकार, भारूड अशा अनेक माध्यमाद्वारे ऐकतो आहोत. एक गोष्ट साशंकित की मनाची एकाग्रता वाढविल्यावर मंदिरात जाऊन भगवंत भेटतो का? तर त्याचे उत्तर होकारार्थी व नकारार्थी पण मिळते. ज्याला आपली एकाग्रता स्थिर करता येत नाही त्याला मंदिरात जाऊन समाधान लाभते. पण खऱ्या अर्थाने परमेश्वर गरीब वस्तीतल्या तान्ह्या बाळामध्ये, भुकेलेल्यांमध्ये, दिव्यांगांमध्ये, ज्याला नेसायला वस्त्र सुद्धा नाही अशा गरिबांमध्ये, अंध व्यक्तींमध्ये, मुक्या प्राण्यांमध्ये आणि आपल्या जन्मदात्या आई-वडिलांमध्ये कायमस्वरूपी असतो; तेव्हा त्यांची सेवा हीच परमेश्वराची सेवा आहे यासाठी घरालाच आणि आपल्या विचारांनाच मंदिर बनवून त्यांची सेवा केली तर मंदिरात देव असतो किंवा भेटतो या कल्पनेला विराम मिळेल व जीवन हेच सुवर्ण मंदिर ठरेल.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...

## अनुसूचित जाती, नवबौध्द घटक बचत गटांना मिनी ट्रॅक्टर उपसाधने पुरवठा

**सोलापूर दि.१६ जुलै-**

सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राबविण्यात येणा-या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवठा करणे ही योजना सुरु केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील इच्छुक पात्र बचतगटांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सात रस्ता, सोलापूर या कार्यालयाकडे दि.३० जुलै पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त कल्याण सुलोचना सोनवणे यांनी केले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावेत. स्वयंसहाय्यता बचत गटातील टक्के सदस्य अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत. स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्यांची उपसाधने याची खरेदीचे कमाल मर्यादा रु. ३.५० लाख इतकी राहील. स्वयंसहाय्यता बचत गटांनी वरील कमाल मर्यादेच्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष साधनाच्या किंमतीच्या १०टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर प्रत्यक्ष किंमतीच्या ९० टक्के (कमाल रू. ३.१५ लाख) शासकीय अनुदान अनुज्ञेय देय राहील. स्वयंसहाय्यता बचत गटांनी कमाल मर्यादा रक्कमेच्या १० टक्के म्हणजे रक्कम रू. ३५०००/- स्वहिस्सा भरल्यानंतर सदर योजनेचा लाभ घेता येईल. बचत गटातील सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत. बचत गटातील ८० टक्के सदस्य हे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील असावेत तसेच बचत गटाचे अध्यक्ष व सचिव हे अनुसूचित जातीचे असणे आवश्यक आहे. सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र व डोमासाईल प्रमाणपत्र आवश्यक आहे. या अगोदर संबंधीत बचत गटाने सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा तसेच यापुर्वी सदर योजनेचा लाभघेतला नसलेबाबतचे हमीपत्र आवश्यक आहे. बचत गटाच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे. मिनी ट्रॅक्टर व ट्रेलर यांची नोंदणी आर.टी.ओ कार्यालयात करणे बंधनकारक आहे.



## के.एल.ई. स्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधींची निवड व शपथविधी सोहळा

**सोलापर, दि. १६ जुलै-**

के.एल.ई. इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करण्यात आली. यासाठी मतदान घेण्यात आले. विद्यार्थी प्रतिनिधींची निवड शाळेतील शिक्षकांनी व इयत्ता सहावी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मतदान करुन केली. निवडून आलेल्या विद्यार्थ्यांचा शपथविधी सोहळा घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कर्नल जी. एस. राडकर (कॅम्पस प्रशासक सिम्बायोसिस विमाननगर कॅम्पस) हे उपस्थित होते. या शपथविधीत शाळेच्या नियमांचे पालन करणे, शाळेतील सर्व विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवणे, शालेय साहित्याची जोपासना करणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. यासाठी विद्यार्थ्यांना प्राचार्य सतीश हिरेमठ यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सहस्त्राजून प्रशालेने आयोजित केलेल्या मुला-मुलींसाठीच्या एकत्रित वार्षिक प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शिबिरात १५ मुले आणि १० मुलींच्या कॅडेट्सच्या पथकाने शाळेचे प्रतिनिधित्व केले.

**सहभागी कॅडेट्स :** वरिष्ठ - पृथ्वीराज पाटील, ओजस काळदाते. व्हॉइस सीनियर - रेणू ठोंबे, हिंदवी शेटे, रुग्वेद वळसंगे विराज खैराटे, सोहम गायकवाड, देवेश गोसकी , अनुष्का स्वामी, श्लोका दंतकाळे, शिवम अंबूरकर, यशराज वानखेडे, आदिती कुलकर्णी, हर्ष हळमल्ली, यश अरबोले, मल्लिकार्जुन मंगरुळे, ओम गोरनाळे, रिशीत गणेर, वेदांत कोंडले. कर्णधार - राघव काबरा, वल्लभी वढावराव. उपकर्णधार - युवराज शिंदे, सानवी अकतनाल, शैक्षणिक कर्णधार - यश घुगरे, सांस्कृतिक कर्णधार - हिया होतवानी, क्रीडा कर्णधार - विशाल चव्हाण. अग्नी हाऊस कर्णधार - वरदा परदेशीमठ, अनिकेत स्वामी. उपकर्णधार - तपस्या भोसले, रिशीत गणेर. जल हाऊस कर्णधार - रुचिता हिंदुजा, सुमेध ताटी. उपकर्णधार - आशी राडिया, अर्जुन भोपळे. पृथ्वी हाऊस कर्णधार - रितिका म्याकलवार सक्षम शर्मा. उपकर्णधार - निश्चयी मडकी, आदित्य झंवर. वायु हाऊस कर्णधार - हेमा जमजम, इशान शेख. उपकर्णधार - अर्णा पाटील पृथ्वीराज पाटील.

# थकीत कराबाबत थकबाकीदारांना नोटीसा द्या

## मिळकत करासंदर्भात पाहणी दरम्यान मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. १६ जुलै-**

सलगरवस्ती, फ्री सेटलमेंट कॉलनीत मिळकतकर थकित ठेवणाऱ्यांना नोटीसा द्या, असे आदेश महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बुधवारी दिले. आयुक्तांनी खाजगी आस्थापना, शाळा, दुकान, मेडिकल,दवाखाने यांची सखोल तपासणी करण्याचे आदेश दिले.

आयुक्तांनी सलगर वस्ती, फ्री सेटलमेंट कॉलनी या भागात थेट भेट देऊन मिळकत करसंदर्भात तपासणी केली. यावेळी त्यांनी परिसरातील नागरिक व व्यावसायिक मिळकतधारकांची भेट घेऊन मिळकत कर भरण्याचे आवाहन केले.तपासणी दरम्यान



आयुक्तांना असे आढळून आले की, अनेक मिळकतधारकांनी कर भरणे टाळले असून महापालिकेचे महसूल थकवला आहे. त्यामुळे अशा नागरिकांना आणि आस्थापनांना तात्काळ नोटीस बजावून मिळकत कर भरण्यास निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले. आयुक्तांनी खाजगी आस्थापना, शाळा, दुकान, मेडिकल,दवाखाने यांची सखोल तपासणी करण्याचे आदेश दिले.

### मुदतीत कर न भरल्यास आस्थापना सील करण्याची कारवाई

ज्या ठिकाणी अधिकृत मंजुरीशिवाय वाढीव बांधकाम करण्यात आले आहे. अशा वाढीव बांधकामांवर कायदेशीर कार्यवाही करत त्यांना वाढीव मिळकत कर लावण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.त्याचप्रमाणे ज्या खाजगी आस्थापनांनी अनेकवेळा सूचना मिळाल्यानंतरही मिळकतकर भरलेला नाही, अशांना अंतिम नोटीस पाठवून दिलेल्या मुदतीत कर न भरल्यास संबंधित आस्थापना सील करण्याची कारवाई हाती घेण्याच्या स्पष्ट सूचनादेखील त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

महसूल वसुली वाढविण्यासाठी व नागरी सुविधा सुरळीतपणे पुरविण्यासाठी महापालिकेने मिळकत कर वसुलीला गती दिली असून नागरिकांनी वेळेवर कर भरून जबाबदार नागरिकत्वाचे पालन करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यावेळी केले. यावेळी उपायुक्त आशिष लोकरे यांच्यासह म ालमत्ता विभागातील अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या सोयीस्कर असे दिलीप मानेंनी घेतले निर्णय

### राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्षा जोगधनकर यांचे गौरवोद्गार



**सोलापूर दि.१६ जुलै -**

बाजार समितीमध्ये माजी आमदार दिलीप माने यांनी पदभार घेतल्यानंतर शेतकऱ्यांना सोईस्कर होईल असे अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. सायंकाळच्या सुमारास भाजीपाल्याचा लिलाव हा त्यांचा एक चांगला निर्णय आहे. बाजार समितीमध्ये वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी त्यांनी वाहनधारकांना शिस्त लावून नियम कडक केले आहेत असे गौरवोद्गार राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सोलापूर महिला शहराध्यक्ष संगीता जोगधनकर यांनी नूतन चेअरमन दिलीप माने यांच्या सत्कारावेळी केले. श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन दिलीप माने यांचा सभापती निवडी प्रित्यर्थ सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सोलापूर महिला शहराध्यक्ष संगीता जोगधनकर यांनी केला.



## लोकमंगल कृषी महाविद्यालयात जागतिक युवा कौशल्य दिवस साजरा

### पोस्टर व मॉडेलद्वारे विद्यार्थ्यांनी मांडले केळी पिकाचे शास्त्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. १६ जुलै-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेतून दि. १५ जुलै रोजी जागतिक युवा कौशल्य दिवस केळी पीक आधारित पोस्टर आणि मॉडेल प्रदर्शनाच्या उल्लेखनीय आयोजनाने संपन्न झाला.

जागतिक पातळीवर युवकांच्या सक्षम ीकरणासाठी हा दिवस युवा कौशल्य दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. याच दिनाचे औचित्य साधून अंतिम वर्षातील मॉड्युल मधील विद्यार्थ्यांनी, युवकांच्या संकल्पनेतून केळी पीक आधारित पोस्टर आणि मॉडेल्स सादरीकरण केले. महाविद्यालयामध्ये अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गांडूळ खत निर्मिती, रेशीम शेती, रोपवाटिका व्यवस्थापन, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, भाजीपाला उत्पादन, जैविक खते निर्मिती, मशरूम उत्पादन आणि माती पाणी तपासणी इत्यादी मॉड्यूल उत्कृष्ट पद्धतीने राबविले जातात. याच मॉड्युल मधील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टर व मॉडेल मधून केळी पिकासाठी जमिनीची मशागत, अवजारे, केळीच्या जाती, पाणी व्यवस्थापन, कीड व्यवस्थापन, खतांचा वापर, काढणी, काढणी पश्चात तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन,केळी प्रक्रिया आणि केळी निर्यात इत्यादी सर्व बाबी स्तुत्य पद्धतीने प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या.

सदरील प्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, सर्व संलग्नित विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी विद्यार्थिनींच्या उपस्थितीत केळी खोड पूजन आणि फीत कापून करण्यात आले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टर द्वारे केळी पिकाबाबत तंत्रशुद्ध आणि शास्त्रोक्त माहितीबाबत सर्वांना जागृत केले. सदरील प्रदर्शनास महाविद्यालयातील सर्व व विद्यार्थ्यांनी भेट देऊन केळी विषयी वैज्ञानिक माहिती आणि आधुनिक तंत्रज्ञान याबाबत ज्ञान संपादन केले. लोकमंगल कृषी तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट देवुन केळी पिकातील बारकावे जाणून घेतले. या प्रदर्शनास अंतिम वर्षातील मॉड्युल मधील ४० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषिदुत गणेश केदार याने केले.

मध्य रेल्वे
सूचक सूचना
रोजगार सूचना क्रमांक RRC/CR/01/2025 दिनांक 01/08/2025

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज उघडण्याची तारीख आणि वेळ | 01/08/2025 सकाळी 10.00 वाजता. |
| ऑनलाईन अर्ज बंद होण्याची तारीख आणि वेळ | 31/08/2025 सायंकाळी 6.00 वाजता. |

मध्य रेल्वेने 2025-26 या वर्षासाठी विविध विषयांअंतर्गत क्रीडा कोट्यातील गट 'क' च्या 21 आणि 38 (पूर्वीच्या गट 'ड') पदांसाठी पात्र असलेल्या भारतीय नागरिकांकडून ऑनलाइन अर्ज मागवले आहेत.

| स्तर | पदांची संख्या |
|---|---|
| स्तर ५/४ | ०५ |
| स्तर ३/२ | १६ |
| स्तर १ | ३८ |
| एकूण | ५९ |

तपशीलवार सूचनेसाठी कृपया RRC/CR च्या वेबसाइट www.rrccr.com ला भेट द्या. 01/08/2025 पासून उपलब्ध आहे.
अध्यक्ष RRC/CR 260
असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

### जाहीर समन्स / नोटीस

बी.एन.डी. ४२५/२०२३

**सोलापूर येथील उपविभागीय अधिकारी साहेब यांचे कोर्टात**

**रामलिंग शिवाप्पा पटणे,** -- **अर्जदार**
**विरुध्द**
**अप्पासाहेब मल्लिकार्जुन गुजर** -- **सामनेवाला**
**सामनेवाला नं ३ नारायण शिवाप्पा पटणे,**
धंदा शेती, रा. पिंपरी, (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर

ज्या अर्थी यातील अपेलंटने तुमचे विरुध्द सोलापूर येथील उपविभागीय अधिकारी साहेब यांचे न्यायालयात जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १३८ प्रमाणे अपील दाखल केलेले आहे आपणास वरील नमुद पत्यावर नोटीस काढून त्याची बजावणी होत नाही. तुमच्या वरील नमुद पत्याशिवाय दुसरा पत्ता अपेलंटकडे नाही.

त्याअर्थी आपणास या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, हे जाहीर प्रसिध्दीकरण झालेपासून ३० दिवसात अथवा नेमलेल्या दिनांक २०/०८/२०२५ या तारेखस सदर अपीलात आपण आपले प्रतिनिधी अथवा आपण जातीने हजर राहून आपला बचाव दाखल करावा, व आपला कायमचा पत्ता सदर अपीलाल हजर करावा.

वरीलप्रमाणे आपण सदर अपीलात हजर न झाल्यास अपेलंटच्या मागणीप्रमाणे तुमच्या विरोधात हुकुम होईल. कळावे याची नोंद घ्यावी.

हे जाहिर समन्स/नोटीस आमच्या सही व शिक्यानिशी दिले तारीख १६/०७/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**सोलापूर क्र. १, सोलापूर**
**उप-विभागीय अधिकारी सोलापूर क्र.१, सोलापूर**

### जाहीर नोटीस/समन्स

रे.मु. नं. ३१९/२०२३
पुढिल नेमलेली तारीख १०/०८/०१५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु. डि. साहेब, यांचे कोर्टात**

गौरीशंकर नरहरी फरकांडे, वय-७८ वर्षे,
धंदा-शेती, रा. दत्तनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर --**वादी**
**विरूध्द**
१) अरुण गोविंद सातनाक, वगैरे -३
२) सुमन श्रीधर मते, वय-५० वर्षे, धंदा-शेती व घरकाम, रा. पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर --**प्रतिवादी**

ज्याअर्थी, वादीने प्रतिवादी विरुध्द दावा अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा व दरम्यानचे उत्पन्न मिळणेचा दावा यातील प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते यांना वरील पत्त्यावर म्हणजेच मौजे पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर तसेच मौजे शिराळा, ता. बार्शी जि. सोलापूर या ठिकाणावर अनेकवेळा समन्स काढून त्याची बजावणी होत नाही. प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते सदर पत्त्यावर आढळून येत नाही. प्रतिवादी नं. २ याचा कायमचा पत्ता वरील पत्याशिवाय वादीकडे नाही.

त्या अर्थी तरी प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते यांना या जाहीर समन्स/नोटीसने कळिवण्यात येते की, हि जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसात अथवा पुढील नेमलेली तारीख दि. ३०/०८/२०२५ रोजी नेमलेल्या तारखेस सदर दाव्यात प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते त्याचे प्रतिनिधी अथवा जातीने हजर राहून आपला बचाव दाखल करावा व आपला कायमचा पत्ता दाव्यात हजर करावा.

वरील प्रमाणे प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते यांनी सदर दाव्यात हजर न झाल्यास वादीच्या दाव्यातील मागणीप्रमाणे प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते यांचे विरोधात वादीच्या हक्कात सदर दाव्याचा हुकूम होईल. कळावे याची नोंद घ्यावी.

हे जाहीर नोटीस/समन्स आमच्या सही व शिक्कयानिशी दिले असे. दि. ०७/०७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**मे. सि. ज. ज्यु. डि बार्शी**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक,**
**मे. सि. ज. ज्यु. डि बार्शी**

### जाहीर नोटीस/समन्स

रे.मु. नं. ३१९/२०२३
पुढिल नेमलेली तारीख १०/०८/२०१५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु. डि साहेब, यांचे कोर्टात**

**गौरीशंकर नरहरी फरकांडे,** वय-७८ वर्षे,
धंदा-शेती, रा. दत्तनगर, वार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर -- वादी
विरूध्द
१) अरुण गोविंद सातनाक, वगैरे -३
२) सुमन श्रीधर मते, वय ५० वर्षे, धंदा-शेती व घरकाम, रा. पांगरी, ता. बाशी, जि. सोलापूर --प्रतिवादी

ज्याअर्थी, वादीने प्रतिवादी विरुध्द दावा अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा व दरम्यानचे उत्पन्न मिळणेचा दावा यातील प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते यांना वरील पत्त्यावर म्हणजेच मौजे पांगरी, ता. वाशी, जि. सोलापूर तसेच मौजे शिराळा, ता. बार्शी जि. सोलापूर या ठिकाणावर अनेकवेळा समन्स काढून त्याची बजावणी होत नाही, प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते सदर पत्त्यावर आढळून येत नाही. प्रतिवादी नं. २ याचा कायमचा पत्ता वरील पत्याशिवाय वादीकडे नाही.

त्या अर्थी तरी प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते यांना या जाहीर समन्स/नोटीसने कळविण्यात येते की, हि जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसात अथवा पुढील नेमलेली तारीख दि. १०/०८/२०२५ रोजी नेमलेल्या तारखेस सदर दाव्यात प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते त्याचे प्रतिनिधी अथवा जातीने हजर राहून आपला बचाव दाखल करावा व आपला कायमचा पत्ता दाव्यात हजर करावा.

वरील प्रमाणे प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते यांनी सदर दाव्यात हजर न झाल्यास वादीच्या दाव्यातील मागणीप्रमाणे प्रतिवादी नं. २ सुमन श्रीधर मते यांचे विरोधात वादीच्या हक्कात सदर दाव्याचा हुकूम होईल. कळावे याची नोंद घ्यावी.

हे जाहीर नोटीस/समन्स आमच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे. दि. ०७/०७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**मे. सि. ज. ज्यु. डि बार्शी**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक,**
**मे. सि. ज. ज्यु. डि बार्शी**

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं.७७/२०२५
नि. नं. ५

**बार्शी येथील मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

**कु. आर्या बिपीन रंगदाळ,** वय- १२ वर्षे,
धंदा - शिक्षण, अ.पा.क पिता
**बिपीन शिवाजी रंगदाळ,** वय- ५७ वर्षे, -- **अर्जदार**
धंदा - शेती, व्यापार, रा. मनगिरे मळा,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**विरूध्द**
**महाराष्ट्र शासन**
**(याचे समन्स मा. जिल्हाधिकारी साहेब सोलापूर यांचेवर बजावणेत यावे)** -- **सा.वाला**

**अर्ज - गार्डीयनशिप ॲक्ट १९५६ व कलम २९ गार्डीयन्स ॲण्ड वॉर्डस ॲक्ट प्रमाणे**

ज्या अर्थी, डि. सोलापूर सब. डि. ता. बार्शी पैकी मौजे उपळाई (ठो) येथील जमीन गट नं ६२८/२ पैकी लिहून देणार नं. १ व २ यांचे नावे ७/१२ हक्कपत्रकी दाखल असलेले क्षेत्र खालीलप्रमाणे -

अर्जदार यांचे नावे असलेले ०० हे ४२ आर + पो. ख. ०० हे ०२.५० आर आकार ०० रू. ११ पैसे सदर बागायत जमीन आतील सर्व झाड झुडूप तदंगभूत वस्तुसह व वहीवाटीचे हक्कासह. सदर जमीन यातील अज्ञान अर्जदार आर्या बिपीन रंगदाळ याचे ७/१२ हक्क पत्रकी दाखल असून सदर जमीन विक्री करणेकामी परवानगी मिळणेबाबत हा या अर्जाचा विषय आहे. येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक शेतजमीन आतील तदंगभूत वस्तूसह. अर्ज कलम १ मधील मिळकतीतील अज्ञान अर्जदार याचे मालकीची मिळकत **बाळासाहेब बजरंग चोरमुले व इतर** यांना विक्री करणेस मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरूरीचे आहे त्यासाठी अर्जदारांचा हा अर्ज आहे.

त्या अर्थी, वरील मिळकतीचे अज्ञान अर्जदाराचे मालकी हक्काबाबत अगर विक्री हस्तांतरण करणेचे व्यवहारास कोणाची काहीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी सदर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाचे आत किंवा पुढील नेमली ता. २१/०८/२०२५ रोजी सदर अर्जाचे कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर त्यांचे तर्फे मुखत्यार, वकील यांनी हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाची हरकत अडथळा न आल्यास कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून अर्जाप्रमाणे अर्जदाराची मागणी मंजूर करणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण दिले. ता. १६/०७/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी हददीतील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील शेतजमीन गट नं. १४६० याचे क्षेत्र हे. ००-७५ आर, याचा आकार रु. ०२-८१ पैसे, आहे. यासी चतुः सिमा पुर्वेस- रस्ता, दक्षिणेस पाटील यांची जमिन, पश्चिमेस कदम यांची जमिन व उत्तरेस सावळे यांची जमिन, याची वागणूक व पाणी पुर्व बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह, व वहिवाटीच्या हक्कासह.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही मुलतः मुळ पुरुष रावसाहेब कृष्णात सुरवसे यांच्या वडिलार्जित मालकीच्या होत्या ते दि. २१/०२/२००६ रोजी मयत झालेनंतर नागेश रावसाहेब सुरवसे, प्रकाश रावसाहेब सुरवसे, प्रतिभा रावसाहेब सुरवसे, सुमन रावसाहेब सुरवसे, स्वाती रावसाहेब सुरवसे, नागेश राजेंद्र व्यवहारे यांच्या नावाची नोंद ७/१२ हक्कपत्रकी झाली. सदर मिळकतीस अर्जुन विठ्ठल पवार यांचे नावाची नोंद कुळ म्हणून होती. अर्जुन विठ्ठल पवार हे दि. २४/१२/२००३ रोजी मयत झाले. त्यानंतर वारस हक्काने आनंद अर्जुन पवार यांचे नावाची नोंद कुळ म्हणून इतर हक्कात झालेली आहे. यातील नागेश रावसाहेब सुरवसे आनंद अर्जुन पवार, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर वारसा हक्काने व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असून त्यांनी सदर मिळकत त्यांचे कौटूंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करून इसारा दाखल रक्कम घेवून, इसारपावतीचा दस्त आमचे पक्षकाराच्या हक्कात लिहून दिलेला आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत हि निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे, तसेच त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध निजोखमी खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे.

याही उपर सदर मिळतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, चोळीबांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्कअधिकार असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रानिशी व पुराव्यासह खालील नमूद पत्तयावर हे जाहिर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसात लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आलेस आमचे पक्षकार हे सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहित धरून खरेदीदेणार यांचे बरोबर इसार पावतीतील अटी व शर्ती प्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. १६/०७/२०२५

**सही/-**
**ॲड. प्रकाश एस. साखरे**
**बी.ए. एलएल.बी.**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**बार्शी मो.नं. ९०२८४६८५०७**
**खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी हददीतील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील शेतजमीन गट नं. १४५८ याचे क्षेत्र हे. ००-४५ आर, याचा आकार रु. ०१-२५ पैसे, आहे. यासी चतुः सिमा पुर्वेस पाटील यांची जमिन, दक्षिणेस- कदम यांची जमिन, पश्चिमेस कदम यांची जमिन व उत्तरेस सावळे यांची जमिन, याची वागणूक व पाणी उत्तर बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह, व वहिवाटीच्या हक्कासह,

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही मुलतः मुळ पुरुष रावसाहेब कृष्णात सुरवसे यांच्या वडिलार्जित मालकीच्या होत्या ते दि. २१/०२/२००६ रोजी मयत झालेनंतर नागेश रावसाहेब सुरवसे, प्रकाश रावसाहेब सुरवसे, प्रतिभा रावसाहेब सुरवसे, सुमन रावसाहेब सुरवसे, स्वाती रावसाहेब सुरवसे, नागेश राजेंद्र व्यवहारे यांच्या नावाची नोंद ७/१२ हक्कपत्रकी झाली. सदर मिळकतीस अर्जुन विठ्ठल पवार यांचे नावाची नोंद कुळ म्हणून होती. अर्जुन विठ्ठल पवार हे दि. २४/१२/२००३ रोजी मयत झाले. त्यानंतर वारस हक्काने आनंद अर्जुन पवार यांचे नावाची नोंद कुळ म्हणून इतर हक्कात झालेली आहे. यातील नागेश रावसाहेब सुरवसे आनंद अर्जुन पवार, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर वारसा हक्काने व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असून त्यांनी सदर मिळकत त्यांचे कौटूंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करून इसारा दाखल रक्कम घेवून, इसारपावतीचा दस्त आमचे पक्षकाराच्या हक्कात लिहून दिलेला आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत हि निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध निजोखमी खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे.

याही उपर सदर मिळतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, चोळीबांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्कअधिकार असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रानिशी व पुराव्यासह खालील नमूद पत्तयावर हे जाहिर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसात लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आलेस आमचे पक्षकार हे सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहित धरून खरेदीदेणार यांचे बरोबर इसार पावतीतील अटी व शर्ती प्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. १६/०७/२०२५

**सही/-**
**ॲड. प्रकाश एस. साखरे**
**बी.ए. एलएल.बी.**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**बार्शी मो.नं. ९०२८४६८५०७**
**खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट**

मे. एच.यु.यु. पाटील साहेब यांचे कोर्टात....
ॲड. श्री. तेजस सुभाष जाधवर
वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी

### जाहिर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. २२/२०२५
निशानी नं. १४

**बार्शी येथील मे. सह. दिवाणी न्यायाधिश क. स्तर बार्शी यांचे न्यायालयात**

१) प्रमोद प्रल्हाद वाघमोडे, वय ५७ वर्षे, धंदा- शेती, रा. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) हनुमंत प्रल्हाद वाघमोडे, वय- ५३ वर्षे, धंदा शेती, रा. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर --**अर्जदार**
३) छाया दत्तात्रय मारकड, वय- ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. शेलगांव (मा), ता. बार्शी, जि. सोलापूर
४) जयश्री काशीनाथ हजारे, वय-५८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. भातंबरी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव.
विरुध्द
**कोणीही नाही** --**सामनेवाला**

ज्यापेक्षा, अर्जदार हे मयत शहाबाई प्रल्हाद वाघमोडे यांची कायदेशीर वारस आहेत. यातील अर्जदार नं. १ ते ४ चे वडील प्रल्हाद वाघमोडे हे महाराष्ट्र शासनाचे शिक्षण विभागात प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरीस होते व ते सेवानिवृत्त झालेनंतर त्यांना निवृत्ती वेतन मिळत होते व ते मौजे भातंबरे ता. बार्शी येथे मयत झालेले आहेत व मयत प्रल्हाद वाघमोडे यांची पत्नी शहाबाई प्रल्हाद वाघमोडे यांना कुटूंब निवृत्ती वेतन मिळत होते व शहाबाई यांच्या १३/११/२०२१ रोजी भातंबरे येथे मयत झालेल्या आहेत. त्यांची सातव्या वेतन आयोगाप्रमाणे देय होणारी फरकाची रक्कम शासनाकडे प्रलंबित आहे. ती मिळणेकामी यातील अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी या मे. न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार सदरहू मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या जाहिर प्रसिध्दीकरणाच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या मे. कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती लेखी कळवाव्यात आणि या लेखनावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य लेखी हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्कांबद्दल दि. २८/७/२५ रोजी लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबित केल्यास त्यांना सदरहू मयत शहाबाई प्रल्हाद वाघमोडे यांचे वारसाचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

कळावे, हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्कयानिशी दिले असे, ता. १६/७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**

## महत्त्वाचे

### आयसीसीच्या बैठकीत टी-२० विश्वचषकाच्या विस्तारावर चर्चा होणार

**सिंगापूर** : सिंगापूरमध्ये गुरुवारपासून सुरू होणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) वार्षिक सर्वसाधारण सभेत कसोटी क्रिकेटचे भविष्य आणि टी-२० विश्वचषकाचा विस्तार यावर चर्चा होणार आहे. नवे अध्यक्ष जय शाह व सीईओ संजोग गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आयसीसीची ही पहिलीच वार्षिक सर्वसाधारण सभा असेल. वार्षिक सर्वसाधारण सभेतील सर्वात महत्त्वाच्या विषयांपैकी एक म्हणजे कसोटी क्रिकेटसाठी द्वि-स्तरीय प्रणालीवर चर्चेमुळे क्रिकेट जगतात संमिश्र मत निर्माण झाले आहे. इंग्लंडमध्ये होणाऱ्या जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) अंतिम सामन्याच्या भविष्यातील आवृत्त्या मंजूर होऊ शकतात. एकदिवसीय विश्वचषकाच्या विस्ताराबाबत निर्णय होऊ शकत नसला तरी, २०२४ मध्ये २० संघांचा आणि २०२६ च्या आवृत्तीसाठी पुरुषांचा टी-२० विश्वचषक, भविष्यातील आवृत्त्यांमध्ये २४ संघांचा समावेश असू शकतो. २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचे पुनरागमन आणि भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या २०२६ च्या स्पर्धेसाठी नुकतेच पात्र ठरलेल्या इटलीसारख्या उदयोन्मुख राष्ट्रांमध्ये या खेळाची वाढती आवड लक्षात घेता टी-२० विश्वचषक संघांचा विस्तार करण्याचे पाऊल उचलण्यात आले आहे. ■

### फुटबॉल विश्वचषकाच्या तिकिटांसाठी अर्ज करा

**जिनेव्हा** : २०२६ फुटबॉल विश्वचषकाच्या तिकिटांसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया आगामी १० सप्टेंबर रोजी सुरू होणार आहे, असे फिफा ने सांगितले. कॅनडा, मेक्सिको आणि अमेरिका यांच्या संयुक्त आयोजनात होणाऱ्या या स्पर्धेची पुढील आवृत्ती ११ जून रोजी मेक्सिको सिटीमधील अझ्टेक स्टेडियममध्ये सुरू होईल. उच्च मागणीच्या अपेक्षेनुसार तिकिटे टप्प्याटप्प्याने जारी केली जातील, असे फिफा या फुटबॉलच्या जागतिक प्रशासकीय संस्थेने म्हटले आहे. क्लब विश्वचषकाप्रमाणेच ते गतिमान किंमतीचा वापर करेल की नाही हे त्यांनी सांगितले नाही, यात तिकिटांच्या किमतींमध्ये प्रचंड चढ-उतार झाले. कॅनडा, मेक्सिको आणि अमेरिका आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या आणि महान क्रीडा स्पर्धेचे आयोजन करत असल्याने, आम्ही उत्तर अमेरिकेत जगाचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत, असे फिफा अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी एका निवेदनात म्हटले आहे. आम्ही सर्व चाहत्यांना त्यांचे स्थान सुरक्षित करण्यासाठी सज्ज होण्यास प्रोत्साहित करतो. ही जागतिक खेळातील सर्वात प्रतिष्ठित जागा असेल.

### वन-डे मालिकेत येताच राणाचा आत्मविश्वास वाढला

**नवी दिल्ली** : भारत इंग्लंडविरुद्ध साऊदम्पटन येथे तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेची सुरुवात करणार असताना, अनुभवी ऑफ-स्पिन गोलंदाजी करणारी अष्टपैलू स्नेह राणा म्हणाली की, वन-डे मालिकेसाठी संघात येताच माझा आत्मविश्वास उंचावला आहे आणि तयारी खूप चांगली झाली आहे. इंग्लंडमध्ये पहिल्यांदाच टी-२० मालिका ३-२ ने जिंकल्यानंतर भारत एकदिवसीय मालिकेत उतरला आहे. गेल्या वेळी भारताने इंग्लंडमध्ये एकदिवसीय मालिका खेळली होती, तेव्हा त्यांनी सप्टेंबर २०२२ मध्ये ३-० ने विजय मिळवला होता. 'वन-डे मालिकेत येताच, आत्मविश्वास उंचावला आहे व आम्ही खूप चांगली तयारी करत आहोत. आम्ही वन-डे मालिका क्लीन स्वीपच्या फरकाने जिंकण्याचा प्रयत्न करू, असेही ती म्हणाली. पण इंग्लंड देखील चांगले खेळत आहे व त्यांच्याकडे चांगले खेळाडू आहेत. चांगली लढत आणि स्पर्धा असेल. आम्ही त्याची वाट पाहत आहोत, असे स्नेहने म्हटले आहे. ■

# बुमराह, पंत चौथी कसोटी खेळणार?

### अनिश्चिततेचे ढग दूर झाले

◆ **मॅन्चेस्टर, १६ जुलै**

आगामी २३ जुलैपासून इंग्लंडविरुद्ध सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटीसाठी भारताचे दोन प्रमुख खेळाडू जसप्रीत बुमराह व ऋषभ पंत यांच्या उपलब्धतेबाबतची अनिश्चितता अधिकाधिक स्पष्ट होत आहे.

बुमराह त्याच्या वर्कलोड व्यवस्थापनाचा भाग म्हणून पाच सामन्यांच्या दौऱ्यापैकी तीन सामन्यांमध्ये खेळण्याची अपेक्षा आहे आणि त्याने आधीच दोन सामन्यांमध्ये भाग घेतला आहे. सोमवारी लॉर्ड्सवर झालेल्या पराभवानंतर भारत १-२ ने पिछाडीवर असताना उर्वरित दोन सामन्यांपैकी कोणत्या सामन्यात बुमराह भारताच्या अंतिम एकादशचा भाग असेल याची पुष्टी करण्यास भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिलनेही नकार दिला आहे.

तिसऱ्या कसोटीत बुमराहचा चेंडू घेताना फॉर्मात असलेल्या



जसप्रीत बुमराह



ऋषभ पंत

ऋषभ पंतच्या बोटाला दुखापत झाल्याने भारताला धक्का बसला. इंग्लंडच्या पहिल्या डावात दुखापत झाल्यानंतर ध्रुव जुरेलने यष्टिरक्षणाची जबाबदारी सांभाळली.

बुमराह व पंत हे दोघेही भारताच्या अंतिम एकादशचा भाग असतील, कारण ते नव्यानेच सुरू झालेल्या ॲण्डरसन-तेंडुलकर चषकामध्ये स्वतःला बरोबरीत आणण्याचा प्रयत्न करतील, असे तज्ज्ञांचे मत आहे.

चौथी कसोटी भारताने २२ धावांनी गमावल्यानंतर, गिलला आपल्या संघाने सलग दुसऱ्या कसोटीसाठी बुमराहला घेण्याची योजना आखली आहे का असे विचारले असता त्याने गूढ उत्तर दिले. 'तुम्हाला लवकरच कळेल,' असे गिलने सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत उत्तर दिले.

तथापि, त्याला पंतच्या उपलब्धतेबद्दल पूर्ण विश्वास होता. ऋषभ स्कॅनसाठी गेला होता. त्याला कोणतीही मोठी दुखापत झालेली नाही, त्यामुळे तो मॅन्चेस्टरमधील चौथ्या कसोटीसाठी ठीक असावा, असे गिल म्हणाले होते. ◂(वृत्तसंस्था)

# इंग्लंडची तिसऱ्या स्थानावर घसरण

### लॉर्ड्स कसोटीत संथ गतीने षटके टाकल्याबद्दल दोन गुणांची कपात

◆ **लंडन, १६ जुलै**

लॉर्ड्स येथे भारताविरुद्ध झालेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात संथ गतीने षटके टाकल्याबद्दल इंग्लंड क्रिकेट संघाचे दोन गुण कमी करण्यात आले. त्यामुळे बुधवारी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत इंग्लंड एक स्थान घसरून तिसऱ्या स्थानावर पोहोचला.

सोमवारी २२ धावांनी जिंकलेल्या या कसोटीनंतर बेन स्टोक्स व त्याच्या चमूला त्यांच्या सामन्याच्या मानधनाच्या १० टक्के दंडही आकारण्यात आला.

इंग्लंडने दिलेल्या वेळेचा विचार केला असता लक्ष्यापेक्षा दोन षटके कमी असल्याचे निदर्शनास



आल्यानंतर मॅच रेफरी रिची रिचर्ड्सन यांनी ही शिक्षा ठोठावली. भारत सध्या गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे.

संथ गतीने षटके टाकल्याबद्दल नियमानुसार प्रत्येक षटकासाठी संघाच्या सामन्याच्या मानधनाच्या पाच टक्के दंड आकारला जातो, असे आयसीसीने निवेदनात म्हटले आहे. याशिवाय इंग्लंडच्या एकूण गुणांमधून जागतिक कसोटी अजिंक्यप स्पर्धेत त्यांचे दोन गुण वजा करण्यात आले आहेत, असे त्यात म्हटले आहे.

विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या क्रमवारीत इंग्लंडची संख्या ३६ गुणांपैकी २४ वरून २२ वर घसरली आहे व त्यामुळे त्यांच्या गुणांची टक्केवारी ६६.६७ टक्क्यांवरून ६१.११ टक्क्यांवर आली आहे.

परिणामी, ६६.६७ पीसीटी असलेला श्रीलंका इंग्लंडला मागे टाकून दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.

ऑस्ट्रेलियाने आतापर्यंत आपले तिन्ही सामने जिंकून १०० टक्के गुणांसह जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत आघाडी घेतली आहे, तर भारताने ३३.३३ पीसीटी मिळवले आहेत

इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने आपला गुन्हा मान्य केला व प्रस्तावित शिक्षा स्वीकारली, म्हणून औपचारिक सुनावणीची आवश्यकता नव्हती.

मैदानावरील पंच पॉल रीफेल आणि शरफुद्दौला इब्ने शाहिद, तिसरे पंच अहसान रझा आणि चौथे पंच ग्राहम लॉईड यांनी हा आरोप निश्चित केला. ◂(वृत्तसंस्था)

### १९ वर्षांखालील भारत, इंग्लंड संघाचा पहिला युवा कसोटी सामना अनिर्णीत

**बेकेनहॅम** : कर्णधार हमजा शेखने झळकावलेल्या आक्रमक शतकाच्या बळावर इंग्लंडच्या १९ वर्षांखालील युवा संघाने भारताच्या युवा संघाविरुद्धचा पहिला कसोटी सामना चौथ्या आणि शेवटच्या दिवशी अनिर्णीत राखला.

३५० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना, इंग्लंडने ६३ षटकांत ७ बाद २७० धावा केल्या, परिणामी हा कसोटी सामना अनिर्णीत राहिला. पाहुण्या संघाने विजय मिळवण्यासाठी कठोर प्रयत्न केले असते, तर त्यांना दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी मिळाली असती.मात्र हमजा शेख हा इंग्लंडच्या प्रतिकाराचा मुख्य आधार ठरला. त्याने १४० चेंडूत ११ चौकार आणि दोन षट्कारांसह ११२ धावा केल्या. त्याला बेन मेयेस व थॉमसची महत्त्वपूर्ण साथ मिळाली. शेखने मेयेस व थॉमस यांच्यासोबत केलेल्या भागीदारीमुळे यजमान संघाने सामन्यात पुनरागमन केले. ■

# हॉकीपटू दीपिकाला मॅजिक स्किल पुरस्कार

◆ **नवी दिल्ली, १६ जुलै**





भारतीय महिला हॉकी संघाची आक्रमक हॉकीपटू दीपिका हिने २०२४-२५ एफआयएच प्रो-लीगच्या भुवनेश्वर लेगमध्ये नेदरलॅण्डविरुद्ध केलेल्या मैदानी गोलसाठी पोलिग्रास मॅजिक स्किल पुरस्कार जिंकला.

पोलिग्रास मॅजिक स्किल पुरस्कार प्रो-लीगमधील सर्वात सर्जनशील आणि कौशल्यपूर्ण खेळ करणाऱ्या खेळाडूला हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. जगभरातील चाहत्यांकडून त्याकरिता मतदान केले जाते.

२१ वर्षीय आक्रमक खेळाडू दीपिकाने आपल्या चित्तथरारक धावण्याबद्दल जागतिक मान्यता मिळवली.

भारताच्या जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाच्या नेदरलॅण्डविरुद्धच्या सामन्यात ३५ व्या मिनिटाला अंतिम फेरी गाठली. त्यांनी २-२ अशा बरोबरीनंतर शूटआऊटमध्ये सामना जिंकला.

हा पुरस्कार जिंकल्याबद्दल मी खरोखरच सन्मानित आहे. नेदरलॅण्डसारख्या आव्हानात्मक प्रतिस्पर्ध्याविरुद्ध गोल करणे हा माझ्यासाठी खरोखरच एक खास क्षण होता आणि आता ही ओळख मिळणे खूप अर्थपूर्ण आहे. मी माझ्या संघातील खेळाडू, प्रशिक्षक, कुटुंब आणि मित्रांचे आभार मानते, त्यांनी मला दररोज पाठिंबा व आणि प्रेरणा देत राहतात,'' दीपिका म्हणाली. हा पुरस्कार फक्त माझा नाही, तर तो भारतीय हॉकीचा आहे, असे ती म्हणाली.

दीपिकाचा गोल स्पेनच्या पॅट्रिशिया अल्वारेझ व ऑस्ट्रेलियाच्या महिला संघासह तीन महिला नामांकनांपैकी एक होता.

पुरुषांचा पुरस्कार बेल्जियमच्या व्हिक्टर वेग्नेझने त्याच्या मिडफिल्डमधील हुशारीसाठी जिंकला ज्यामुळे स्पेनविरुद्ध संघाचा गोल झाला. ◂(वृत्तसंस्था)

# अमेरिकन ओपन टेनिसच्या प्रवेश यादीत गतविजेता सिनर, सबालेन्का आघाडीवर





◆ **न्यू यॉर्क, १६ जुलै**

टेनिस क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या गतविजेत्ता इटलीचा जॅनिक सिनर व बेलारूसची आर्यना साबालेंका, या दोघांनीही या वर्षीच्या अमेरिकन ओपन स्पर्धेच्याा प्रवेश यादीत आघाडीचे स्थान मिळविले आहे. या यादी १० माजी विजेत्यांसह टेनिस क्षेत्रातील १८ माजी ग्रॅण्ड स्लॅम एकेरी विजेत्यांचा समावेश आहे.

टेनिस हंगामाच्या अंतिम प्रमुख स्पर्धेत थेट प्रवेश १४ जुलैपर्यंतच्या क्रमवारीवर आधारित होता. कटऑफ पुरुषांसाठी १०१ व्या आणि महिलांसाठी ९९ व्या क्रमांकावर होता.

विम्बल्डनच्या अंतिम फेरीत दुसऱ्या क्रमांकाच्या कार्लोस अल्काराझला हरवून सिनरने त्याचे चौथे ग्रॅण्ड स्लॅम विजेतपद मिळवले. उपांत्य फेरीत सबालेन्का अमांडा ॲनिसिमोव्हाकडून पराभूत झाली.अमाण्डा सातव्या क्रमांकावर आहे व अव्वल आठमध्ये स्थान मिळवणाऱ्या चार अमेरिकन महिलांपैकी एक आहे. अमेरिकेने ३० खेळाडूंसह (१६ महिला, १४ पुरुष) थेट प्रवेश मिळवून सर्व देशांचे नेतृत्व केले.

पात्रता मिळविण्यासाठी विशेष किंवा संरक्षित रँकिंगचा वापर करणाऱ्या खेळाडूंमध्ये निक किर्गिओस, पेट्रा क्वितोव्हा व सोराना सिर्स्टियाचा समावेश आहे. मुख्य ड्रॉमध्ये स्पर्धा २४ ऑगस्टपासून सुरू होईल. ◂(वृत्तसंस्था)


# जागतिक पॅरा ॲथ्लेटिक्स स्पर्धेसाठी जेएलएन स्टेडियम पूर्णत्वाच्या मार्गावर

◆ **नवी दिल्ली, १६ जुलै**

भारतात पहिल्यांदाच होणाऱ्या जागतिक पॅरा ॲथ्लेटिक्स स्पर्धेसाठी तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असताना, जवाहरलाल नेहरू स्टेडियमची तयारी वेगाने सुरू आहे, नवीन मोंडो सिंथेटिक ट्रॅकचा बेस लेयर आधीच तयार आहे.

ऑगस्टच्या अखेरीस आंतरराष्ट्रीय पॅरालिम्पिक समिती (आयपीसी) आणि जागतिक ॲथ्लेटिक्स यांच्याकडून होणाऱ्या महत्त्वाच्या तपासणीपूर्वी सर्व मुदती पूर्ण करण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना विश्वास आहे.

आंतरराष्ट्रीय पॅरालिम्पिक समिती व जागतिक ॲथ्लेटिक्स यांच्याकडून अंतिम तपासणी होण्यापूर्वी आपण अंतिम मुदत आरामात पूर्ण करू शकू, असे या घडामोडींबद्दल माहिती असलेल्या एका उच्च पदाधिकाऱ्याने नाव न



सांगण्याच्या अटीवर वृत्तसंस्थेला सांगितले.

आमचे लक्ष्य स्पर्धा सुरू होण्यापूर्वी किमान एक आठवडा आधी स्टेडियमला हिरवी झेंडी मिळवणे आहे, असे पदाधिकाऱ्याने सांगितले.

जागतिक पॅरा ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेची १२ वी आवृत्ती २७ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान आयोजित केली जाईल.

मोंडो प्रीफेब्रिकेटेड सिंथेटिक ट्रॅक शिव नरेश बसवत आहेत. व्हल्कनाइज्ड रबरपासून बनलेला हा ट्रॅक शॉक शोषून घेतो आणि त्याची लवचिकता व गतिमान एकसमान असते तसेच ॲथ्लिट्सचा थकवा कमी करतो तसेच खेळाडूंना त्यांची स्थिती, पायरीची लांबी आणि लय राखण्यास मदत होते. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिक व पॅरालिम्पिकमध्येही असाच सिंथेटिक ट्रॅक वापरण्यात आला होता.

जेएलएन स्टेडियममधील विद्यमान सिंथेटिक ट्रॅक शेवटचा २०२१ मध्ये पुन्हा बांधण्यात आला होता. तथापि, अलिकडच्या वर्षांत तुटलेल्या बसण्याच्या जागा, उघड्या गटार व वाईट देखभालीमुळे स्थळाची एकूण स्थिती बिघडली होती.

व्यापक दुरुस्ती सुरू आहे, असे अधिका-यांनी आश्वासन दिले आहे.

'स्पर्धेपूर्वी जागा बदलल्या जातील, ते आधीच योजनेत आहे. संपूर्ण स्टेडियमच्या नूतनीकरणासाठी स्वतंत्र बजेट आहे. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी तुम्हाला पूर्णपणे नूतनीकरण केलेले स्वरूप दिसेल, असे अधिकाऱ्याने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# पाकिस्तान क्रिकेट मंडळात २१ दशलक्ष डॉलर्सचा आर्थिक घोटाळा


◆ **इस्लामाबाद, १६ जुलै**

एका ऑडिट अहवालात ६ अब्ज रुपयांपेक्षा जास्त (२१ दशलक्ष डॉलर्स) आर्थिक घोटाळा व दोन वर्षांपूर्वीच्या पाकिस्तान क्रिकेट मंडळातील प्रशासनाच्या त्रुटी आढळून आल्या आहेत.

पाकिस्तानच्या महालेखा परीक्षकांचा २०२३-२४ आर्थिक वर्षाचा अहवाल द न्यूजमध्ये प्रकाशित झाला होता आणि त्यात ५.३ अब्ज रुपयांच्या (१८.६ दशलक्ष डॉलर्स) थकबाकीदार प्रायोजकत्वाची वसुली न होणे ही प्रमुख विसंगती म्हणून अधोरेखित करण्यात आली आहे.

पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नक्वी हे रमीझ राजा आणि झका अशरफ यांच्यानंतर खेळाच्या राष्ट्रीय प्रशासनाचे नेतृत्व करणारे चार वर्षांत तिसरे व्यक्ती आहे. ते एक सरकारी मंत्री देखील आहेत.

पाकिस्तानमधील आंतरराष्ट्रीय सामन्यांदरम्यान परदेशी संघांच्या सुरक्षेसाठी नियुक्त केलेल्या पोलिस आणि कायदा अंमलबजावणी कर्मचाऱ्यांच्या जेवणावर पीसीबीने खर्च केलेल्या ६३.३९ दशलक्ष





रुपयांच्या (२२०,००० डॉलर्स) पैशांवरही या अहवालात प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आला आहे.

सुरक्षा प्रदान करणे ही सरकारची जबाबदारी आहे आणि पीसीबीच्या स्पष्टीकरणाशी ते असहमत आहेत की, आंतरराष्ट्रीय संघांना अतिरिक्त सुरक्षा हमी देण्यात आल्या होत्या, त्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलिस तैनात करणे आवश्यक होते, असे ऑडिटर्सनी सांगितले.

ऑडिट अहवालात पात्रता निकष पूर्ण न करणाऱ्या तीन ज्युनियर प्रादेशिक प्रशिक्षकांची नियुक्ती व योग्य प्रक्रियेबाहेर मीडिया डायरेक्टरची नियुक्ती देखील अधोरेखित करण्यात आली आहे.

गेल्या वर्षी फेब्रुवारी ते जून दरम्यान पीसीबी अध्यक्षांना युटिलिटी शुल्क, इंधन आणि निवास व्यवस्था यासाठी दिलेली भरपाई देखील अनधिकृत म्हणून अधोरेखित करण्यात आली कारण नक्वी यांना त्यांच्या सरकारी फायद्यांचा भाग म्हणून ती मिळाली होती.

पीसीबी अध्यक्षांना ''उपनियमांनुसार युटिलिटी खर्चासाठी अधिकृत'' असल्याचा क्रिकेट बोर्डाचा प्रतिसाद ऑडिटर्सनी नाकारला. पीसीबीने अद्याप ऑडिट अहवालावर भाष्य केलेले नाही. ◂(वृत्तसंस्था)

# रूट पुन्हा अव्वल स्थानावर

### गोलंदाजी क्रवारीत ऑस्ट्रेलियन खेळाडूंचे वर्चस्व

◆ **दुबई, १६ जुलै**

इंग्लंडचा स्टार फलंदाज जो रूटने आयसीसी पुरुषांच्या कसोटी क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले, तर भारताचा अष्टपैलू रवींद्र जडेजा बुधवारी येथे जाहीर झालेल्या ताज्या यादीत ३४ व्या स्थानावर पोहोचला.

लॉर्ड्स येथे भारताविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील तिसऱ्या कसोटीत जो रूटच्या १०४ आणि ४० धावांच्या खेळीमुळे तो आठव्या क्रमांकावर पोहोचला.

डिसेंबर २०१४ मध्ये कुमार संगकारा नंतर ३४ वर्षांचा तो सर्वात वयस्कर कसोटी फलंदाज आहे, जेव्हा श्रीलंकेचा खेळाडू ३७ वर्षांचा होता. रूटने त्याचे अव्वल स्थान त्याच्या देशाचा हॅरी ब्रूकला गमावले होते, जो केन विल्यमसनच्या मागे तिसऱ्या स्थानावर घसरला आहे.

भारतीय फलंदाजांमध्ये, सलामीवीर यशस्वी जयस्वाल व उपकर्णधार ऋषभ पंतची प्रत्येकी एक स्थान घसरली आहे आणि ते सध्या



अनुक्रमे पाचव्या आणि आठव्या स्थानावर आहेत, तर कर्णधार शुभमन गिलचीही तीन स्थानांनी घसरण होऊन नवव्या स्थानावर आहे.

तथापि, लॉर्ड्सवर ७२ व नाबाद ६१ धावा काढल्यानंतर जडेजाने पाच स्थानांनी प्रगती करत ३४ व्या स्थानावर झेप घेतली आहे. त्याच सामन्यात १०० आणि ३९ धावा काढणारा केएल राहुल देखील पाच स्थानांनी प्रगती करत जडेजाच्या मागे ३५ व्या स्थानावर आहे. लॉर्ड्सवर ७७ धावा व पाच बळी मिळवणाऱ्या इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने सामनावीर म्हणून केलेल्या कामगिरीमुळे तो फलंदाजांमध्ये दोन स्थानांनी प्रगती करत ४२ व्या स्थानावर आणि गोलंदाजांमध्ये एका स्थानावर ४५ व्या स्थानावर झेप घेत आहे.

**बुमराह पहिल्या क्रमांकावर कायम**

भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत वर्चस्व राखले आहे. त्याने दक्षिण आफ्रिकेच्या कॅगिसो रबाडावर ५० गुणांची आघाडी घेतली आहे.

ऑस्ट्रेलियाचा जलदगती गोलंदाज स्कॉट बोलंडने लक्षणीय झेप घेतली आहे, तो सहा स्थानांनी पुढे जाऊन कारकिर्दीतील सर्वोत्तम सहाव्या स्थानावर पोहोचला आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये ६२ बळी घेणारा बोलण्ड केवळ १६.५३ च्या सरासरीने बळी टिपत आहे, तर आयसीसी हॉल ऑफ फेममधील जॉर्ज लोहमन व सिडनी बार्न्सने चांगल्या सरासरीने बळी टिपल्या आहेत. तो त्याच्या चार देशबांधवांमध्ये सहभागी झाला आहे जे आधीच अव्वल १० मध्ये आहेत- पॅट कमिन्स, जोश हेझलवूड, नॅथन लायन आणि मिशेल स्टार्क. ◂(वृत्तसंस्था)

# सिंधू जपान ओपनमधून बाहेर; लक्ष्य, सात्त्विक-चिराग दुसऱ्या फेरीत

◆ **टोकियो, १६ जुलै**

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू हिचे पुन्हा एकदा पहिल्याच फेरीतून आव्हान संपुष्टात आले, परंतु लक्ष्य सेन आणि सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या पुरुष दुहेरी जोडीने बुधवारी येथे जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेत सहज विजयांसह दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

माजी विश्वविजेती असलेली ३० वर्षीय सिंधू सुपर ७५० स्पर्धेत कोरियाच्या सिम यू जिनकडून १५-२१, १४-२१ असा पराभव पत्करावा लागला. या वर्षी तिचा पहिल्या फेरीतील पाचवा पराभव झाला. दुसरीकडे, सात्त्विक-चिराग व लक्ष्य सेन यांनी सरळ गेममध्ये प्रभावी विजय नोंदवले.

संथ सुरुवातीनंतर सिंधूने पहिल्या गेममध्ये काही संघर्ष केला, परंतु सिमने भारतीय स्टारवर कारकिर्दीतील पहिला विजय मिळवण्यासाठी नियंत्रण मिळवले. दुसऱ्या गेममध्ये सिंधू लवकरच १-६ ने मागे पडली. जरी तिने ११-११ अशा गुणांनी बरोबरी मिळविली असली तरीही कोरियन खेळाडूने सहजतेने सामना जिंकला.

पुरुष दुहेरीत, सध्या जगात १५ व्या क्रमांकावर असलेल्या सात्त्विक आणि चिरागने कांग मिन ह्युक आणि किम डोंग जू या कोरियन जोडीचा केवळ ४२ मिनिटांत २१-१८, २१-१० असा पराभव केला.

या माजी प्रथम विश्वमानांकित जोडीला स्थिरावण्यास



थोडा वेळ लागला, पहिल्या गेमच्या सुरुवातीलाच कोरियन जोडीने त्यांच्याशी बरोबरी साधली. पण भारतीयांना त्यांची लय गवसल्यानंतर ते अजिंक्य राहिले .

दरम्यान, या हंगामात फॉर्मसाठी संघर्ष करणाऱ्या व पहिल्या फेरीत सलग बाहेर पडणाऱ्या लक्ष्य सेनने चीनच्या वांग झेंग झिंगचा २१-११, २१-१८ असा पराभव केला. जागतिक क्रमवारीत १८ व्या स्थानावर असलेल्या लक्ष्यने पहिल्या गेममध्ये पूर्ण नियंत्रण ठेवले. दुसऱ्या गेममध्ये झिंगने चांगले आव्हान उभे केले, परंतु लक्ष्यने सुरुवातीच्या गतीचा फायदा घेत आघाडी कायम ठेवली आणि सरळ गेममध्ये सामना संपवला. पुढील फेरीत त्याचा सामना सातव्या मानांकित व स्थानिक आवडत्या कोडाई नारोकाशी होईल. ◂(वृत्तसंस्था)

# आयएसएल अनिश्चिततेवर सुनील छेत्रीचा आशेचा संदेश

◆ **नवी दिल्ली, १६ जुलै**

इंडियन सुपर लीगचे भविष्य धोक्यात आल्यानंतर बंगळुरू एफसीचा कर्णधार सुनील छेत्रीने समाज माध्यमावर आशेचा संदेश दिला आणि भारतीय फुटबॉल परिसंस्थेला मजबूत राहण्याचे आणि वादळाचा एकत्रितपणे सामना करण्याचे आवाहन केले.

इंडियन सुपर लीग (आयएसएल) आयोजित करणारी आयएमजी रिलायन्सची उपकंपनी फुटबॉल स्पोर्ट्स डेव्हलपमेंट लिमिटेडने (एफएसडीएल) ऑल-इंडिया फुटबॉल फेडरेशन (एआयएफएफ) सोबतच्या कराराच्या मुदतवाढीबाबत रखडलेल्या वाटाघाटींमुळे आयएसएलचा आगामी २०२५-२६ हंगाम स्थगित केला आहे.

सहभागी क्लबना लिहिलेल्या पत्रात, एफएसडीएलने कळवले आहे की त्यांना आयएसएल २०२५-२६ हंगाम स्थगित करावा लागत आहे, कारण ते '२०२५-२६ आयएसएल हंगामाचे प्रभावीपणे नियोजन, आयोजन किंवा व्यावसायिकीकरण करण्यास असमर्थ आहे'. कारण मास्टर राइट्स करार (एमआरए) बाबत कोणताही करार झालेला नाही व हा करार ८ डिसेंबर २०२५ रोजी संपणार होता.

हंगाम सुरू न होताच, क्लबना त्यांच्या प्री-सीझन योजना पुढे ढकलाव्या लागल्या, ज्यामुळे काही आयएसएल क्लबनाही ड्युरंड चषकातून माघार घ्यावी लागली.

सुरुवातीला त्याला आनंद देणारा संदेश आता चिंतेचा विषय बनला आहे, असे सुनील छेत्री म्हणाला.

'काही आठवड्यांपूर्वी जेव्हा माझा फोन प्री-सीझनला पंधरा दिवस उशिरा होणार असल्याची माहिती देणारा बंद झाला, तेव्हा मला हसू आले हे मी मान्य करतो. कारण मी सुट्टीवर होतो. माझ्याकडे तंदुरुस्त होण्यासाठी मी जितका वेळ मागितला होता त्यापेक्षा जास्त वेळ मिळाला होता. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# शेतीच्या वादातून मुंढे खूनप्रकरणी आरोपीस जन्मठेप

## पांगरी पोलीसांच्या तपासास यश

## सरकारी वकिलाची कामगिरी सरस

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१६ जुलै-**

उक्कडगाव (ता. बार्शी) येथे शेतीच्या वादातून २०२० साली झालेल्या निर्दयी खुनाच्या प्रकरणात आरोपी महादेव बाजीराव मुंढे (रा. उक्कडगाव, ता. बार्शी) यास जिल्हा व सत्र न्यायाधीश विक्रम मांडे यांनी दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा व तीन हजार रुपयांच दंड ठोठावला. दंड न भरल्यास एक महिन्याच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.



मयत - सर्जेराव मुंढे

**पोलीस तपास व आरोपपत्र**

या प्रकरणी पांगरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण शिरसाट यांनी केला. तपासात प्रत्यक्षदर्शी व अप्रत्यक्ष साक्षीदारांच्या जबाबावरुन आरोपींनीच हा खून केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आरोपींना अटक करुन त्यांच्या विरोधात पुरावे गोळा करुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**न्यायालयीन प्रक्रिया व साक्षीदारांचे योगदान**



खटल्याच्या सुनावणीत एकूण १७ साक्षीदार तपासण्यात आले. त्यात तात्याराव मुंढे, सुनील सानप (आयडिया कंपनी नोडल अधिकारी), पोलीस कॉन्स्टेबल मनोज जाधव यांची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली. याशिवाय डॉक्टरांची वैद्यकीय साक्षही महत्त्वपूर्ण ठरली.

**सरकार पक्षाचे प्रभावी प्रतिनिधीत्व**

या प्रकरणात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील दिनेश देशमुख व वकील प्रदीप बोचरे यांनी काम पाहिले. त्यांनी तपासातील पुरावे आणि साक्षी न्यायालयात प्रभावीपणे मांडले.

**पोलीस यंत्रणेचा कसून प्रयत्न**

या खटल्याच्या यशस्वी निकालामागे बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल व पांगरी पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक हेमंतकुमार काटकर यांचे मार्गदर्शन लाभले. कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून प्रभाकर गायकवाड व पोलीस हवालदार कुणाल पाटील यांनी जबाबदारीचे काम पार पाडले.

### घटना कशी घडली?

ही घटना २७ जानेवारी २०२० रोजी सायंकाळी ६.४५ ते ७.१५ च्या दरम्यान मौजे उक्कडगाव येथे घडली. फिर्यादी मयताची पत्नी असून, मयत सर्जेराव सोमनाथ मुंढे (वय-६१) हे आरोपी महादेव बाजीराव मुंढे यांचे चुलत भाऊ होते. त्यांच्यामध्ये वडीलोपार्जित ६ एकर शेती व त्या शेतातील विहिरीचे व बोअरचे पाणी यावरुन वाद होता. या वादावरुन बार्शी दिवाणी न्यायालयात दावा सुरु होता. या वादातून आरोपी महादेव मुंढे यांनी जमीन न देता जीवे मारतो अशी धमकी दिली होती. दि. २७ जानेवारी २०२० रोजी बाबुराव सांगळे यांच्या घरासमोरील रस्त्यावर विजेच्या खांबाजवळ सर्जेराव मुंढे यांना आरोपी महादेव बाजीराव मुंढे, गणेश महादेव मुंढे व बाजीराव कृष्णा मुंढे यांनी मिळून डोक्यात मोठा दगड घालून ठार मारले.

## महत्वाचे...

### अरण येथून १० वर्षीय बालक बेपत्ता

**मोडनिंब, दि. १६ जुलै -**

माढा तालुक्यातील अरण येथून १० वर्षीय बालक बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. अरण येथील कार्तिक बळीराम खंडाळे हा मुलगा १५ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता संत सावता माळी विद्यालयाच्या मैदानावरून गावातील जत्रेमध्ये खेळण्यासाठी जातो असे सांगून घरातून बाहेर पडला. मात्र, तो अद्याप घरी परतलेला नाही.या प्रकरणी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून मुलाला पळवून नेले असावा, असा संशय असल्याची तक्रार टेंभुर्णी पोलीस ठाण्यास प्राप्त झाली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कार्तिकचे वर्णन गोरा रंग, अंगात निळ्या रंगाचा हाफ बाह्यांचा टी-शर्ट, फिकट निळ्या रंगाचा हाफ बर्मुडा ज्यावर लाल रंगाच्या पट्ट्या आहेत, उजव्या पायात काळ्या रंगाचा दोरा, पायात काळ्या रंगाच्या चप्पला, कपाळी लाल रंगाचा गंध असे वर्णन आहे. कार्तिक कोणास दिसल्यास किंवा आढळून आल्यास त्यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी केले आहे.



### आलाट यांचे मरणोत्तर देहदानाचे प्रतिज्ञापत्र

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

औदुंबर आलाट यांचे वय ६७ वर्षे असून गेली ४० वर्षे झाले सोलापूर शहरात ॲटोरिक्षा चालवून कुटुंबाचा सांभाळ करणारे आपण जगाचा निरोप घेणे आगोदर आपला देह पुढील पिडी जे मेडिकल क्षेत्रात शिक्षण घेतात त्यापैकी काही तरूण तरूणी डॉक्टरीचा अभ्यास करतात त्यांचे शिक्षणास आपल्या देहातून शिक्षण घेण्यास मदत व्हावी अशी संकल्पनेतून डॉ. वैशंपायन स्मृति वैद्यकीय महाविद्यालयाचे शरीररचना शास्त्र विभाग प्रमुख यांना मरणोत्तर देहदानाचे प्रतिज्ञापत्र दिले यामध्ये औदुंबर आलाट यांचे नातेवाईकानीही पाठींबा दर्शविला. डॉ. वैशंपायन महाविद्यालयाचे शरीर रचना शास्त्र विभागाचे विभाग प्रमुखांनी आभारपत्र प्रदान केले.



### उडत गेला सोन्या' हे 'जेन झी' ब्रेकअप साँग प्रदर्शित

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

'येरे येरे पैसा ३' या बहुप्रतिक्षित मराठी चित्रपटाची सध्या सर्वत्र जोरदार चर्चा आहे. ट्रेलरला आणि टायटल ट्रॅकला मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर आता या चित्रपटातील दुसरे गाणे 'उडत गेला सोन्या' प्रदर्शित झाले असून, त्याने प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. हे गाणे एका वेगळ्या आणि मनोरंजक पद्धतीने सादर करण्यात आले आहे. चित्रपटाच्या पहिल्या भागात सनी आणि बबलीचे गोड प्रेम प्रेक्षकांनी अनुभवले होते. परंतु आता 'येरे येरे पैसा ३' मध्ये सनीचे लग्न दुसऱ्याच मुलीशी होत असल्याने बबलीचे मन तुटले आहे. बबली तिच्या मनातील भावना या गाण्यातून व्यक्त करताना दिसतेय.

## निधन वृत्त...

### निर्मला जाधव

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

निर्मला लालू जाधव (वय ७२) रा. उमेदपूर सुवर्ण मंगल कार्यालयाजवळ डोणगांव रोड यांचे अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर मध्य रेल्वे विभागातील निवृत्त मेकॅनिक लालू यशवंत जाधव यांच्या त्या पत्नी होत.



### चंद्रभागाबाई जाधव

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

चंद्रभागाबाई अर्जुन जाधव (रा. निंबाळ, जि. विजापूर) वय ७५ वर्ष यांचे अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात सावत्र दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नावतंडे असा परिवार आहे. निवृत्त पोलीस निरीक्षक तानाजी जाधव व निवृत्त पोलीस हवालदार पाडुरंग जाधव यांच्या त्या मातोश्री होत.



### महादेव काकडे

**श्रीपूर, दि. १६ जुलै-**

पंढरपूर येथिल व्यापारी महादेव काकडे यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. श्रीपूर येथिल कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे मुख्य लेखापाल रविंद्र काकडे तसेच पंढरपूर एसटी बस आगाराचे पार्सल प्रमुख राहुल काकडे यांचे ते वडिल होत. त्यांचे पश्चात दोन मुले, एक मुलगी नातवंडे असा परिवार आहे.



### श्रीवर्धन दिकोंडा

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

विजापूर रोड इंदिरानगर येथील रहिवासी श्रीवर्धन हर्षवर्धन दिकोंडा (वय ४५) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने रविवार १३ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, आई, पत्नी व दोन मुले आहेत. विजापूर रोड येथील भागातील एच आर व्हील चे ते भागीदार होते. माजी आमदार विठ्ठलराव दिकोंडा यांचे ते नातू होते.



### शाकुबाई शिंदे

**पंढरपूर दि. १७ जुलै**


आंबे येथील रहिवासी शाकुबाई बाळकृष्ण शिंदे (वय ६७) यांचे बुधवार दि. १७ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दै. एकमत प्रतिनीधी रामचंद्र बाळकृष्ण शिंदे यांच्या मातोश्री तर दिलीप नागणे यांच्या सासू होत.



### विठ्ठल झिंजुर्डे

**सोलापूर, दि.१६ जुलै-**

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील रहिवासी व सध्या मुरारजी पेठमधील उज्वल हाऊसिंग सोसायटी येथील रहिवासी विठ्ठल नारायण झिंजुर्डे यांचे निधन झाले. मृत्युसमयी ते १०३ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, परतुंडे असा परिवार आहे. शुद्ध शाकाहारी जीवन जगत असल्यामुळे आपण शतायुषी झालो असल्याचे विठ्ठल झिंजुर्डे हे नेहमी सांगत असत.





# लोकमंगल कृषी महाविद्यालयास 'दक्षिण'च्या ५० शेतकऱ्यांनी भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जुलै-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे दि. १६ जुलै रोजी दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर, वडकबाळ, राजुर, होनमुर्गी, होटगी, कुडल येथील ५० शेतकऱ्यांनी सदिच्छा भेट दिली.

अंतिम वर्षातील विद्यार्थी या गावात उपक्रम राबवित असून याचाच एक भाग म्हणून ही सदिच्छा भेट होती. महाविद्यालयात कार्यान्वित गांडूळ खत निर्मिती प्रकल्प, रेशीम शेती, भाजीपाला उत्पादन प्रक्षेत्र, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती युनिट, जैविक खते निर्मिती प्रयोगशाळा, मशरूम उत्पादन युनिट, माती पाणी तपासणी प्रयोगशाळा आणि रोपवाटिका या सर्वांची माहिती शेतकऱ्यांनी घेतली. शेतकऱ्यांसाठी केळी पीक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी पोस्टर व मॉडेलच्या माध्यमातून केळी पिकातील बारकावे आणि आधुनिक तंत्रज्ञान समजावून सांगितले. केळी लागवडीपासून ते त्याची निर्यात करेपर्यंत आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी शास्त्रोक्त पद्धतीने विद्यार्थ्याद्वारे यावेळी मांडण्यात आल्या. अंतिम वर्षातील विद्यार्थ्यामार्फतच्या मॉड्युलच्या विविध उत्पादनाच्या दालनास शेतकऱ्यांनी भेट देऊन कृषी उत्पादनांची खरेदी केली.

शेतकऱ्यांनी या सहलीच्या आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे आणि रावेच्या विद्यार्थ्यांचे विशेष आभार मानले. सहलीच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. शेतकऱ्यांच्या सदिच्छा भेटीचे आयोजन व यशस्वीतेसाठी कृषी विस्तार विभाग प्रमुख प्रा. प्रज्ञा कुदळे आणि रावेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# वैदवस्ती शाळेची यशोगाथा थेट राष्ट्रीय पोर्टलवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१६ जुलै-**

करमाळा तालुक्यातील वैदवस्ती (देवळाली) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची यशोगाथा नवी दिल्ली येथील राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (निपा) यांच्या शिक्षण मंथन या बुकलेटमध्ये राष्ट्रीय पोर्टलवर प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे ही शाळा आता थेट राष्ट्रीय पातळीवर झळकली आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व नियोजन संस्था (मिपा) छत्रपती संभाजी नगर द्वारा आयोजित सन २०२४ -२५ करिता यशोगाथा संकलनात वैद वस्ती शाळेची यशोगाथा प्रकाशित झाली. शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम, वंचितांचे शिक्षण, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राबविलेले उपक्रम, विद्यार्थी व पालकांमधील अज्ञान, अंधश्रद्धा दूर करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न या सर्वांमुळे नवी दिल्ली येथील राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (निपा) या संस्थेने शिक्षण मंथन या बुकलेट मध्ये शाळेची यशोगाथा राष्ट्रीय पोर्टलवर प्रसिद्ध केली आहे. राज्यातील निवडक शाळांमधून वैदवस्ती जिल्हा परिषद शाळेची निवड होणे ही सोलापूर जिल्ह्यासाठी तसेच या छोट्याशा गावासाठी गौरवाची बाब ठरली आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका प्रफुल्लता सातपुते व त्यांचे सहकारी शिक्षक यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने केलेले प्रयत्न त्यामुळे यश प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांमधील अंधश्रद्धा कमी करण्याचे कार्य तसेच सायन्स वॉल च्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचे कार्य शाळेने केले आहे. राष्ट्रीय पोर्टलवर शिक्षण मंथन या बुकलेटमध्ये पहिल्या पानावर वैदवस्ती शाळेच्या सायन्स वॉलचा फोटो प्रसिद्ध झाला आहे.



### राष्ट्रीय पोर्टलवरील निवड प्रेरणादायी



शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न, संस्कार, शाळा व्यवस्थापनातील कौशल्यामुळे वैद वस्ती शाळेची यशोगाथा इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. अशा शाळांच्या यशोगाथा राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध करून इतरांनीही त्या वाचाव्यात, आदर्श घ्यावा या हा यामागचा उद्देश आहे. शाळेचा विकासात ग्रामपंचायत देवळाली तसेच वैद वस्ती शाळा व्यवस्थापन समिति व ग्रामस्थांचे मोठे योगदान मिळालेले आहे.

**- प्रफुल्लता सातपुते, मुख्याध्यापिका,**
**जि .प.प्रा. शाळा, वैद वस्ती, ता. करमाळा.**

### नाविन्यपूर्ण उपक्रम

विद्यार्थ्यांची बोलीभाषा तेलगू असल्याने त्यांना प्रमाण भाषा व बोलीभाषा यांची सांगड घालून अध्यापन केले जाते. आनंदायी शिक्षण, डिजिटल व कृतीयुक्त शिक्षण, वृक्षारोपण ,नवभारत उल्हास साक्षरता अभियान ,सांस्कृतिक कार्यक्रम ,शैक्षणिक क्षेत्र भेट, अंधश्रद्धा निर्मूलन ,बुके ऐवजी बुक चा वापर, महिला मेळावे, सुसज्ज ग्रंथालय इत्यादी उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला जातो.

# माढ्यात जिल्हा परिषदेसाठी सात गट

## पंचायत समितीसाठी १४ गण असणार

## प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.१६ जूलै-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका प्रलंबित आहेत. त्या आता होण्याची चाहुल लागली असून माढा तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांची प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

गट व गणातील गावे पुढीलप्रमाणे :

१) **भोसरे गट : भोसरे गण** - भोसरे, वडाचीवाडी (त.म), चिंचगाव, म्हैसगाव, लह्, अकुलगाव, तडवळे.

**रोपळे (क) गण** - लोणी, नाडी, मुंगशी, शिंगेवाडी, महादेववाडी, बिटरगाव, रोपळे (क), कव्हे, बारलोणी, गवळेवाडी.

२) **मानेगाव गट : मानेगाव गण** - मानेगाव, हटकरवाडी, कापसेवाडी, धानोरे, बुद्रुकवाडी, रिधोरे, तांदूळवाडी, केवड, चव्हाणवाडी, राहूलनगर, वडाचीवाडी (अं.उ.), जामगाव, अंजनगाव (उमाटे).

**दारफळ गण** - वडशिंगे, निमगाव (मा.), महातपूर, दारफळ, उंदरगाव, विठ्ठलवाडी, वाकाव, खैरेवाडी, लोंढेवाडी, कुंभेज, खैराव, पापनस.

३) **उपळाई बुद्रुक गट : उपळाई बुद्रुक गण** - उपळाई बुद्रुक, उपळाई खुर्द, अंजनगाव (खेलोबा), रोपळे (खुर्द), बावी. **भुताष्टे गण** - जाधववाडी (मा.), शिंदेवाडी, रणदिवेवाडी, सापटणे (भो), भुताष्टे, पडसाळी, भेंड, सोलंकरवाडी, घाटणे, वेताळवाडी.



४) **कुर्डू गट : कुर्डू गण** - ढवळस, भोगेवाडी, जाखले, चोभेपिंपरी, अंबाड, पिंपळखुटे, कुर्डू, उपळवाटे.

**अकोले (खुर्द) गण** - शेडशिंगे, दहिवली, कन्हेरगाव, बादलेवाडी, निमगाव (टें), सुर्ली, फुटजवळगाव, अकोले खुर्द, उजनी (के), शिराळ (टे),

५) **टेंभूर्णी जिल्हा परिषद गट : टेंभुर्णी गण** - नर्गोली, टेंभुर्णी, चव्हाणवाडी (टे.). **रांझणी गण** - आलेगाव बुद्रुक, आढेगाव, वडोली, आलेगाव खुर्द, गारअकोले, टाकळी (टे), रूई, चांदज.

६) **बेंबळे गट : बेंबळे गण** - बेंबळे, हरिनगर, घोटी, मिटकलवाडी, शेवरे, माळेगाव, परिते.

**पिंपळनेर गण** - तांबवे, वेणेगाव, अकोले (बु), पिंपळनेर, सापटणे (टे), आहेरगाव,भुईंजे,पालवण,अकुंभे, शिराळ(मा)

७) **मोडनिंब जिल्हा परिषद गट : मोडनिंब गण** - मोडनिंब,जाधववाडी (मो.), बैरागवाडी, अरण.

**लऊळ गण** - लऊळ, उजनी (मा.), व्हळे (खुर्द), वरवडे, तुळशी, परितेवाडी.

# मंगळवेढा पोलीसांचे एसपींकडून कौतुक

## पोलीस अधिक्षक कुलकर्णी यांची पाठखळ घटनास्थाळी भेट

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १७ जुलै-**

पाठखळ येथील कथीत खून घटनास्थळी जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी भेट देवून या घटनेमागची कारणे जाणून घेतली. दरम्यान मंगळवेढा पोलीस पथकाने २४ तासात दुहेरी घटना प्रकरणाचा छडा लावल्या मुळे त्यांनी विशेष कौतुक केले.

दि.१४ जुलै रोजी रात्री दोन वाजता आरोपी निशांत सतिश सावत व विवाहिता किरण नागेश सावत या दोघांचे एकमेकांचे प्रेमसंबंध असल्याने पळून जावून कायमचे एकत्र राहण्यासाठी गोपाळपुरातील एका वेडसर महिलेला येथे आणून तिला कडब्याच्या गंजीत जाळून तिचा खून करण्याचा प्रकार घडला होता. या घटनास्थळाला सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी भेट देवून घटनेची संपूर्ण माहिती जाणून घेतली. ही घटना जिल्हाभर गाजल्याने या घटनेकडे तमाम जिल्हावासीयांचे लक्ष लागून राहिले होते. पोलीस अधिक्षक कुलकर्णी यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, मंगळवेढा पोलीस टीमने चांगले काम करुन दुहेरी घटना उघडकीस आणल्याने त्यांचे कौतुक केले.

# सरपंच आरक्षणामुळे अनेक गावात चुरस

## आरक्षणामुळे इच्छुक लागले तयारीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै -**

सन २०२५ ते २०३० या काळात होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणूकीतील सरपंचपदासाठी मंगळवारी १५ जुलै रोजी आरक्षण सोडत काढण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आरक्षण काढण्यात आले असले तरी यापूर्वी काढलेले आरक्षणच निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे इच्छुकांनी सुरू केलेल्या मोर्चेबांधणीला बळ मिळाले. तहसीलदार किरण जमदाडे यांच्या उपस्थितीत आरक्षण निश्चित करण्यात आले. मात्र अनेक चुरस असणार्या गावात आरक्षण सर्वसाधारण निघाल्याने इच्छुकांची संख्या वाढणार आहे. सर्रसाधारण व नाममात्र प्रवर्ग ओबीसी जागेसाठी इच्छुकांची संख्या वाढल्यास नवल वाटणार नाही. त्यामुळे काढण्यात आलेले आरक्षण राजकारणाला कलाटणी देणारी ठरणार आहे. मंद्रुप, भंडारकवठे, कुंभारी, बोरामणी, वळसंग, कंदलगाव, औराद, होटगी, हत्तूर यासारख्या मतदार अधिक असणार्या गावात निवडणूकीत रंगत येणार आहे. अनेक गावांच्या निवडणूका सहा महिन्यावर आल्या असून जिल्हा परीषद व पंचायत समिती निवडणुकीनंतर त्यांचाही निवडणूकीचा बार उडणार आहे. त्यामुळे राजकीय समीकरणे बदलणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



### या गावात असणार चुरस

प्रत्येक गावात इच्छुकांची संख्या अधिक असले तरी मंद्रुप, भंडारकवठे, निंबर्गी , औराद, हत्तूर, होटगी, बोरामणी, कुंभारी, वडकबाळ, वळसंग,कंदलगाव, नांदणी आदी गावात सरपंच निवडणूकीत चुरस दिसणार आहे.

* **सर्वसाधारण (जनरल)** - मंद्रूप, वांगी, कुंभारी, धोत्री, मनगोळी, तीर्थ, कुडल, हिपळे, सादेपूर, अंत्रोळी, वरळेगाव, वडकबाळ, संगदरी, हत्तूर-चंद्रहाळ, सिंदखेड, आचेगाव, तेलगाव (मंद्रूप) कुसूर-खानापूर, कुरघोट, घोडातांडा, लिंबीचिंचोळी, उळे.
* **सर्वसाधारण महिला** - होटगी स्टेशन, इंगळगी, चिंचपूर, तांदूळवाडी, निंबर्गी, रामपूर, वळसंग, कासेगाव, बोळकवठे/बंदलगी, येळेगाव, मुस्ती, दोड्डी, तोगराळी / गुर्देहळ्ळी, बंकलगी, शिरवळ, वडगाव-शिरपनहळ्ळी, कारकल, फताटेवाडी, कर्देहळ्ळी, औराद, औज (मंद्रूप), आहेरवाडी.
* **नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी)** - अकोले (मंद्रूप), बोरामणी, होटगी सावतखेड, माळकवठे, बरूर, बोरुळ, दिंड्रर, मद्रे, कंदलगाव, गुंजेगाव, वडजी.
* **नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी महिला)** - भंडारकवठे, बाळगी, दर्शनहळ्ळी, शिंगडगाव, वडापूर, नांदणी, तिल्हेहाळ, उळेवाडी, विंचूर, लवंगी, बक्षीहिप्परगे.
* **अनुसूचित जाती (एस.सी)** - औज (आ.), गावडेवाडी, टाकळी, यत्नाळ, हणमगांव, मुळेगाव तांडा.
* **अनुसूचित जाती (महिला)** - आलेगाव, बसवनगर, गंगेवाडी, पिंजारवाडी, शंकरनगर, कणबस, हत्तरसंग.
* **अनुसूचित जमाती (एस.टी)** - मुळेगाव, संजवाड.
* **अनुसूचित जमाती-महिला (एस.टी)** - होनमुर्गी/बिरनाळ, राजूर

## महत्वाचे...



### हरि ओम संस्थेतर्फे सीएम परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

विणकर बाग येथे पूर्व विभागातील सहा विद्यार्थी सीएमध्ये प्राविण्य मिळविल्याबद्दल हरि ओम विणकर बाग बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन आरकाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. यावेळी शुभम चन्ना, निखिल चिलका, अक्षय पिसके, श्वेता सिद्राल, रचना माटेटी, अनुजा गोली या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक लक्ष्मीकांत दंडी व सूत्रसंचालन गणेश सिद्धम यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी गिरीश शंकू, अशोक याझा, संजीव नादरगी, हिरालाल धुळम, जगदीश बोमद्याल, अंबादास जक्कन, बालाजी माचरल उपस्थित होते.

### लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार; लग्नास नकार देणाऱ्या तरूणाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १६ जुलै -**

लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार करून लग्नास नकार देणाऱ्या तरूणाविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरुन तौफिक मेहबूब सय्यद (वय २४, रा. नई जिंदगी, प्रणिती शाळेजवळ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता ही १२ मे ते १४ जुलै २०२५ या कालावधीत तौफिक सय्यद याच्यासोबत राहात होती. त्यावेळी तौफिक याने पिडीतेला आपण लग्न करणार आहोत असे सांगून पिडीतेला विश्वासात घेऊन तिची इच्छा नसतानाही तिच्याशी जवळीक साधून तिच्याशी शरीरसंबंध ठेवले. पिडीतेने तौफिक यास लग्नाबाबत विचारले असता त्याने पिडीतेला शिवीगाळ, दमदाटी करून मारहाण केली. तसेच मी तुझ्याशी लग्न करणार नाही असे म्हणून निघून गेला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक केंद्रे पुढील तपास करीत आहेत.



### पोलिस मित्र संघटनेतर्फे आदर्श शिक्षक, गुणवंतांचा सत्कार

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

स्वराज्य पोलिस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श शिक्षक व गुणवंत विद्यार्थी यांचा पुरस्कार व गुणगौरव सोहळा छत्रपती शिवाजी महाराज रंगभवन (समाजकल्याण केंद्र) येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्य महिला अध्यक्षा धनश्री उत्पात, पोलीस उपनिरीक्षक राणी झांबरे, प्राचार्य डॉ. बापूसाहेब आडसूळ, प्रसिद्धी प्रमुख उमेश काशीकर, जिल्हाध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक उपस्थित होते. प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक संघटनेचे शहर अध्यक्ष विनोद भोसले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष दिनेश काटकर, सचिव प्रकाश चव्हाण, कार्याध्यक्ष दत्तात्रय दळवी, महिला उपाध्यक्ष स्मिता पाठक, संतोष पंतोजी, जयकर ठोंबरे, विजय शेलार, सोमनाथ कस्तुरे, इम्तियाज लाला, नामदेव दिकोंडा, प्रेमलता वैध, मोनाली पागे, वैशाली गोरे, मंजुषा डोईफोडे, सपना कांबळे, विजयालक्ष्मी कुलकर्णी, श्रीदेवी बिराजदार, निता आकुडे जाधव यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन वैभव शेटे यांनी केले तर आभार ईफतीकर कामतीकर यांनी मानले.

### जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे दिव्यांग परिवाराच्या निवासस्थानी मोफत विधी सेवा

**सोलापूर दि.१६, जुलै-**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर अंतर्गत लोक अभिरक्षक कार्यालय येथे दि. १५ जुलै रोजी एक ८० वर्षीय वृद्ध रा. वेडर पूल लष्कर हे स्वतः आजारी असून त्यांची चारही मूलं दिव्यांग असल्याचे सांगितले व त्यापैकी एक मुलावर दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल होवून न्यायालयात हजर होण्यासाठी समन्स बजावणी झाल्याने मोफत विधी सेवेची मागणी करण्यात आली होती. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे दिव्यांग परिवारास निवासस्थानी मोफत विधी सेवा देण्यात आली. ही वृद्ध व्यक्ती शारिरीकदृष्ट्या अत्यंत कमकुवत तसेच आधाराशिवाय चालू शकत नसल्याने व मुलगा दिव्यांग असल्याने लोक अभिरक्षक कार्यालयात येवून मोफत विधी सेवेचा अर्ज भरून देण्यास असमर्थ होते. या सर्व परिस्थितीचे गांभीर्य अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली समितीच्या माध्यमातून लोक अभिरक्षक ॲड. स्नेहल राऊत यांनी त्वरीत विधी स्वयंसेवक विमला गुळेद व हुसेनवी खरादी यांच्या मार्फत सदर वृद्ध व्यक्तीच्या प्रकृतीची विचारणा करून सदर विधी स्वंयसेवेकांच्या सहाय्याने त्यांच्या निवासस्थानी सुरक्षित पोहचवून मोफत विधी सहाय्य देण्याकरिता दिव्यांग मुलाचे अर्ज व वकील पत्र भरून घेतले तसेच दिव्यांगाबाबतचे कागदपत्र घेवून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांच्याकडे सादर केले. या प्रकरणात त्वरीत मुख्य लोक अभिरक्षक ॲड. स्नेहल राऊत यांनी आरोपीस व्यक्तीशः हजर न राहता विधीज्ञांमार्फत हजर राहण्याची कायदेशीर तरतूदीचे मार्गदर्शन करून सदर प्रकरण हे सहाय्यक लोक अभिरक्षक. सिद्धाराम म्हेत्रे यांना सोपविले. सदर मोफत विधी सेवा लाभार्थीस जामीनावर मुक्त करून दिव्यांगास गुणवत्तापूर्ण मोफत सेवा दिली, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांच्याकडून देण्यात आली.

### मगंळवेढ्यातील बसवेश्वर स्मारकासाठी

# कृष्ण तलावाच्या जागेवरच शिक्कामोर्तब

■ **स्मारक कृती समिती अध्यक्षांच्या प्रयत्नाचे फलित**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर/मंगळवेढा दि. १६ जुलै-**

थोर समतावादी संत आणि लोकशाही संकल्पनेचे प्रणेते जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक मंगळवेढ्यात निर्मितीसाठी राज्य सरकारने हालचाली गतिमान केल्या आहेत.त्याचाच एक भाग म्हणून डॉ.बसवराज बगले यांच्या नेतृत्वाखालील स्मारक कृती समितीने मागणी केलेली कृष्ण तलावाची शासकीय जमीन वर्ग करण्याच्या निर्णयावर मंगळवारी शिक्कामोर्तब झाला

राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंगळवारी विधानभवनात तातडीची बैठक बोलावून या विषयी प्रशासनाला सूचना केल्या आहेत.

बाराशे वर्षापूर्वी सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढ्यात तब्बल ३२ वर्षे वास्तव्य करून लोकशाही मुल्यांची मुहूर्तमेढ केलेल्या महात्मा बसवेश्वर महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक व्हावे ही कर्नाटक




- महाराष्ट्रासह देशभरातील बसवप्रेमी आणि लिंगायत समाजाची मागणी आहे.२०१६ साली शिवा संघटनेचे नेते प्रा.मनोहर धोंडे आणि तत्कालीन सोलापूर जिल्हा अध्यक्ष डॉ.बसवराज बगले यांनी निवेदनाद्वारे या आंतरराष्ट्रीय स्मारकाची मागणी केली होती.त्याची दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मारक निर्मितीची घोषणा करून त्यासाठी शासकीय समिती गठीत केली होती.त्या समितीने कृषी विभागाच्या जमिनीत कृषी पर्यटन केंद्र उभारून त्या अंतर्गत जागेत बसवेश्वरांचे स्मारक करण्याचा चुकीचा निर्णय घेतला होता.परंतु ती जागा उपलब्ध होणार नसल्याने कृष्ण तलाव परिसरात स्मारकासाठी स्वतंत्र जागेचा आग्रह धरण्यात आला होता.

मंगळवार दिनांक १५ जुलै रोजी तातडीची बैठक घेऊन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबत आढावा घेतला आणि स्मारक कृती समितीने सुचविलेली कृष्ण तलावाची शासकीय जमीन वर्ग करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची सूचना केली आहे.या आढावा बैठकीला फक्त भाजपच्या काही आमदारांना आणि अधिकाऱ्यांना आमंत्रित करण्यात आले होते.



#### सात दिवसात जागेचा प्रस्ताव दाखल

दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या शिफारसीनुसार डॉ.बसवराज बगले यांची शासकीय स्मारक समितीवर निवड झाल्यानंतर पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी यांना भेटून शासकीय जमीन स्मारक समितीच्या नांवे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव तयार करण्याची विनंती त्यांनी २३ मार्च २०२२ रोजी पत्राद्वारे केली होती.त्यानुसार निवृत्त मंडल अधिकारी आणि समितीचे सदस्य तुकाराम कुदळे यांच्या मदतीने मंगळवेढ्याचे तहसीलदार आणि प्रांताधिकारी यांनी बसवेश्वर स्मारकासाठी कृष्ण तलावाचीच जागा योग्य असल्याचा विहित नमुन्यातील प्रस्ताव सातव्या दिवशी जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविला होता.मात्र काँग्रेसमधील एका समाजद्रोहीने राजकीय द्वेषातून तक्रार केल्यानंतर सदरची समिती एका महिन्यातच मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी रद्द केली. त्यामुळे स्मारकाच्या कार्याला ब्रेक लागला.

#### आंदोलनाचा इशारा आणि पाठपुरावा

दरम्यान पुन्हा महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीच्या वतीने बसवजयंती दिनापासून आमरण अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा डॉ.बगले यांनी केल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे आणि सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून या संदर्भातील हालचालींना गती आली आहे. लिंगायत नेते आमदार डॉ.विनय कोरे,आमदार दिलीप सोपल,आमदार समाधान आवताडे,आमदार अभिजित पाटील,आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या माध्यमातून स्मारक कृती समितीचे अध्यक्ष डॉ.बसवराज बगले,कार्याध्यक्ष शिवानंद पाटील आणि सिध्देश्वर कोरे,शुभम लिगाडे,संजय पाटील,आदिंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे स्मारकाबाबत सतत पाठपुरावा केला आणि विधानसभेत लक्षवेधी करण्यात आली.त्यामुळेच या स्मारकाविषयी प्रशासन गतिमान झाले आहे.



**तयारी लोकशाहीरांच्या जयंतीची**
सोलापूर : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त भैय्या चौक येथील त्यांच्या पुतळ्यासमोर शामियाना उभारणीचे काम सुरू आहे. (छायाचित्र : केवल तिवारी)

## मैंदर्गी प्रकरणातील आरोपींना दोन दिवस पोलीस कोठडी

**अक्कलकोट दि.१७ जुलै-**

मैंदर्गी येथे मंगळवारी १५ जुलै रोजी सकाळी साडेअकरा वा. सुमारास समाजमाध्यमावर छत्रपती शिवाजी महाराज बद्दल आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्याना आज दोन आरोपींना कोर्टात हजर केले असता दोन आरोपींना दोन दिवसाची पोलिस कोठडी देण्यात आली आहे. यातील एक आरोपी सोहेल रुस्तुम हा अद्याप फरार आहे.

याबाबत फिर्याद अनिल पाटील (वय ४८ वर्षे, व्यवसाय शेती स. गौरी कट्ट मैंदर्गी) यांनी दिली होती. तीन आरोपीवर गुन्हा दाखल झाला असून यातील दोन आरोपी अमन अखिल हवालदार, रुमन शकील हवालदार, रा. मैंदर्गी ता. अक्कलकोट यांना अटक केले होते. त्यांना बुधवारी न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी मिळाल्याची माहिती तपास अधिकारी सहाय्य पोलिस निरीक्षक प्रशांत बदे यांनी दिली. यावेळी कडक पोलीस बंदोबस्त होता.

## डबल मर्डर प्रकरणी दोन आरोपींना उच्च न्यायालयात जामीन मंजूर

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

खानदानी दुश्मनीतून दोघांचा खून केला व एकास गंभीर दुखापत केल्याप्रकरणी आरोपी राहुल बोराडे व आरोपी सुभाष बोराडे यांच्या जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्यासमोर होऊन न्यायमूर्तींनी दोन्ही आरोपींची जामीनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणाची हकीकत अशी की, मयत कृष्णा पाटील व आरोपी बोराडे यांच्यात खानदानी दुश्मनी आहे. आरोपींनी पूर्व वैम नस्यातून कृष्णा पाटील यास जीवे ठार मारण्याचा कट केला व कट रचल्याप्रमाणे कृष्णा पाटील, माणिक सातपुते व सुदाम चव्हाण असे तिघे मोटरसायकल वरून बार्शी कडून ताडसौंदने गावाकडे जात असताना आरोपींनी त्यांच्या मोटरसायकलला समोरून जोरात धडक देऊन खाली पाडून डोळ्यात चटणी टाकून धारदार शस्त्राने डोकीत, पोटावर, हातावर पायावर,सपासप वार करून कृष्णा पाटील व माणिक सातपुते या दोघांचा खून केला व सुदाम चव्हाण यास गंभीर जखमी करून त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला, या आरोपाखाली आरोपी राहुल बोराडे व सुभाष बोराडे यांना अटक करण्यात आलेली होती.

बार्शी सत्र न्यायालयाने आरोपी राहुल बोराडे व आरोपी सुभाष बोराडे यांचा जामीन अर्ज फेटाळल्यानंतर दोघांनी मुंबई उच्च न्यायालयात ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत धाव घेऊन जामीन अर्ज दाखल केला होता. जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्यासमोर झाली. आरोपीचे वकील व सरकारी वकीलांचा युक्तिवाद होऊन न्यायमूर्तींनी आरोपी राहुल बोराडे व आरोपी सुभाष बोराडे यांची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणी दोन्ही आरोपींतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. अश्विनी टाकळकर यांनी काम पाहिले.

## २६वा कारगिल विजय दिवस २५ जुलैला

**सोलापूर दि.१६ जुलै-**

शहीद सैनिकांच्या बलिदानाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी राज्यात दिनांक २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने २६ वा कारगिल विजय दिवस दिनांक २५ जुलै २०२५ (शुक्रवार) रोजी सकाळी ११.३० वाजता बहुउद्देशिय सभागृह, जुने जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमासाठी सकाळी ११.०० वाजता सोलापूर जिल्हयातील वीरपत्नी, वीरमाता-पिता, माजी सैनिक व माजी सैनिक विधवा पत्नी यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहणेसाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर आवाहन करीत आहेत.

## रविवार पेठ येथील खून प्रकरणात तिघांना जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ जुलै -**

पैशाचे व्यवहारातून रविवार पेठेत राहणाऱ्या गोविंद किसन जाधव यांच्या अंगावर चारचाकी गाडी घालून त्यांचा खून केल्याप्रकरणी येथील आरोपी बालाजी शंकर जाधव (वय ३७), तुळजाराम शंकर जाधव (वय ३४), दीपक शंकर जाधव (वय३९, तिघे रा. ११२/९, रविवार पेठ, सोलापूर) यांना प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांनी २५ हजार रूपयांच्या जात मुचलक्यावर जामीन मंजूर केला.

मयत गोविंद जाधव व आरोपी बालाजी जाधव हे दोघे बिल्डिंग मटेरियल पुरवण्याचा व्यवसाय करत होते. मयत गोविंद हा आरोपी बालाजी याचे २ हजार रुपये देणे होता. गोविंद यांचा मुलगा किरण याने चुकून २२०० रुपये आरोपी बालाजी जाधव याचे खात्यावर पाठवले व ती रक्कम किरण याने पुन्हा बालाजी कडून परत घेतली. त्यावेळी आरोपी बालाजी याने किरण याच्याशी वाद घातला. ११ जून २०२५ रोजी सायंकाळी साडेआठच्या सुमारास फिर्यादीचा मुलगा किरण व पती गोविंद हे त्यांचे घरासमोर थांबले असता आरोपी बालाजी याने तिथे येऊन २ हजार रुपये देण्याचे कारणावरून भांडण काढले व फिर्यादीचा मुलगा किरण



व पती गोविंद यांना मारहाण केली. तदनंतर घराशेजारील लोकांनी सोडवासोडव केली.

त्यानंतर आरोपी बालाजी याने त्याचे भाऊ तुळजाराम जाधव व दीपक जाधव यांना फोन करून बोलावून घेतले. त्यावेळी गोविंद जाधव हे घरासमोर बुलेट शेजारी उभे होते. तेवढ्यात आरोपी तुळजाराम व दीपक हे तिथे चारचाकी गाडी वेगात घेऊन येऊन फिर्यादीचे पती गोविंद यास जिवे ठार मारण्याचे उद्देशाने जोरदार बुलेट ला धडक दिली त्यामुळे बुलेट सह गोविंद जाधव खाली पडले. त्यात गोविंद हे जखमी झाल्याने फिर्यादीने पती गोविंद यांना दवाखान्यात घेऊन गेले असता डॉक्टरांनी गोविंद यांना मृत घोषित केले. त्यामुळे फिर्यादी सुशीला गोविंद जाधव यांनी जेलरोड पोलिसात फिर्याद दाखल केली. या गुन्ह्यात १६ जून २०२५ रोजी आरोपींना अटक केली. आरोपींना न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर आरोपींनी जामीन मिळण्याकरीता सत्र न्यायालयात जामीनासाठी अर्ज केला. त्या अर्जाच्या सुनावणीवेळी आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांनी आरोपींचा जामीन मंजूर केला.यात सरकारतर्फे ॲड. आनंद कुरुडकर यांनी तर आरोपींतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. सिद्धाराम पाटील, ॲड. श्रीपाद देशक यांनी काम पाहिले.

## अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव मिरवणुकीस १२ वाजेपर्यंत परवानगी मिळावी

■ **रिपाइंचे निवेदन**

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांची जयंती सोलापूरसह जगभरात मोठ्या उत्साहत साजरी केली जाते. सोलापूर शहरासह जगभरामध्ये आण्णाभाऊंच्या साहित्यांचा जागर करण्यासाठी विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व इतर अनेक प्रकारचे उपक्रम हे जयंती निमित्ताने विविध संस्था, संघटनांमार्फत राबवली जाते. या थोर साहित्यकाला मानवंदन देण्यासाठी सोलापूर शहरातून जयंतीची सांगता हे मिरवणुकीने करण्यात येते.



मिरवणुकीमध्ये आण्णाभाऊंच्या साहित्यांचा जागर करण्यासाठी विविध मंडळाच्यावतीने नवनवीन आण्णाभाऊंच्या कथानकावर आधारीत भव्य देखाव्याचे सादरीकरण करण्यासाठी ढोल, तासे, लेझीम संघाच्या माध्यमातून मिरवणूक काढण्यात येते. सदर मिरवणूकीस कायदेशीर परवानगी घेवून मिरवणूक मार्गावर निघते. परंतू सदर मिरवणूकीस जी वेळ, मर्यादा दिलेली आहे, ती अपुरी असून सदर मिरवणूकीमध्ये बाळ गोपाळासह अबाल वृध्द मोठ्या संख्येने सामील होतात. त्यांना सदर प्रबोधनात्मक देखावे पाहण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे बरेच बाळ गोपाळासह अबाल वृध्द हे देखावे पाहू शकत नाहीत. तरी सदर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या भव्य मिरवणूकीसाठी शासन स्तरावरुन अधिकृत मिरवणूक मार्गही दिलेला आहे. परंतू वेळ मर्यादा रात्री १२ वाजेपर्यंत मिळणे गरजेचे व आवश्यक आहे अशी मागणी रि.पा.इं. (डेमोक्रॅटीक) चे शहराध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळांनी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

या शिष्टमंडळात महिला जिल्हाध्यक्षा पार्वती खरबडे, सिद्राम धोबडे, शहर उपाध्यक्ष किशोर गायकवाड, प्रभाकर आडगळे, बाळू कांबळे, संगीता बिराजदार, संजीव सुरवसे, सचिन चौगुले यांचा समावेश होता.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अल्ट्राएज फायनान्सला स्टार्ट अप इंडिया पुरस्कार जाहीर

### १९ जुलैला राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जुलै-**

सोलापूर येथील अल्ट्राएज फायनान्सने फायनान्सच्या माध्यमातून बँकींग क्षेत्रात शासनाच्या कृषी योजनांचा प्रभावी अंमलबजावणी करून योजना यशस्वी होण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल त्यांना केंद्र सरकारचा स्टार्टअप इंडीया अवॉर्ड जाहीर करण्यात आला आहे. देशभरातून १३ पुरस्कर्त्यांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये सोलापूर येथील अल्ट्राएज फायनान्स याचा समावेश आहे. १९ जुलै रोजी संविधान भवन, संसद मार्ग दिल्ली येथे राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कैलास कसबे अल्ट्राएज फायनान्स सोलापूरचे प्रमुख म्हणून पुरस्कार स्वीकारणार आहेत. अल्ट्राएज फायनान्सला पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सोलापूरचे व्यवस्थापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मत्स्यविकासमंत्री नितेश राणे, सुधीर उडता, श्रीशैल कटीमनी, दाऊद मुल्ला, मधु गायकवाड, भाग्यश्री शिंदे, अमृता डोकडे, विनायक गिडवीर आदींनी अभिनंदन केले.

UltraEdge Fincare
KATHIN SAMAY KA SATHI !

## ▶▶ महत्वाचे...

### कैलास कसबे यांना दिल्ली विद्यापीठाची पीएचडी पदवी

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

येथील कैलास कसबे यांनी फायनान्सच्या माध्यमातून फायनान्स सेक्टर क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना दिल्ली विद्यापीठाकडून पीएचडी पदवी जाहीर करण्यात आली आहे. १९ जुलै रोजी संविधान भवन, संसद मार्ग दिल्ली येथे राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पीएचडी पदवी प्रदान करण्यात येणार आहे. कैलास कसबे दहा वर्षापासून फायनान्स क्षेत्रात कार्यरत आहेत. शिवाय सन २०२१ पासून केंद्र सरकारच्या अधिकृत क्रेडीट काऊन्सलिंग इन्स्टिट्युटमध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या पीएचडी पदवीबद्दल मत्स्यविकासमंत्री नितेश राणे, सुधीर उडता, श्रीशैल कटीमनी, दाऊद मुल्ला, मधु गायकवाड, भाग्यश्री शिंदे, अमृता डोकडे, विनायक गिडवीर आदींनी अभिनंदन केला आहे.



### रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटी अध्यक्षपदी नदाफ, सचिवपदी बसवराज बिराजदार

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटी वर्ष २०२५-२६ करिता अध्यक्षपदी अकबरसाहेब नदाफ तर सचिवपदी बसवराज बिराजदार यांची निवड करण्यात आली आहे. या नूतन कार्यकारणीचा पदग्रहण समारंभ शुक्रवार १८ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वा. दमाणी ब्लड बँक हॉल येथे संपन्न होईल. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट जयेशभाई पटेल उपस्थित राहणार असून असिस्टंट गव्हर्नर अजित दोईजोडे यांचीही उपस्थिती लाभणार आहे.या कार्यकारिणीत महेश साळुंके, अनिल चंडक, नागेश शेंडगे, योगीनाथ कुडते, सत्यम दुधनकर, इक्बाल बागबानांचा समावेश आहे.





### इलेक्ट्रिक डीपीमधील ५४० लिटर ऑईलची चोरी

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

शहरातील तुळजापूर रोडवरील पसारे वस्ती येथे असलेल्या ३१५ केव्ही च्या इलेक्ट्रिक डीपीमधील २१ हजार ६०० रुपये किंमतीचे ५४० लिटर ऑईल चोरट्याने चोरून नेले.याबाबत गंगाधर मल्लिनाथ गुमटे (वय ५३, रा. गुमटे वस्ती, जुना तुळजापूर नाका, शेळगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ जुलै रोजी रात्री चोरट्याने पसारे वस्ती येथील बिन शेती जमीनीवरील ३१५ केव्ही इलेक्ट्रिक डीपीमधील ऑईल चोरून नेले. जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार लोहार तपास करीत आहेत.

### धायटी येथे रविवारी आट्या-पाट्या सामने

**सांगोला, दि.१६ जुलै-**

धायटी (ता. सांगोला) येथे जय हनुमान व श्रीराम क्रिडामंडळ, कै.दिलीप भोसले क्रिडामंडळ, धायटी यांच्यावतीने रविवार [२० जुलै रोजी सायं.७ वा. आट्या-पाट्या सामने आयोजित केले आहेत. या स्पर्धेसाठी प्रथम २५ हजार, द्वितीय २० हजार, तिसरे १५ हजार, चौथे १० हजार, पाचवे ५ हजार पारितोषिक व चषक ठेवण्यात आले आहेत. शो मॅचसाठी ७ हजार ७७७ रुपये तसेच फाटी नंबर-१ ते ६ साठी प्रत्येकी पाचशे रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे. या स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी तानाजी भोसले- ९६२३४५६३६३, वैभव जाधव-८६२३००३६३२ अथना राजेंद्र भोसले-९१५८५४५२२७ यांच्याशी संपर्क साधावा.

### येळेगाव जि.प. शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**दक्षिण सोलापूर, दि. १६ जुलै-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यातर्फे फेब्रुवारी मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत येळेगाव (ता. दक्षिण सोलापूर) जिल्हा परिषद शाळेने यश संपादन केले. संघर्ष मच्छिंद्र गायकवाड हा ग्रामीण अनुसूचित जाती या प्रवर्गातून शिष्यवृत्ती धारक बनला आहे. सदर विद्यार्थ्यास शिक्षिका श्वेता रजपूत यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल केंद्रप्रमुख आम सिद्ध म्हेत्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रुपण्णा बगले, विस्तार अधिकारी आयुब कलबुर्गे, गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आषाढीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या तिजोरीत ११ कोटी जमा

### गेल्या वर्षीपेक्षा यंदा झाले २ कोटी ३५ लाखांचे उत्पन्न

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ जुलै-**

आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांनी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या चरणी दहा कोटी ८४ लाख रुपयांचे दान केले तसेच सोन्या चांदीचे दागिने अर्पण केले असून मंदिर समितीला लाडू प्रसाद, देणगी, भक्तनिवास, हुंडीपेटी, श्रींच्या चरणाजवळ आदी विविध देणग्यांच्या माध्यमातून उत्पन्न मिळाल्याची माहिती मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

यंदा आषाढी यात्रा कालावधीत दर्शनरांगेत भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. भाविकांचे सुलभ जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना देखील मंदिर समितीने केल्या होत्या. आषाढ शुध्द प्रतिपदा (दि. २६ जून) ते आषाढ शुध्द पौर्णिमा (दि. १० जुलै) या कालावधीत भाविकांनी श्रींच्या चरणाजवळ ७५ लाख ५ हजार २९१ रुपये अर्पण केले. २ कोटी ८८ लाख ३३ हजार ५६९ रुपये देणगी, ९ कोटी ४० लाख ४३ हजार ४० रुपये लाडू प्रसाद विक्री,४ कोटी ५४ लाख १ हजार ४५८ रुपये भक्तनिवास, १ कोटी ४४ लाख ७१ हजार ३४८ रुपये हुंडीपेटी, ३ कोटी २४ लाख ५ हजार ६८२ रूपये परिवार देवता तसेच २ कोटी ५९ लाख ६१ हजार ७६८ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून १ कोटी २४ लाख ५ हजार ७५ रुपये व तीन इलेक्ट्रिक रिक्षा व बस चे ३२ लक्ष इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे. मागील वर्षी श्रींच्या चरणाजवळ ७ कोटी ७० लाख ७ कोटी ७० लाख ६ हजार ६९४ रुपये अर्पण, २ कोटी ६९ लाख २२ हजार ५७८ रुपये देणगी, ९ कोटी ८५ लाख ३ हजार रुपये लाडू प्रसाद विक्री, ५० लाख ६० हजार ४३७ रुपये भक्तनिवास, ९३ लाख ५५ हजार ७३ रुपये हुंडीपेटी, ३१ लाख ७९ हजार ६८ रूपये परिवार देवता तसेच २ कोटी २१ लाख ५३ हजार ६०१ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून ६ लाख २८ हजार १०९ रुपये उत्पन्न प्राप्त झाले आहे. सन २०२४ च्या आषाढी यात्रेत ८ कोटी ४८ लाख ५८ हजार ५६० रुपये व या वर्षीच्या यात्रेत १० कोटी ८४ लाख ८ हजार ५३१ रुपये इतके उत्पन्न प्राप्त असून, मागील यात्रेच्या तुलनेत २ कोटी ३४ लाख ४९ हजार ९७१ रुपये इतकी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या मिळालेल्या दानातून श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना पुरेशा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.





## उमा नगरीत क्लिनीक चालविणाऱ्या बोगस डॉक्टराविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ जुलै -**

शहरातील उमा नगरीमध्ये बेकायदेशीरपणे वैद्यकिय क्लिनीक चालविणाऱ्या डॉक्टराविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन अलकुंटे (वय ५०, रा. उत्तर सदर बझार, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सी के. मंडल, त्यांची पत्नी निलीमा मंडल, दिवाशीश दिलीपकुमार शर्मा (रा. १०५/८९, उमा नगर, पुना नाका, मुरारजी पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने शहरात बोगस डॉक्टरांची शोध मोहिम सुरु केली आहे. आरोग्यअधिकारी डॉ. राखी माने यांना उमा नगरी येथे सी के मंडल नावाचा बोगस डॉक्टर क्लिनीक चालवित असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकाने उमा नगरी येथील मंडल यांच्या क्लिनीकमध्ये डमी रूग्ण बनून दोघांना पाठविले व काही वेळानंतर पथकाने पोलिसांसह क्लिनीकवर छापा मारला. त्यावेळी सी के मंडल व त्यांची पत्नी निलीमा मंडल हे या दोघांना त्यांच्या वैद्यकीय व्यवसायासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता नसल्ययाचे दिसून आले. त्यामुळे मंडल चालवित असलेले क्लिनीक हे नोंदणीकृत नसल्याचे उघड झाले. मंडल यांच्या आयुर्वेदिक दवाखान्यामध्ये पथकाने पाहणी केली असता सदर डॉक्टराकडे बोगस डिग्री सर्टीफिकेट आढळून आले. तसेच सदर डॉक्टर हा मुळव्याध, हायड्रोक्लीस, पाईल्स, फिस्तुला, संधीवात आणि सेक्स स्पेशालिस्ट उपचार करीत असल्याचे दिसून आले. तसेच येथील स्टाफ दिपवाशीश शर्मा हा जनरल प्रॅक्टीस, ड्रेसिंग करणे, इंजेक्शन देणे, ॲलोपॅथीची सर्व औषधे रुग्णांना देत असल्याचे दिसून आले. अशाप्रकारे तिघांनी सामान्य नागरीकांची व प्रशासनाची फसवणुक केली. त्यामुळे याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

## इक्बाल मैदान स्वच्छ करा; अन्यथा कचरा पालिकेत फेकू

● स्थानिक प्रशासनाला जाग कधी येणार; लोकांच्या मृत्यूची वाट पाहताय का?

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. १६ जुलै -**

शहरातील इक्बाल मैदान सद्यस्थितीत कचरा डेपो झाले आहे. फारूक शाब्दी यांनी महानगरपालिका अधिकाऱ्यांना कॉल करून येथील कचरा तुमच्या दालनात आणून फेकू का, दोन दिवसांत इक्बाल मैदान स्वच्छ झाले नाही तर एमआयएम पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

इक्बाल मैदान येथील कचरा वेळेवर स्वच्छ न केल्याने आजूबाजूच्या परिसरात रोगराई पसरली जात आहे. एमआयएम पक्षाचे शहर अध्यक्ष फारूक शाब्दी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मंगळवारी सायंकाळी पाहणी केली. इक्बाल मैदानात झालेल्या कचराकुंडीमुळे आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सोलापूर महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने शुक्रवार पेठ, बाशा पेठ, शनिवार पेठ आदी भागातील नागरिक रोगीष्ठ होत चालले आहेत. एमआयएमचे शहर अध्यक्ष फारूक शाब्दी यांनी मंगळवारी सायंकाळी कार्यकर्त्यांसह माजी नगरसेवकांसोबत इक्बाल मैदानाची पाहणी केली.माजी नगरसेवक अजहर हुंडेकरी व शौकत पठान यांनी महानगरपालिका अधिकाऱ्याना कॉल केला. एमआयएमचे शहर अध्यक्ष फारूक शाब्दी यांनी पालिका अधिकाऱ्याना इशारा दिला. लवकरात लवकर इक्बाल मैदानाची स्वच्छता करावी अन्यथा येथील कचरा अधिकाऱ्याच्या दालनात आणून फेकणार असल्याचा इशारा दिला. इक्बाल मैदान हे अनेक दिवसांपासून अस्वच्छतेचे केंद्रबिंदू झाले आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात घाण फेकली जात आहे. लहान मुलं इक्बाल मैदानात येऊन गांजा सदृश अंमली पदार्थांचे सेवन करत आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी असलेला आजोरा इक्बाल मैदान येथे टाकण्यात येऊ लागला आहे अशी संतप्त प्रतिक्रिया एमआयएमच्या पाधिकाऱ्यांनी दिली.



## सोलापूरचा एव्हरेस्टवीर आनंद बनसोडेने तिसऱ्या वेळेस किलिमांजारो शिखर सर

● आठ अमेरिकन भारतीयांसोबत यावेळेस लिमोशो रूटवरून शिखर चढाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

येथील एव्हरेस्टवीर, विश्वविक्रम वीर आनंद बनसोडे याने दक्षिण आफ्रिकेतील आरुषा (टांझानिया) येथील किलिमांजारो शिखर सर केले आहे. आतापर्यंत वेगवेगळ्या रूटने त्याने तिसऱ्या वेळेस हे शिखर सर केले आहे. १५ ऑगस्ट २०१४ रोजी मचामे, २०२३ मध्ये मरांगु तर आता २०२५ मध्ये लिमोशो रूटने किलिमांजारो सर केले आहे. अमेरिकेतील कॅलिफोर्निया, टेक्सास राज्यातील भारतीय वंशाच्या डॉक्टरांनीही हे शिखर सर केले आहे.

सोलापूरात ३६० एक्सप्लोरर ही जागतीक साहसी मोहिमा आयोजित करणारी कंपनी आनंदने २०१७ मध्ये स्थापन करून त्याचा जगभर विस्तार केला आहे. सोलापूरसहित जगभरातील अनेकांना यामार्फत गिर्यारोहन व विविध साहसी मोहिमा आखण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. आफ्रिकेतील टांझानिया देशातील किलिमांजारो शिखराची उंची समुद्र सपाटी पासून १९,३४१फूट आहे. एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांनी १५ ऑगस्ट २०१४ रोजी हे शिखर सर करून त्यावर भारताचे राष्ट्रगीत वाजवून विश्वविक्रम केला होता त्यावेळी समस्त सोलापूरकरानी आनंद व्यक्त केला होता. हेच शिखर तिसऱ्या वेळेस सर करून आनंदने इतरांनाही याचा आनंद दिला आहे.




**लिमोशो रूटने हे शिखर आव्हानात्मक**

''लिमोशो रूटने हे शिखर आव्हानात्मक होते. पण यापूर्वी अनेकांना हे शिखर चढाईसाठी तयार केल्यामुळे आताही अमेरिकन लोकांना मार्गदर्शन करणे सोपे गेले. ३६० एक्सप्लोरर मार्फत अनेकांना गिर्यारोहन करता येते याचा आनंद वाटतो''
**- आनंद बनसोडे**

## दामदुप्पटचे आमिष; कोटींचा गंडा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ जुलै -**

आकर्षक दामदुप्पट परताव्याचे आमिषे देत गुंतवणुकदारांना रक्कम गुंतविण्यास भाग पाडून कंपनी प्रतिनिधीसह १५०० ते १६०० गुंतवणूकदारांना गंडा घालणा-या कलकम रियल इन्फ्रा इंडिया लिमिटेडचे संचालक विजय सुपेकर यांना आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक सोलापूर यांनी बेड्या ठोकल्या त्याना न्यायायालने ७ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

त्यामुळे त्यांच्या चौकशीतून आत्ता या प्रकरणातील मुख्य सूत्रधार संशयीत विष्णु दळवी व अन्य आरोपी लवकरच पोलीसांच्या हाती लागेल असा विश्वास आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उपअधिक्षक दिपक चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कार्यालय सुरु करुन कलकम रियल इन्फ्रा इंडिया लिमिटेड कंपनीकडून गुंतवणधाराना दाम दुप्पट परताव्याची आमिष दाखवून तब्बल ५ ते ६ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा गुन्हा एम.टी. आय.डी. कायदा कलम ३, भा.दं. संहिता कलम १२० ब, ४०६, ४०९, ४२० अन्वये गुन्हा दाखल क्रमांक ३९६/२०२१ दि. १३/०८/२०२१ रोजी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे यांच्याकडे मिलिंद तात्यासाहेब देशमुख वगैरे यांनी फिर्याद दाखल केली. या गुन्हयातील कंपनीचे संचालक विजय चंद्रकांत सुपेकर यांस अटक करुन सत्र न्यायाधीश योगेश राणे यांचेसमोर बुधवारी हजर केले असता, मे. कोर्टाने त्यांस ७ दिवसाची पोलीस कस्टडी दि. २१ जुलैपर्यंत दिली आहे. त्याकामी पोलीस निरिक्षक आर्थिक गुन्हे शाखा संजय जगताप, आर्थिक गुन्हे शाखा सहा. पोलीस निरिक्षक गणेश कड, पो उपनिरीक्षक गांगुर्डे, पोलीस हवालदार शेख, वाघमोडे, बोराडे व यचगर, पोलीस शिपाई कोळेखे व सरकारी वकील शितल डोके यांनी काम पाहिले.

## तरूणाचा मृत्यू; चालकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. १६ जुलै -**

पुणे महामार्गावरील हॉटेल मधुबनसमोर अज्ञात वाहनाच्या धडकेत तरूणाचा मृत्यू झाला. हा अपघात मंगळवारी झाला. याप्रकरणी अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे


निलकंठराय गौडाप्पगौडा पोलिस पाटील (वय ३३, रा. नविन पेठ, निमगाव केतगी, ता. इंदापूर, जि. पुणे) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. याबाबत कल्लप्पगोडा गौडपगौडा पोलिस पाटील (वय २५, रा. येकतापूर, तासुरपूर, जि. यादगिर, कर्नाटक) याच्या फिर्यादीवरुन अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ जुलै रोजी पहाटे सहाच्या सुमारास हॉटेल मधुबनसमोरील महामार्गावर सोलापूरकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मेन हायवेवर निलकंठराय पोलिस पाटील यास अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने पोलिस पाटील हे रस्त्यावर जखमी व बेशुध्दावस्थेत पडले होते. त्यावेळी त्यास फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील हवालदार एम एल गायकवाड यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. ओंकार तवकोक्कुल यांनी पोलिस पाटील यास मृत घोषित केले. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११८०

**प्रीती कीर्ती तुझी असे संतजन ।**
**सांभाळा स्वजन अहर्निशी ।।**

संसारात अडकलेला आणि मी म्हणजे सर्वस्व म्हणणारा व स्वत:वर अतोनात प्रेम करणारा तसेच ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध, लोभ, मीपणा आदिला जवळ करणारा हा जीव संधी मिळाली तर भगवंताला काय मागेल, हे खरोखर सांगण्यापलिकडचे असेल. नाशवंत आणि भौतिक सुखाबरोबर दुसऱ्याचे वाटोळे व्हावे, अशी मागणी करण्यातही हा जीव मागे राहणार नाही. आपला देह सत्कारणी लागावा अशी सद्बुध्दी मागणारा जीव दुर्मिळच असेल. मनाभावातून नि:स्वार्थ प्रेमाने चांगल्यांची स्तुती, कीर्ती या जीवाकडून क्वचितच घडते. संत महात्म्यांच्या बाबतीत मात्र या जिवाच्या निश्चितच उलट घडते. संत, महात्मे नाशवंत, भौतिक सुख मागत नाहीत. तरीपण हा देह, हे आयुष्य जास्त काळ टिकावा. कारण या देहाकडून आयुष्यभर जनसेवा व्हावी. त्याचबरोबर व्यक्तिला माणूस बनवण्याचा प्रयत्न करणा-या संत, सज्जनांचे गुणगान करता यावे, त्यांची किर्ती सांगता यावी, यासाठी उदंड आयुष्य लाभावे, अशी मागणी संत, महात्मे भगवंताजवळ करतात.



सेनाजींच्या बाबतीत, प्रीती कीर्ती तुझी असे संतजन । सांभाळा स्वजन अहर्निशी ।।, सेना म्हणे संत-कीर्ती अखंड । आयुष्य उदंड देई मज ।।, यापेक्षा वेगळी मागणी होण्याचे कारणच नाही. संत सेवा करता येण्यासाठी, त्यांची कीर्ती इतरांना सांगता येण्यासाठी, सत्कर्म करण्यासाठी भरपूर आयुष्य मिळावे असे महाराज म्हणतात. खरे म्हणजे मानवी जीवन अशीच अपेक्षा करणारे असावे.

संत सेवा करण्याची, संत चरित्र सांगण्याची, संतवचनांचा प्रसार करण्याची अपेक्षा जवळपास सर्वच संतांनी केल्याचे त्यांच्या अभंगावरुन दिसून येते. नामदेव महाराजही, हेंचि घडो मज जन्म जन्मांतरी । मागणें श्रीहरि नाहीं दुजें । मुखीं नाम सदा संतांचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव ।।, असे म्हटले आहे. भक्तचरित्राचा प्रसार करणारा मला खूप आवडतो. मी त्याच्याशी मैत्री करतो, त्याच्यावर खूप प्रेम करतो, असे श्रीकृष्ण भगवंतानी अर्जुनाला म्हटल्याचे माऊली श्री ज्ञानेश्वरीत सांगतांना, तेणेंसीं आम्हां मैत्र । एथ कायसें विचित्र । परि तयाचें चरित्र । ऐकती जे ।।, तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें । जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ।।, असे म्हटले आहे. आपणालाही चांगल्याबददल बोलण्यात आनंद वाटला पाहीजे. चांगल्यांच्या विचारांचा प्रसार केल्याने समाजातील चुकीच्या बाबी कमी होण्यास मदत होते. चांगल्यांना नांव ठेवून ते कसे वाईट आहेत, हे दाखवण्याचा प्रयत्न करु नये. जे चांगले आहे ते चांगलेच म्हटले पाहीजे. चांगले कोणाकडून का मिळेना, त्याचा स्वीकार करता यावा. चांगले देणाऱ्याकडे लहान मोठा, माझ्यापेक्षा मोठा नाही, अशा भावनेने न पहाता, जे चांगले मिळत आहे ते घेण्याची मानसिकता ठेवल्यास आनंद वाढतो.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष- चांगला दिवस |
| दि. १७ जुलै २०२५ | कालाष्टमी |
| विक्रम संवत् २०८१ | |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - आषाढ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. सप्तमी (१९.०९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - रेवती (२७.३८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - अतिगंड (०९.२८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (०८.०७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. समाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील. शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता, प्रवास होईल.

**वृषभ :** विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्याात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन :** काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्याद वाढ होण्याची शक्यता. विद्यार्थ्यांना यश मिळेल.

**कर्क :** स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह :** लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**कन्या :** चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या कामावर खुशी राहील.

**तुळ :** मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक :** राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु :** आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर :** जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो. उद्योगधंदा चांगला होईल. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**कुंभ :** आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन:** योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ होण्याची शक्यता. दुसऱ्यांच्या कामात हस्तक्षे करू नका. महिलांना आनंदी दिवस राहील.

# आयटी पार्क, स्पेशलिटी हॉस्पिटलसह १३ कामांच्या पूर्ततेची मागणी

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत आ. देवेंद्र कोठे यांनी घेतला पुढाकार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

सोलापुरात आयटी पार्क सुरू व्हावे, शासनाचे नवे सुपर स्पेशालिटी रुग्णालय पूर्वभागात सुरू करावे यासह शहर विकासाच्या १३ कामांच्या पूर्ततेची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबई येथे झालेल्या बैठकीत आमदार देवेंद्र कोठे यांनी केली. आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या मागण्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्वतः मंजूर करत सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासाचे संकेत दिले.

बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे पश्चिम महाराष्ट्रातील विधानसभा सदस्यांची विकासकामांबाबत बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीत आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूर शहरातील बुद्धिमान तरुण शहराबाहेर जाणे रोखण्याकरिता उद्योजकांच्या मदतीने सोलापुरात आयटी पार्क सुरू व्हावे, पूर्वभागात कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्यांच्या सोयीसाठी शासनाचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय सुरू करावे, सोलापूर शहरातील भटक्या विमुक्त जातींसाठी ४० हजार घरकुलांची योजना मंजूर करावी, मुंबई आणि तिरुपतीसाठी विमान सेवा सुरू व्हावी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केलेल्या ८५० कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचा कार्यारंभ आदेश काढण्यात यावा, १०० ई बस सुरू कराव्यात, सोलापूर शहराच्या विकासासाठी बी टू रद्द करावा, सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यात यावे, शासनाच्या मनपाच्या आणि खाजगी मालकांच्या जागेवर असलेल्या झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासाठी योजना मंजूर करावी आदी मागण्या मांडत आमदार देवेंद्र कोठे यांनी शहर विकासाच्या दृष्टीने चर्चा केली.

त्याचबरोबर ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगांच्या परिसराचा विकास करावा, ४ लाखांहून अधिक लोक निगडित असलेल्या वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी जुन्या मशिनरी अपग्रेड करण्यासाठी सबसिडी, वीज सवलत व सोलर सबसिडी, विशेष पॅकेज उपलब्ध करून द्यावे, पुणे, हैदराबाद, विजयपूर, अक्कलकोट, होटगी या गावांच्या रस्त्यांना जोडणारे सोलापूर महानगरपालिका हद्दीतील ६० मीटर अंतर्गत रिंगरोड व्हावा, आजूबाजूच्या ४ राज्यांमध्ये एकमेव असलेल्या महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाच्या पुनर्निर्मितीसाठी आवश्यक असलेला २० कोटी रुपयांचा निधी मंजूर व्हावा, धर्मवीर संभाजी महाराज तलावाच्या सुशोभीकरणासाठी तयार असलेल्या ६० कोटी रुपयांच्या विस्तृत प्रकल्प अहवालाला मंजूरी मिळावी या मागण्याही याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे यांनी केल्या.

आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या मागण्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त करत तत्वतः मंजुरी दिली. या बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे-भोसले, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह पश्चिम महाराष्ट्रातील विविध विधानसभा मतदारसंघाचे विधानसभा सदस्य उपस्थित होते.

### सोलापूरचा विकास आता थांबणार नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या विकासाकरिता जनतेला दिलेल्या शब्दाप्रमाणे अंमलबजावणी करण्यास प्रारंभ केलेला आहे. सोलापूर शहराच्या विकासाकरिता विधानसभा सदस्य या नात्याने मी केलेल्या मागण्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्वरित मंजुरी दिल्याबद्दल सोलापुरातील सर्व नागरिकांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार ! सोलापूरचा विकास आता थांबणार नाही.

**- देवेंद्र कोठे, आमदार**

## जैन सोशल ग्रुपतर्फे शुक्रवारी नेत्र तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

जैन सोशल ग्रुप, सोलापूर व स्व. अनोपचंद डाकलिया, स्व. कमलाबाई डाकलिया, स्व. प्रकाशचंद डाकलिया, स्व. रतनचंद डाकलिया व स्व. सुनितादेवी डाकलिया यांच्या स्मरणार्थ व नामवंत नेत्रतज्ञ डॉ. नवनीत तोष्णीवाल, मिश्रीबाई तोष्णीवाल नेत्रपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर शुक्रवार दि.१८ जुलै रोजी आयोजित केले आहे, अशी माहिती ग्रुपचे प्रेसिडेंट चेतन सुराणा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गत २३ वर्षांपासून हा उपक्रम घेण्यात येत आहे. आतापर्यंत ९६०० रुग्णांची तपासणी करून त्यापैकी २८०० ते २९०० रुग्णांवर मोफत मोतीबंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. यंदाही शिबिर शुक्रवार दि. १८ जुलै रोजी सकाळी १० वाजता सोलापुरातील तुळजापूर वेस, बलिदान चौक येथील जैन स्थानकात होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद राहणार असून जैन सोशल क्लबचे सोलापूर व महाराष्ट्र रिजन चे चेअरमन दिलीप मेहता, नेत्रदान कमिटी संयोजक संजय शहा, उन्मेश करनावट, चेतन सुराणा, महेश नळे, स्वप्निल मुनोत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे नियोजन रमेश डाकलिया, संजय सेठिया करीत आहे, असे सुराणा यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला उन्मेश करनावट, अभय गांधी, विजय डाकलिया, प्रवीण भंडारी, राहुल शहा, संजय सेठिया उपस्थित होते.

## हणमंत पोलासे हत्याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

अक्कलकोट तालुक्यातील सलगर येथील हणमंत अप्पाराव पोलासे यांना बेपत्ता करून हत्या केल्या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी मयताचे भाऊ राजशेखर पोलासे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

याप्रकरणी कुठेही दखल घेतली जात नसल्याने आझाद मैदानावर चार दिवस लक्षणीय उपोषण केल्यानंतर याचा तपास अक्कलकोट वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांच्याकडे देण्यात आला होता. त्यानंतर आरोपींचे लेखी जाब जबाब घेण्यात आले. दरम्यान, अनंत कुलकर्णी यांची तडका फडकी बदली करण्यात आली. हे प्रकरण न्यायालयापुढे न नेता परस्पर वरिष्ठांकडे पाठवून फाईल करण्यात आले, असा आरोप राजशेखर पोलासे यांनी केला आहे. याप्रकरणी गांभीर्याने दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.

## सुशील गायकवाड यांचे शनिवारी व्याख्यान

### 'संरक्षण क्षेत्राचे स्वावलंबन आणि परिवर्तन'या विषयावर करणार मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**



रोटरी क्लब ऑफ सोलापूरतर्फे माजी कुलगुरु व रोटरीचे प्रांतपाल कै. के. भोगिशयन यांच्या स्मरणार्थ केंद्र सरकारच्या संरक्षण मंत्रालयातील कार्यकारी संचालक व सोलापूरचे सुपुत्र सुशील गायकवाड यांचे व्याख्यान शनिवार दि. १९ जुलै रोजी सायंकाळी ५:३० वाजता निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर येथे आयोजित केले आहे, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष धनश्री केळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रोटरी क्लबतर्फे दरवर्षी के.भोगिशयन यांच्या स्मरणार्थ व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. यंदा सुशील गायकवाड यांचे 'संरक्षण क्षेत्राचे स्वावलंबन आणि परिवर्तन' (Self Reliance and Transformation of Defence Sector) या विषयावर इंग्रजीमध्ये व्याख्यान होईल. प्रोफेसर के. भोगिशयन हे सोलापुरातील संगमेश्वर महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. १९६० मध्ये ते या महाविद्यालयाचे प्राचार्य झाले आणि १९८३ पर्यंत म्हणजे सलग २३ वर्षे त्यांनी प्राचार्यपदाची धुरा समर्थपणे सांभाळली. रेडक्रॉसच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, रोटरी क्लबचे प्रांतपाल, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनच्या सोलापूर शाखेचे अध्यक्ष, कोल्हापूरच्या सायबर इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, सोलापूरातील श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य पाहिले. अशा विविध सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. या पत्रकार परिषदेस क्लबचे सचिव निलेश फोफलिया, सलाम शेख, संदीप जव्हेरी, मितेश पंचमिया, संतोष कणेकर, पराग कुलकर्णी, सागर गोगरी आदी उपस्थित होते.

## जिद्द आणि कष्टाच्या बळावर श्वेता झाली अधिकारी

### ए. जी. पाटील तंत्रनिकेतनकडून सत्कार



**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

शहानगर हौसिंग सोसायटी येथील श्वेता शिवाजी जाधव हिने जिद्दीच्या बळावर अशक्य वाटणाऱ्या शासकीय अधिकारी होण्याचा प्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या अभियांत्रिकी सेवा परीक्षा २०२३ या परीक्षेत तिने विमुक्त जाती- अ प्रवर्गामधून महिलांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला व तिची पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामध्ये असिस्टंट एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर (सिव्हिल) वर्ग १ (-१) या पदासाठी निवड झाली.

दिवसाला १२ ते १४ तास अभ्यास, परीक्षेचा अभ्यास तिने घरी राहून पूर्ण केला. तर तिच्या तिसऱ्या प्रयत्नात तिला यश मिळाले. तिच्या या यशामागे तिच्या आई-वडिलांचे कष्ट आहेत. वडील शिवाजी जाधव हे उत्तर सोलापूर शहानगर लिमेवाडी येथे दुकानदार असून आई रेखा जाधव यांनी आपल्या खांद्यावर घराचे संपूर्ण ओझे सांभाळत मुलांना शिक्षणासाठी संधी दिली. तिचे आजोबा रामचंद्र जाधव हे पीडब्ल्यूडी डिपार्टमेंट मध्ये शिपाई म्हणून काम करत होते; तर त्यांच्या अधिकारी होण्याचे स्वप्न श्वेता हिने पूर्ण केले.

तर तिचे प्राथमिक शिक्षण ठोकळ प्रशालेमधून झाले. नंतर तिने विजापूर रोडवरील ए. जी. पाटील तंत्रनिकेतन कॉलेजमधून सिव्हिल इंजिनिअरिंग या विभागातून डिप्लोमाचे शिक्षण घेतले. स्थापत्य विभागात शिकत असताना तिला शासकीय अधिकारी होण्याची प्रेरणा मिळाली; नंतर तिने अभियांत्रिकी शिक्षण २०२२ मध्ये पूर्ण केले. शासकीय अधिकारी होण्याची जिद्द व अभ्यासातील सातत्यता या जोरावर तिने हे मोठे यश संपादन केले.

## चतुरबाई श्राविका प्राथमिक प्रशालेत लोकशाहीचा जागर

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**



श्री चतुरबाई श्राविका प्राथमिक विद्यालयात चतुरश्री बालपरिषद निवडणूक हा उपक्रम घेण्यात आला विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाण निमर्णि करणे, निवडणूक प्रक्रियेची माहिती देणे आणि जबाबदारीची भावना निर्माण करणे हा उद्देश या उपक्रमाचा होता शाळेच्या मुख्याध्यापिका राखी देशमाने यांनी परिपाठावेळी निवडणुकीची प्रक्रिया जाहीर केली.

निवडणुकीत दिवशी श्राविका संस्थेतील सर्व विभाग प्रमुख मुख्याध्यापिका श्रीमती देशमाने, संस्थेतील पदाधिकारी माधव देशपांडे, शालेय व्यवस्थापन समितीतील पालक शिक्षक कर्मचारी आणि सर्वात महत्त्वाचे ज्यांच्यासाठी उपक्रमाचे आयोजन केले असे विद्यार्थी ज्यांनी १०० टक्के हजर राहून गुप्त मतदान पद्धतीने मतदान केले.

यामध्ये इयत्ता चौथीचे विद्यार्थ्यांचे निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत होते तर इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांचे पोलीसपथक मतदारांना रांगेत सोडणे ,शिस्त शांतता राखणे इ.कामकाज पाहत होते. प्रत्यक्ष मतदानासारखेच मतदार यादीतून नावे तपासणी, ओळखपत्र पाहणे, बोटाला शाई लावणे, बॅलेट सोडणे आणि मतदान करणे या पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया घडली इयत्ता निहाय मतदान कक्षाची निर्मिती करण्यात आली शिक्षकांच्या देखरेखीखाली मतमोजणी करण्यात आली विजयी उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली विजयी उमेदवारांना मुख्याध्यापकांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

## प्रश्नांच्या मुळाशी जाणारी पत्रकारिता महत्त्वाची

### कै. अविनाश कुलकर्णी आदर्श पत्रकार पुरस्कार वितरणप्रसंगी डॉ. ओम्बासे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

सोलापूरला पत्रकारितेचा मोठा इतिहास आणि वारसा आहे. पत्रकार अभ्यास करून सखोल पद्धतीने प्रश्न मांडतात. विविध प्रश्नांच्या मुळाशी जाणारी पत्रकारिता ही आज महत्त्वाची आहे. यामुळे प्रश्न मार्गी लागतात. विकासाला पूरक असे काम पत्रकारितून घडते, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.

मंगळवारी, श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात ज्येष्ठ पत्रकार कै. अविनाश व्यंकटेश कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा पहिला आदर्श पत्रकार पुरस्कार पत्रकार प्रशांत जोशी यांना महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत रवींद्र मोकाशी, कुलकर्णी यांच्या पत्नी नीता कुलकर्णी, पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे आदींची उपस्थिती होती. रोख रक्कम, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

प्रारंभी कै. अविनाश व्यंकटेश कुलकर्णी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार खजिनदार किरण बनसोडे यांनी केले. यावेळी प्रा. बाळासाहेब भास्कर, अविनाश सिताराम कुलकर्णी, प्रशांत बडवे, अरुण लोहकरे, ॲड. जयदीप माने, पद्माकर कुलकर्णी, विजय शाबादे आणि कुलकर्णी मित्र परिवारासह विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### माणसांचे दु:ख वास्तवपणे मांडणारी पत्रकारिता आवश्यक : मोकाशी

ज्येष्ठ विचारवंत रवींद्र मोकाशी म्हणाले, राज्य कुणाचे का असेना परंतु सर्वसामान्य लोकांच्या संवेदना व्यक्त होण्याचे पत्रकारिता एक चांगले साधन आहे. जागतिकीकरणात आजची पत्रकारिता भरकटताना दिसते आहे, अशाही परिस्थितीत माणूस आणि माणुसकी जिवंत ठेवणारे पत्रकार आजही आहेत. माणसांची दु:खे, अडचणी नेमक्या वास्तवपणे मांडणारी पत्रकारिता आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

## मेडिकल कॉलेज प्रवेशाबाबत शुक्रवारी मोफत सेमिनार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

लिगाडेमेडिकलकन्सल्टन्सीतर्फे शुक्रवार दि.१८ जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत हिराचंद नेमचंद वाचनालय येथे मेडिकल कॉलेज प्रवेशाबाबत मोफत सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती चिदानंद सुंटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या सेमिनारमध्ये भारतात तसेच विदेशात मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासाठी कोणत्या संधी उपलब्ध आहेत. याविषयी संपूर्ण मार्गदर्शन तसेच एमबीबीएस बीडीएस बीएएमएस, बीएचएमएस, बीपीटीएच डी. बी. फार्मसी या कोर्सेसबद्दल विशेष समुपदेशन करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी मुख्य प्रवक्ते म्हणून प्रा. बागडे आणि बाकलीवाला संस्थेचे संचालक अभिषेक तसेच चाटे क्लासेसचे काळे हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कोरे हे उपस्थित राहणार आहेत.

लिगाडे मेडिकल कन्सल्टन्सीचे संचालक महादेव लिगाडे यांचेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होणार आहेत. शिबिरासाठी मुख्य प्रवक्ते म्हणून प्रा. बागडे आणि बाकलीवाला मेडिकल कोचिंग क्लासचे संचालक अभिषेक तसेच चाटे क्लासेसचे काळे हे उपस्थित राहणार आहेत. या सेमिनारचा मेडिकल कॉलेजला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन लिगाडे मेडिकल कन्सल्टसीचे व्यवस्थापक चेतन माविनमर यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी ७७७५८६४९४९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला चेतन माविनमर उपस्थित होते.

## महत्वाचे...



### पिलीव येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून भंडलकर नव्याने रुजू

**पिलीव दि १६ जुलै-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील ग्रामविकास अधिकारी बाबर यांची बदली झाल्यानंतर याठिकाणी नव्याने ग्रामविकास अधिकारी म्हणून भंडलकर यांनी मंगळवार दि १५ जुलै रोजी पदभार स्वीकारला. पदभार स्विकारल्यानंतर त्यांचा पिलीवचे माजी सरपंच उमेश बोडरे, युवा उद्योजक नानासाहेब मदने, अशोक बोडरे, सम शेरसिंग रजपुत, राजाभाऊ बोडरे, अमोल लोखंडे, बोडरे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

### संत नामदेव महाराज मंदिरात अखंड हरीनाम सप्ताह

**बार्शी, दि. १६ जुलै-**
श्री संत शिरोमणी नामदेव महाराज परिवार व श्री संत जनाबाई यांच्या ३७५ व्या संजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त बार्शीतील नामदेव महाराज देवस्थान यांचे वतीने गुरुवार दि. १७ ते गुरुवार दि. २४ जुलै दरम्यान अखंड हरीनाम सप्ताहचे आयोजन करण्यात आले आहे, अशी देवस्थानचे अध्यक्ष माजी नगरसेवक सुनील सरवदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. दि १७ रोजी हभप महाराज बाभुळगावकर, दि. १८ रोजी हभप ज्ञानेश्वर नामदास महाराज, दि. १९ रोजी गुरुबाबा औसेकर महाराज,दि. २० रोजी हभप भूषण महाराज तळणीकर, दि. २१ रोजी हभप संस्कार महाराज, दि. २२ रोजी हभप न्यायमूर्ती कृष्णा महाराज, दि. २३ रोजी हभप प्रकाश बोधले महाराज यांचे गुलालाचे कीर्तन तर रात्री हभप डॉ जयवंत बोधले महाराज, यांचे कीर्तन होणार आहे. हे सर्व कीर्तन रात्री ८ वा. होतील व दि. २४ रोजी हभप ज्ञानेश्वर महाराज पाटील यांचे काल्याचे कीर्तन दुपारी होणार आहे. कीर्तनानंतर महाप्रसाद होणार आहे. तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी नवीन सरवदे, हरिदास फटाले, अंबादास कारंजकर, अतुल ढवळे, वासुदेव मुळे, दत्तात्रय फटाले, अभिजित ढवळे आदी उपस्थित होते.

### पिलीव परिसरात दीड महिन्याच्या विश्रांतीनंतर वरुणराजा बरसला

**पिलीव, दि.१६ जूलै-**
माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात यंदा मे महीन्यातच समाधानकारक पाऊस झाला होता. यामुळे शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात बाजरी, मका व इतर पिकांची पेरणी केली होती. पण त्यानंतर जुन महीन्याच्या सुरुवातीला थोडाफार पाऊस झाला होता. त्यानंतर पावसाने मोठी दडी मारली होती. यामुळे पेरणी केलेली पिके राहतात की जळुन जातात अशी परिस्थिती होती.झिंजेवस्ती व कुसमोड ही दोन गावे सोडून इतर बचेरी, सुळेवाडी, शिंगोर्णी या भागातील पिके पाणयाअभावी धोक्यात होती. अश्या वेळेसच पिलीव परीसरातील बचेरी, सुळेवाडी, पिलीव, शिंगोर्णी, झिंजेवस्ती, कुसमोड, काळमवाडी या भागात १६ जुलै रोजी दुपारी एकच्या सुमारास पावसाने चांगलीच हजेरी लावली यामुळे खरीप हंगामातील पिकांना जिवदान मिळाले असुन बळीराजा यामुळे चांगलाच सुखावला आहे. पाऊस पडतो की नाही पेरणी केलेली पिके राहतात की जळुन जातात अशी परिस्थिती होती. पण आज वरुणराजाने हजेरी लावल्यामुळे या भागातील बळीराजा चांगलाच सुखावला असुन शेतकऱ्यापुढील दुबार पेरणीचे संकट तात्पुरते टळले. पण या भागातील शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

### ऑनलाईन चक्री गेम प्रकरणातील आरोपीचा जामीन मंजूर

**बार्शी, दि. १६ जुलै-**
सोलापूर जिल्ह्यातील व विशेषतः माढा, बार्शी, कुर्डुवाडी येथील बहुचर्चित ऑनलाईन चक्री गेम गुन्हा प्रकरणात यातील आरोपी योगेश सुरेश गाडे याचा जामीन मंजूर झाला. माढा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पी. जी. लबे यांनी दि. ८ जुलै २५ रोजी आरोपी योगेश सुरेश गाडे याचा जामीन मंजूर केला आहे. ऑनलाइन चक्री गेम प्रकरणात कोट्यावधींची फसवणूक झाल्याबद्दल कुर्डूवाडी पोलीस ठाणे येथे गु र नंबर ५६/२०२५ अन्वये आरोपी नितीन पाटमस ,रणजीत सुतार, वैभव सुतार व इत्यादी आरोपींविरोधात भादंवि कलम ४२० ,४६५, ४६७, ४६८, ४७१,१२० बी व कलम ३४ ,तसेच लॉटरी रेगुलेशन क्ट कलम, ७, ८, ९, महाराष्ट्र गेम्बलिंग ऍक्ट कलम ४, ५ व आय.टी.क्ट ६६ डी प्रमाणे ऑनलाईन गेम प्रकरणात कोट्यावधींचे फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल झाला होता. त्या अनुषंगाने सदर प्रकरणात वरील आरोपींशिवाय इतरही आरोपींचा समावेश करण्यात आला. आरोपींना न्यायालयीन कोठडी बजावण्यात आली. यातील आरोपी सुरेश गाडे याने वकिलांमार्फत न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. जामीन अर्जावर सुनावणी होऊन माढा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पी . जी.लंबे यांनी दि. ८ जुलै रोजी आरोपी योगेश सुरेश गाडे याचा जामीन अर्ज मंजूर केला. जामीन प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. सचिन झालटे पाटील, ॲड. शिवराज भोसले, ॲड. अमोल अलाट यांनी कामकाज पाहिले.

### चांदापुरीत ओंकार परिवाराच्या शिबिरात ७५१ जणांचे रक्तदान

**पिलीव, दि.१६ जुलै-**
माळशिरस तालुक्यातील चांदापुरी कारखान्याचे चेअरमन तथा ओंकार परिवाराचे सर्वेसर्वा बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या शिबिरात ७५१ जणांनी रक्तदान केले. यावेळी संचालिका रेखाताई बोत्रे-पाटील, संचालक प्रशांत बोत्रे-पाटील उपस्थित होते. चेअरमन बोत्रे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ९ युनिटमध्ये समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, अनाथालयात फळे वाटप, अन्नधान्य किट वाटप करण्यात आले. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिरात सर्व युनिटच्या आधिकारी व कर्मचारी वर्गांने सहभाग नोंदविला. त्यामुळे विक्रमी ७५१ जणांनी रक्तदान केले. यामध्ये निमगाव म (ता.माळशिरस) येथे कर्मचारीवर्ग तसेच ऊस उत्पादक महिला व शेतकरी यांनीही सहभाग घेतला. या शिबिराद्वारे समाजासाठी ओंकार परिवाराने भरीव योगदान दिले आहे.

# माढ्यातील १०८ ग्रामपंचायत सरपंच पदासाठी दुबार सोडत

**५५ जागा महिलांसाठी राखीव**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १६ जुलै-**
माढा तालुक्यातील १०८ ग्रामपंचायत २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीत सरपंच पदासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेवरून माढ्याचे तहसीलदार संजय भोसले यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी जगदाळे मंगल कार्यालयात सोडत घेण्यात आली. याआधीही तालुक्यातील१०८ ग्रामपंचायत सरपंच पदासाठी सोडत घेण्यात आली होती.

माढा तालुक्यातील १०८ ग्राम पंचायतीमध्ये खुल्या प्रवर्गासाठी ६४ जागा असुन त्यापैकी ३२ जागेवर महिला आहेत. अनुसूचित जातीसाठी १४ जागा त्यापैकी ७ जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. नागरीकांच्या मागास प्रवर्गासाठी एकुण २९ जागापैकी १५ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तर लोकसंख्येच्या निकषानुसार अनुसूचित जमातीसाठी तांदुळवाडी ग्राम पंचायतीची जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आली आहे.




माढा तालुक्यातील १०८ ग्राम पंचायतीचे आरक्षण सोडत ही एकाच वेळी काढली असून मुदत संपेल तसं पुढील कालावधीसाठी ते लागू असणार आहे. यावेळी खुला वर्ग,अनुसूचित जाती,जमाती नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षण सोडत घेण्यात आली. यामध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण असणार आहे. माढा तालुक्यातील ग्रामपंचायत मध्ये खुल्या वर्गासाठी ६४ जागा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी २९ जागा, अनुसूचित जातीसाठी १४ अनुसूचित जमाती १ जागा असणार आहे. या आरक्षणातून ज्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी ५० टक्के आरक्षण असणार आहे.

**सर्वसाधारण ६४ जागा-**

**सर्वसाधारण महिला ३२ गावे :**
राहुलनगर, उपळवदे, चिंचगाव, पिंपळनेर, आहेरगाव भुईंजे, निमगाव (मा), वडोली, निमगाव (टें) बादलेवाडी, उंदरगाव, आलेगाव (खुर्द), उजनी (मा), शेडशिंगे, कन्हेरगाव, दारफळ, टाकळी (टे), वडशिंगे, म्हैसगाव, लऊळ, आढेगाव, अंबाड, भोगेवाडी-जाखले, सापटणे (टे), तुळशी, बिटरगाव, वेताळवाडी, शेवरे, कुंभेज, महादेववाडी, उपळाई (खुर्द), रोपळे (क), वाकाव, भोसरे.

**सर्वसाधारण पुरुष ३२ जागा :** अकोले बुद्रुक, जामगाव, खैराव, पिंपळखुटे, गारअकोले, कव्हे, नगोली, महातपूर, फुटजवळगाव, बारलोणी, चांदज, टेंभुर्णी, अकोले खुर्द, धानोरे, बैरागवाडी, शिराळ मा, लहू, अंजनगाव खे, सापटणे भो, शिराळ टे, पापनस, चोभेपिंपरी, तांबवे, जाधववाडी मो, परितेवाडी, रणदिवेवाडी, केवड, पालवण, गालवण, रांझणी, मोडनिंब, मुंगशी, व्होळे खुर्द,

नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला १५ गावे : रिधोरे, बेंबळे, आलेगाव बु., चिंचोली, सुर्ली, वडाचीवाडी (अं. ऊ.), लोणी/नाडी, रूई , माळेगाव, घोटी अरण, वरवडे, मानेगाव, पडसाळी, कापसेवाडी/हटकरवाडी.

नागरिकांचा मागास वर्ग पुरुष १४ जागा : भेंड, घाटणे, कुई, बावी, शिंगेवाडी, भुताष्टे, दहिवली, उपळाई बु, मिटकलवाडी, परिते, तडवळे म., अकुलगाव, उजनी टे., बुद्रुकवाडी.

अनुसूचित जाती महिलांसाठी ७ गावे आरक्षित : वडाचीवाडी (उ.बु.) चव्हाणवाडी (टे), जाधववाडी (मा) सोलनकरवाडी, लोंढेवाडी, रोपळे (खुर्द), वेणेगाव,

अनुसूचित जाती पुरुष ७ जागा - ढवळस,आकुंबे, विठ्ठलवाडी, अंजनगाव उ, खैरेवाडी, शिंदेवाडी, वडाचीवाडी (त.म.).

अनुसूचित जमाती महिला १ जागा - तांदुळवाडी. या आरक्षण सोडतीच्या चिठ्ठ्या जयदत्त कदम व स्वराज जुगदार या मुलांच्या हस्ते करण्यात आल्या. या आरक्षण सोडतीची प्रक्रिया माढाचे तहसीलदार संजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.




## ४०० दिव्यांग नागरिकांना कृत्रिम अवयव वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १६ जुलै-**
भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, मुंबई (अलिम्को), एस आर ट्रस्ट रतनाम, मध्य प्रदेश, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर आणि नॅब संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर शहर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलको, बार्शी, पंढरपूर, मोहोळ, करमाळा, सांगोला, या तालुक्यांमधील ४०० अस्थिव्यंग, दिव्यांग नागरिकांसाठी मोफत कृत्रिम हात-पाय बसविणे, कॅलिपर्स, जयपूर फूट इ. कृत्रिम अवयवाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमासाठी नॅब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशजी यलगूलवार यांचे मार्गदर्शन लाभले. या शिबिराचे उद्घाटन नॅबचे सदस्य पद्माकर कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. दिव्यांग अस्थिव्यंग व्यक्तींना त्यांच्या गरजेनुसार कृत्रिम हात-पाय बसवणे तसेच कॅलिपर्ससारखी उपयुक्त उपकरणे मोफत देण्यात आली. या उपक्रमामुळे शेकडो दिव्यांगांना नवसंजीवनी लाभली आहे. यावेळी नॅब संस्थेचे सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार उपस्थित होते. शिबिरात नॅब संस्थेचे सदस्य देवेंद्र भंडारे, रामचंद्र कुलकर्णी, संगीता गायकवाड, विशाल शिंदे, भैरप्पा कारभारी, रियाज मुल्ला, नरेंद्र वाघमरे, तेजश्री श्रीरेखम, भाग्यश्री पावटे आकांक्षा भंडारे, अजित यामजले, मल्लिनाथ पडवळे, शुभम वांजरे संदेश कांबळे आदींचे सहकार्य लाभले.

### अक्कलकोटमध्ये ऊरुसनिमित्त आज कार्यक्रम

**सोलापूर, दि. १६ जुलै-**
अक्कलकोट येथील आस्ताना-ए-हजरत सय्यद दातापीर शहा कादरी (रह.) अक्कलकोट शरीफ यांच्या ८० व्या ऊरुस शरीफ सालाबादप्रमाणे गुरुवार दि. १७ ते १९ जुलैपर्यंत संपन्न होणार आहे. या उर्सला महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेशातील विविध भागातून हजारो श्रध्दाळू येत असतात. हे ऊरुस हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतिक मानले जाते.

शनिवार दि.१७ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता संदल मुबारक दातापीर दर्गाहशरीफ येथून निघणार आहे. त्यानंतर फातेहाखानी होईल. तसेच हजरत सय्यद मिर आलम नवाज शहा कादरी (रहे) यांचे हजरत सय्यद दातापीर शाहकादरी (रह.) यांच्या स्मरणार्थ भजन (रुहे तसव्वुफ कलाम) होणार आहे.

### दर अमावस्येला पानगांवसाठी बस सेवा सुरु

**बार्शी, दि. १६ जुलै-**
सद्गुरू संत बाळूमामा व श्रीहरी खाडेबाबा देवस्थान पानगांव येथे दर अमावस्येला जाणाऱ्या भक्तांच्या सोयीसाठी बार्शी ते श्री संत बाळूमामा मंदीर, कापसे मळा, पानगांव अशी बस सेवा गुरुवार दि. २४ जुलैपासून पहाटे ५-३० वाजल्यापासून सुरु करण्यात आली असून ही बस सेवा दर अमावस्येला सुरु राहणार आहे. तरी याचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष बाबासाहेब (मामा) कापसे यांनी केले आहे.

### बार्शीतील गतिरोधकला बोर्ड व कलर पट्टा देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जुलै-**
बार्शी शहरात नगरपालिकेच्या माध्यमातून नवीन बनविण्यात आलेल्या सिमेंट रोड व डांबरी रोडवर विविध भागात बनवलेल्या गतिरोधकवर कुठेही पाटी गतिरोधक आहे असे कुठलेही चिन्ह नाही, कलर पट्टा नाही, रेडीयम नाही.

शहरात नव्याने बनवण्यात आलेले गतिरोधक सुद्धा अत्यंत महत्वाचे आहेत. त्यामुळे वाहन चालकांना वाहन चालवताना नियंत्रण मिळते. तसेच रोडवर चालणाऱ्या नागरिकांना संरक्षण मिळते. रोडवरील गतिरोधकला कलर पट्टा दिला नसल्याने वाहनधारक या गतीरोधक वर गाडी आपटून छोटे-मोठे अपघात होत आहेत. गाडी चालवत असताना गतिरोधक न दिसल्याने वाहन चालकाला वाहनावर नियंत्रण मिळवता येत नाही. तरी बार्शी नगरपालिकेने याचा विचार करुन नवीन बनवण्यात आलेल्या शहरातील विविध रोडवर बनविण्यात आलेल्या गतिरोधक जवळ बोर्ड व कलर पट्टा मारुन वाहनधारकांना गतिरोधक करावेत, अशी मागणी बार्शीकर वाहन चालकातून व नागरिकांतून होत आहे.

## प्लॉट विक्रीत फसवणूक केल्याबाबत ढगेसह इतर पाच जणांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जुलै-**
येथील वनमाला मनोज कोळी यांना बार्शी येथील चालू गट नंबर ९४३/१ पैकी प्लॉट नंबर ५९/अ याचे क्षेत्रफळ १४४ चौ.मी. हा खुला प्लॉट सुनील सुदाम ढगे, खैसर मौला शेख, केतन प्रकाश धामणेकर,अमित अशोक ढाळे व गंगाबाई किसन वडेकर यांनी आपसात संगनमत करुन विक्री केला.

मात्र सदरचा प्लॉट हा प्रथम शोभा गंगाधर साडेगावकर यांना गंगाबाई किसन वडेकर व अमित अशोक ढाळे यांनी २००८ साली विक्री केलेला असतानाही तोच प्लॉट पुढे शोभा गंगाधर साडेगावकर यांचे वारसांनी समाधान कोळी व रंजना कोळी यांना विक्री केलेला आहे, असे असताना व त्याची पूर्णपणे कल्पना सुनील ढगे वगैरे पाचजणांना असतानाही तारीख १६ मार्च २०२२ रोजी सदरील प्लॉट जागा दस्त नं. १५९५/ २०२२ ने खरेदी दिली व सदर प्लॉट जागे संदर्भाने वनमाला कोळी यांनी सुनील ढगे यांना रक्कम रुपये १,६५,,०००/- चेक द्वारे व रक्कम रुपये व ५,३५,०००/- हे हनुमंत जमदाडे व संजय जाधव यांचे समक्ष वनमाला कोळी व त्यांचे पतीने सुनील ढगे यास रोख स्वरुपात दिलेले आहेत.

वनमाला कोळी यांना त्यांची फसवणूक झाल्याचे समजताच त्याबाबत बार्शी शहर पोलीस स्टेशन व वरिष्ठाकडे वारंवार रीतसर तक्रारी दिल्या. मात्र वनमाला कोळी यांच्या तक्रारीची दखल कोणीही घेतली नाही म्हणून वनमाला कोळी यांनी बार्शी येथील फौजदारी न्यायालयात ॲड.आर. यु. वैद्य यांचेमार्फत खाजगी फिर्याद वरील पाच लोकांविरुद्ध भादंवि कलम ४२०,४६७,४६८, ४७१,३४ सह दाखल केली होती त्या केसमध्ये दाखल कागदपत्र पुरावा व वकिलांनी केलेला युक्तिवाद याचा विचार करुन तारीख ३० जून २०२५ रोजी बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती जी.एस. पाटील मॅडम यांनी बार्शी शहर पोलिसांना सुनील सुदाम ढगे, खैसर मौला शेख, केतन प्रकाश धामणेकर, अमित अशोक ढाळे व गंगाबाई किसन वडेकर यांच्या विरुद्ध भादंवि कलम ४२०,४६७, ४६८,४७१,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन साठ दिवसांत तपास करुन अहवाल न्यायालयात दाखल करण्याचे आदेश केलेले आहेत. या केसकामी ॲड.आर. यु. वैद्य ॲड. के.पी. राऊत, ॲड. एस पी शहा यांनी वनमाला कोळीतर्फे काम पाहिले.

### बहुजन हक्क अभियान तालुकाध्यक्षपदी मंहमदशरीफ शेख यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**



बहुजन हक्क अभियानचे संस्थापक दयानंद बनसोडे, प्रदेश अध्यक्ष इक्बाल बागवान व जिल्हा अध्यक्ष माजिद बागवान यांच्या उपस्थितीत सोलापूर येथे कार्यकर्ता मेळावा प्रसंगी मंहमदशरीफ शेख यांची अक्कलकोट तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. संस्थापक दयानंद बनसोडे यांच्या हस्ते मंहमदशरीफ शेख यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी लैला जमादार, राजू चव्हाण, किर्तीपाल घोडकुंभे , रोजीफ बागवान, इस्माईल बागवान, रितेज अष्टूळ, काझी साहेब, सचिन फडतरे, प्रकाश वाघमारे नितीन माने उपस्थित होते. बहुजन हक्क अभियानच्या माध्यमातून दलित, शोषित, पिडीत, वंचित, मुस्लिम, बहुजन वर्गाच्या न्याय हक्कासाठी लढत राहणार असल्याचे सांगितले. तसेच जनसामान्यांच्या मुलभूत प्रश्नांसाठी आंदोलनात्मक पवित्रा घेवून जन सामान्यांचे प्रश्न सोडवेन, तसेच अत्याचार विरोधात आवाज उठविण्याचे काम करणार असल्याचे मंहमदशरीफ शेख यांनी सांगितले.

# माळशिरसमध्ये २.३७ कोटींचा निधी हडपल्याचा आरोप

**नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांचा पत्रकार परिषदेत खळबळजनक आरोप**

**केवळ कागदी घोडे नाचवून बिले उचलली**

**चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**
माळशिरस नगरपंचायत हद्दीत विविध शासकीय योजनेअंतर्गत विविध सहा विकास कामे कागदोपत्री केल्याचे दाखवून कामे न करताच केवळ कागदी घोडे नाचवून २ कोटी ३७ लाख ९१ हजार रुपयांचा निधी हडपल्याचा आरोप करत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नगरसेवक कैलास वामन, नगरसेविका रेश्मा टेळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

माळशिरस हे तालुक्याचे मुख्यालय आहे. येथील नगरपंचायत हद्दीतील करोडो रुपयांची कामे विविध शासकीय योजनांतर्गत मंजुरी घेऊन दडपण्यात आली आहेत. कामे न करताच केवळ कागदी घोडे नाचवून केवळ निधी हडपला आहे. सन २०२३-२४ मधील नगराध्यक्ष, संबंधित वार्डातील नगरसेवक व मुख्याधिकारी यांनी संगनमताने मंजूर कामांमध्येमोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात नगरसेवक, माजी पदाधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. नगरपंचायतीचे सन २०२१-२५ दरम्यानचे संपूर्ण १७ प्रभागनिहाय मंजूर कामे व त्याचे दप्तराची ऑनकॅमेरा, निष्पक्ष चौकशी करून दोषी असणारा कोणी कितीही मोठा असो, त्यांना पाठीशी न घालता चौकशीत जे दोषी असतील त्या सर्वांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा., सहा ६ कामांत एकुण २ कोटी ३७ लाख ९१ हजार ९२२ रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. यासारखी अनेक कामे सन-२०२१ ते आजपर्यंतची करोडो रुपयांची कामे चोरीला गेली आहेत. सन २०२१ पासून एकच काम डबल दाखवणे, एक काम झाल्यानंतर काही दिवसात तशाच पद्धतीने फक्त कागदावरच काम दाखवून करोडोची बिले, बोगस बिले काढणे हे गंभीर प्रकार घडले आहेत. वर्कऑर्डर दिल्या त्या दिवशीच बिल काढले आहेत, असा आरोप माजी उपनगराध्यक्ष डॉ. मारुती पाटील यांनी केला. याबाबत माळशिरस पोलिसातही तक्रार अर्ज दिला आहे. या प्रकरणाची ऑनकॅमेरा चौकशी होण्याची मागणी केली आहे. येत्या पंधरा दिवसात या कामांचा तपास होऊन दोर्षीवर कारवाई न झाल्यास माळशिरस शहरातील ग्रामस्थांच्यावतीने रास्ता रोको, गाव बंद तसेच बेमुदत आमरण उपोषणासारखे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

या पत्रकार परिषदेस ड. सोमनाथ वाघमोडे, पांडुरंग वाघमोडे, डॉ. मारुती पाटील, किरण सावंत यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### माळशिरस तालुक्यात नवीन रचनेमुळे जि.प. व पं. स. सदस्यांची होणार दमछाक

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १६ जुलै-**
माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती गट व गण रचना नव्यानेच जाहीर झाली आहे. यामध्ये जिल्हा परिषदेचे दोन गट तर पंचायत समितीचे चार गण कमी झाल्यामुळे सदस्यांचा दमछाक होणार आहे.

येथे नव्याने तयार केलेल्या गट व गण रचनेत अनेक वेगवेगळ्या नवीन गावांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे बऱ्यापैकी जिल्हा परिषद गटात व पंचायत समिती गणात नव्याने समाविष्ट करणयात आलेली गावेच अनेक नेत्यांना एकदमच नवीन आहेत. कमी वेळेत त्या त्या गावातील मतदारापर्यंत पोहचुन मतदान आपल्या पदरात पाडून घेणे एक मोठे आव्हान असणार आहे. आता नव्याने झालेल्या जिल्हा परिषद गटात व पंचायत समिती गणात आरक्षण काय पडते याकडे सध्या ईच्छुक पुढाऱ्यांचे लक्ष लागले आहे. माळशिरस तालुक्यात सध्या जिल्हा परिषद गट दहीगाव,मांडवे, फोंडशिरस, संग्रामनगर, माळीनगर, बोरगाव, वेळापुर, निमगाव व पिलीव हे ९ जिल्हा परिषद गट तर या जिल्हा परिषद गटात प्रत्येकी दोन पंचायत समिती गण झाले आहेत. सध्या तालुक्यात महाराष्ट्रात सत्तेत असणारी भाजपाप्रणीत महायुती व विरोधी महाविकास आघाडी अशी लढत अपेक्षित असली तरीही.माळशिरस तालुक्यात भाजपा, तसेच विरोधी मोहिते पाटील गट व जानकर गट म्हणजे खासदार, व आमदार गट लोकसभा, विधानसभा निवडणूकीत एकत्र लढले होते तसेच लढणार का स्वतंत्रपणे लढणार हे अद्यापही गुलदस्त्यातच आहे. यामुळे तालुक्यात दुरंगी लढत होणार का तिरंगी लढत होणार याकडे तालुकावासियांचे लक्ष लागले आहे. भाजपने नुकताच माळशिरस येथे पदाधिकाऱ्यांचा संवाद मेळावा घेऊन निवडणुकीचे रणसिंग फुकंले आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# डंपरच्या धडकेत हगलूरच्या तरुणाचा मृत्यू

### मड्डी वस्ती येथे घडला अपघात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

शहरातील मड्डी वस्ती येथे डंपरच्या धडकेने दुचाकीवरील तरूणाचा मृत्यू झाला. श्रीकांत राजेंद्र गुंड (रा. हगलूर, ता. उत्तर सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. याबाबत अजुल शिवदास ढवळे (वय ३७, रा. हगलूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरजे ०८ जेए ६४९६ क्रमांकाच्या डंपरचा चालक प्रेमचंद भंवरलाल मेवाड (वय ५५, रा. राजस्थान) याच्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ जुलै रोजी सायंकाळी अजुल ढवळे यांचा मुलगा शिवतेज व श्रीकांत गुड असे दोघेजण एमएच १३ बीएक्स ४९५७ क्रमांकाच्या दुचाकीवरून सोलापूरमधून हगलूरकडे जात होते. त्यावेळी तुळजापूर पुलाखाली दुचाकी आली असता मड्डी वस्तीकडून तुळजापूरकडे जाणाऱ्या आरजे ०८




जेए ६४९६ क्रमांकाच्या डंपरचा चालक प्रेमचंद भंवरलाल मेवाड (वय ५५, रा. राजस्थान) यांनी त्याच्या ताब्यातील डंपर निष्काळजीपणे चालवून दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये अजुल ढवळे यांचा मुलगा शिवतेज हा गंभीर जखमी झाला तर श्रीकांत गूड हा गंभीर जखमी होऊन मरण पावला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साळुंखे पुढील तपास करीत आहेत.



## महत्वाचे...



### जिल्हा कोषागार अधिकारी वैभव राऊत, जात पडताळणी समितीच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

जिल्हा परिषदेमधील सर्व शिक्षा अभियान विभागाचे मुख्य लेखाधिकारी म्हणून प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत उत्तम प्रशासक असलेले वैभव राऊत यांना शासनाने सोलापूर जिल्हा कोषागार अधिकारी या महत्वाच्या पदावर पदोन्नती दिल्याने ते सोलापूर जिल्हा कोषागार कार्यालयात रुजू झाल्यानंतर तसेच सोलापूर जिल्हा जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा मनीषा मिसकर, जात पडताळणीचे उपायुक्त रविंद्र कदम (पाटील) आणि संशोधन अधिकारी म्हणुन संतोष जाधव यांचाही राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना जिल्हा शाखा सोलापूरच्या वतीने त्यांच्या कार्यालयात जाऊन सत्कार करण्यात आला. जिल्हा कोषागार कार्यालय कर्मचारी संघटनेचे माजी अध्यक्ष भिमराव लोखंडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली जिल्हा कोषागार कर्मचारी संघटना तसेच विविध शासकीय संघटना तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी श्रीकांतजी होसमनी, गणेश कांबळे, छबूताई काळे, दयानंद पवार, बाळकृष्ण पुतळे, राजाभाऊ सोनकांबळे, सी. एस.स्वामी, हुसेनबाशा मुजावर, आर.जे.शिंदे, शशिकांत भालेराव, भिमराव लोखंडे, सटवाजी होटकर, श्रीकांत होसमनी, प्रभाकर माने, आशुतोष नाटकर, सुनिल बोलबत्तीन, चंद्रकांत चलवादी, रघुनाथ बनसोडे आदी उपस्थित होते



### गुरुवर्य बुचडे जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**बार्शी, दि. १६ जुलै-**

येथील नव महाराष्ट्र विदया विकास मंडळाचे संस्थापक गुरुवर्य भगवान बसलिंगप्पा बुचडे यांची १०२ वी जयंती न्यू हायस्कूल व प्राथमिक विद्या मंदिरमध्ये साजरी करण्यात आली. यावेळी मार्च २०२५ मध्ये झालेल्या एस. एस. सी परीक्षेतील गुणवत्ताप्राप्त तसेच दोन्ही शाळेतील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना न. पा. शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी शाहू सतपाल यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. अनेक बक्षिसदात्यांनी जाहीर केलेली रोख रक्कम व ट्रॉफी तसेच संस्थेतफे ट्रॉफी असे पारितोषिकाचे स्वरुप होते. यावेळी संस्थेच्या न .पा. शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक सुरेश शिंदे, मंडळाच्या उपाध्यक्षा वनिता हलगणे, सचिव महादेव बुचडे, संचालक रावसाहेब मनगिरे, खजिनदार मोहन बुचडे, बुचडे सरांच्या कन्या सुवर्णा मजगे, मुख्याध्यापक दिपक उंबरदंड, मुख्याध्यापिका योगिता बेळे उपस्थित होते. मान्यवराच्या हस्ते श्री सरस्वती व बुचडे यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. प्रमुख पाहूणे शाहू सतपाल, संचालक रावसाहेब मनगिरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक खजिनदार मोहन बुचडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय संतोष खुडे यांनी करुन दिला. सूत्रसंचलन संजिवनी धाकपाडे व दिलीप महंकाळे यांनी मानले.



### मानव उत्थान सेवा समितीतर्फे मोफत रोग निदान व उपचार शिबीर

**पंढरपूर, दि. १६ जुलै-**

मानव उत्थान सेवा समिती पंढरपूर आश्रमाच्या वतीने गुरु पूजा पावन पर्व व मोफत रोग निदान व उपचार शिबीर कार्यक्रम मोठ्या भक्ती भावाने साजरा करण्यात आला आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत पूजापाठ, चालीसा, आरती करण्यात आले आहे. यानंतर १० ते १२ पर्यंत भजन व आध्यात्मिक सत्संग कार्यक्रम आयोजित करण्यात आले तसेच गुरुपौर्णिमा निमित्ताने नानव उत्थान सेवा समिती व पंढरपूर स्किन क्लीनिक यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत रोग निदान व उपचार शिबिर उपक्रम राबविण्यात आले आहे. यावेळी पंढरपूर स्किन क्लिनिकचे डॉ. नीरज दोडके व डॉ. प्रियंका दोडके यांनी तपासणी व औषध उपचार यासाठी विशेष सहकार्य लाभले या शिबिरात २०० ते २५० भक्तांनी याचा लाभ घेतला आहे. यावेळी साध्वी जगेश्वरी बाईजी डॉ. बोरावके मॅडम, डॉ. देवकते, डॉ. हेडगे, डॉ. हेडगे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दिलीप गोरे, गणेश राऊत, चंद्रमोहन चिप्पा, सुभाष निकम, शाम जाधव, गणेश शहा, महेश मोरे, ओमकार काटकर, अंबादास तवटम, विश्वतेज काटकर, तिरुपती संबारी आदींनी परिश्रम घेतले होते.

# पंढरपुरात आई अन् मुलाची सत्तुरने निर्घृण हत्या

**● आरोपींना शोधण्याचे पोलिसांसमोर आव्हान**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ जुलै-**

सतूरच्या साह्याने आई अन् मुलाची निघृण हत्या केल्याची घटना पंढरपुरातील नवीन कुंभार गल्लीत मंगळवारी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. या दुहेरी हत्येमुळे पंढरपूर हादरुन गेले आहे. दुहेरी खुनाचे कारण मात्र स्पष्ट झाले नाही. दरम्यान या घटनेतील आरोपींपर्यंत पोहचण्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे.


लखन जगताप


सुरेखा जगताप




याबाबत पंढरपूर शहर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, लखन संजय जगताप (वय २६, रा. दोघे नवीन कुंभार गल्ली) आणि त्याची आई सुरेखा संजय जगताप (वय ५५) असे खून झालेल्या माय-लेकाची नावे आहेत. दोघेही रक्ताच्या थारोळ्यात पडलेले होते. लखनच्या पाठीवर आणि डोक्यावर गंभीर स्वरुपाचे वार झाले आहेत तर सुरेखा जगताप यांच्या मानेवर व डोक्यावर वार करून त्यांना मारण्यात आले. दोघांच्या हत्येनंतर त्यांच्या घराला बाहेरुन कुलूप लावून आरोपी निघुन गेले होते. या हत्येबाबत कुठलीच ठोस अशी माहिती पुढे आली नाही. येथील उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, पोलिस निरीक्षक विश्वजित घोडके यांच्यासह पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करुन रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले.

दरम्यान फिर्याद देण्यासाठी वडील संजय जगताप हे रात्री १२.४० वाजता पोलिस ठाण्यात पोहोचले. रात्री दीड वाजता फॉरेन्सिक विभागाचे पथक कुंभार गल्ली परिसरातील जगताप यांच्या घरी हाताचे ठसे घेण्यासाठी दाखल झाले होते.

**कुरिअर कंपनीत लखन होता कामाला**

लखन हा कुरिअर कंपनीत काम करत होता तर त्याच्या वडिलांचा भाजीपाल्याचा व्यवसाय असल्याची माहिती मिळाली. या घटनेची पंढरपूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

**घटनेच्या वेळी मुलगा-आई घरात**

रात्री नऊच्या सुमारास लखन काम आटपून घरी आला. यानंतर घरी आई सुरेखा आणि लखन हे दोघेच होते. काही वेळाने पावणे दहा वाजता लखनचे वडील संजय जगताप हे आपल्या घरी पोहोचले. त्यावेळी त्यांना घरात मुलगा लखन आणि त्यांची पत्नी सुरेखा जगताप यांचे रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आले.

**सीसीटीव्ही फुटेजची तपासणी**

लखन आणि सुरेखा जगताप यांची नऊ-साडेनऊच्या दरम्यान हत्याचा झाल्याचा अंदाज आहे. यावरून आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच संबंधित घराच्या लोकेशनवरून फोन कॉल, सीडीआर, घराच्या आसपासच्या लोकांची चौकशी करत पोलिसांनी वेगवेगळ्या शक्यता गृहित धरुन तपासाची चक्रे गतिमान केली आहेत.

## बार्शी-लातूर रोडवर एसटीच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**बार्शी, दि. १६ जुलै-**

बार्शी-लातूर रोडवर जामगाव गॅस पंपाजवळ एसटी बसने दिलेल्या जोरदार धडकेत धोत्रे (ता. बार्शी) येथील ७५ वर्षीय वृद्धाचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही दुर्घटना आज बुधवार, दि. १६ जुलै रोजी दुपारी सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास घडली. मारुती भगवान आगवणे (वय ७५, रा. धोत्रे, ता. बार्शी) हे बार्शी येथे बाजारासाठी येत असताना त्यांची टीव्हीएस लुना (एमएच-१४ जेजे ३८२३) ही आटपाडी ते छत्रपती संभाजीनगर जाणाऱ्या एसटी बसने (एमएच-१०-टीडी-३८६६) पाठीमागून जोरात धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले व जागीच त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताबाबत नानासाहेब मारुती आगवणे (वय ४२, रा. धोत्रे) यांनी बार्शी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, वडील मारुती आगवणे बाजारासाठी घरुन बाहेर पडले होते. दरम्यान, दुपारी माहिती मिळताच ते गावातील काही नागरिकांसह अपघातस्थळी गेले असता वडील एसटी बस व लुनामध्ये अडकलेले दिसून आले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पोलिसांनी संबंधित एसटी बसचालक अमन रुस्तूम पीरजादे विरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडवल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीशी जबरदस्ती

**सोलापूर, दि. १६ जुलै-**

लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीशी तरूणाने जबरदस्तीने शरीरसंबंध केले. त्यातून ती मुलगी गर्भवती राहिल्यानंतर लग्न करण्यास नकार देणाऱ्या तरूणाविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीतेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन अब्जान इरफान बागवान (वय १९, रा. बागवान नगर, मशिदीच्या बाजूला, सोलापूर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एप्रिल २०२५ मध्ये यातील पिडीतेच्या घरात येऊन अब्जान बागवान याने मी तुझ्याशी लग्न करणार आहे असे सांगून लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी जवळीक साधून तिची इच्छा नसताना तिच्याशी जबरदस्तीने शरीरसंबंध केले. त्यातून पिडीता ही गरोदर राहिली असल्याने याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दुर्गा श्रीराम, पोपट कांबळे दोन वर्षासाठी तडीपार

**सोलापूर, दि. १६ जुलै -**

सराईत गुन्हेगार दुर्गा श्रीराम व पोपट कांबळे या दोघांना पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मंजूरीने सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून २ वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले.

दुर्गा कृष्णा श्रीराम (वय ४०, रा. प्लॉट नं. ४१२, क्षिरालिंग नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर) आणि विराट उर्फ पोपट हुसेनी कांबळे (वय २५, रा. रमाबाई नगर, बुधवार पेठ, सोलापूर) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत. विराट कांबळे याच्याविरुध्द सन २०२३, २०२४, २०२५ या कालावधीमध्ये मार्केट यार्ड परिसरात व्यापाऱ्यांच्या हालचालीवर लक्ष ठेऊन चोऱ्या करणे, शेतकऱ्यांना दमदाटी करून मारहाण करून जबरदस्तीने पैसे काढून घेणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे कांबळे यास तडीपार करण्याचा प्रस्ताव जोडभावी पेठ पोलिसांकडून पाठविण्यात आला होता. तर दुर्गा श्रीराम याच्याविरुध्द २०१६, २०१७, २०२१, २०२३ या कालावधीत नागरीकांना शिवीगाळ, मारहाण व दमदाटी करून गंभीर दुखापत करणे, घातक शस्त्राचा वापर करून दहशत निर्माण करणे, जबरदस्तीने पैसे काढून घेणे, घरफोडी करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत.


पोपट कांबळे


दुर्गा श्रीराम

त्याला तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव एमआयडीसी पोलिसांकडून पाठविण्यात आला होता. या दोन्ही प्रस्तावांना पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजूरी देत दोघांनाही दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीनंतर दुर्गा श्रीराम याला बेळगाव येथे तर पोपट कांबळे यास पुणे येथे सोडण्यात आले आहे.

## नगररचना योजनेमध्ये बाधित विस्थापित धारकांना अर्ज करण्यासंबंधी मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ जुलै-**

> यापूर्वी अर्ज केलेल्या विस्थापितांनी त्रुटी पत्रानुसार आवश्यक ती कागदपत्रे मुख्याधिकारी नगरपरिषद पंढरपूर यांच्याकडे सादर करण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

पंढरपूरमध्ये १९८२ मध्ये राबविण्यात आलेल्या नगररचना योजनेमध्ये बाधित झालेल्या विस्थापितधारकांना अर्ज करण्यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांनी मुदत वाढ दिल्याची माहिती उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली. दरम्यान येत्या २६ जुलैपर्यंत विस्थापितधारकांनी मुख्याधिकारी पंढरपूर नगरपरिषद यांच्याकडे अर्ज करावेत असे आवाहन त्यांनी केले आहे.

यावेळी इथापे यांनी सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय येथे १ व २ मे रोजी पंढरपूर शहरांत विकास आराखड्या बाबत बैठक घेतली. या बैठकीत १९८२ मध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात नगररचना योजना राबविण्यात आली होती पण विस्थापित नगर येथे बाधित मालमत्ता धारकांना प्लॉट मिळाले नाहीत. प्लॉटच्या खरेदी ही दिल्या नाहीत. अथवा आर्थिक मोबदला मिळाला नाही अशा तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. यास अनुसरून जिल्हाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली. दरम्यान नगररचना योजनेत ज्या बाधित मालमत्ताधारकांना लाभ मिळाला नाही अशांना अर्ज करणेस मुदत दिली होती. तथापि अजूनही कोणी विस्थापित अर्ज करावयाचे राहिले असतील त्यांना पुन्हा अर्ज करणेची संधी दिली आहे. त्यांनी २६ जुलै पर्यंत मुख्याधिकारी पंढरपूर नगरपरिषद यांच्याकडे अर्ज सादर करावेत. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करता येईल असे आवाहन इथापे यांनी केले आहे.

## शंकरनगर येथे महिलांसाठी श्रावणी सोहळा

**स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांची माहिती; पारंपारिक खेळाची पर्वणी**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ जुलै-**

महाशिवरात्री यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांच्यावतीने ट्रस्टचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार दि. २८ व मंगळवार दि. २९ जूलै रोजी शंकरनगर येथील शिवपार्वती मंदिर परिसरात सायंकाळी ४ ते ८ या वेळेत महिलांसाठी पारंपारीक खेळ, नागपंचमी सण सोहळ्याचे आयोजन केल्याची माहिती आयोजिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी दिली.

शंकरनगर येथे पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, ऋतुजादेवी मोहिते-पाटील, कृष्णप्रिया मोहिते-पाटील उपस्थित होते. स्वरूपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या, टीव्ही. मोबाईल याच्या पलीकडे जाऊन महिलांना पारंपारिक खेळाचा मनमुराद आनंद मिळावा. संस्कृती जोपासावी यासाठी सदरच्या सोहळ्याचे आयोजन



केले आहे. यामध्ये नागपंचमीचा झोका, फेर, फुगडी, झिम्मा, पिंगा, काठवठकणा यासह विवीध पारंपारिक खेळांचा समावेश आहे. याकरिता मंदिर परिसरात २५ हजार स्क्वेअर फुटाचा वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात येत असून यामध्ये सुमारे १५ हजार महिलांना पारंपारिक खेळ खेळता येणार आहेत. आता दरवर्षी नागपंचमीनिमित्त हा सोहळा होणार आहे. यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, युवा नेते सयाजीराजे मोहिते-पाटील यांचेही सहकार्य असल्याचे स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी सांगितले. कृष्णप्रिया मोहिते-पाटील म्हणाल्या, फुगडी, झोका, फेर आदी पारंपारिक खेळ लोप पावत असताना या सोहळ्यामुळे मुलींनाही महाराष्ट्राची परंपरा व संस्कृती माहिती होऊ लागली आहे.

# प्रशासनाच्या अचूक नियोजनामुळे वारकऱ्यांना मिळाले शुध्द पाणी : धनशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जुलै-**

पालखी सोहळ्याबरोबर मार्गावरून येणाऱ्या वारकऱ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी पंधरा दिवस आधीपासून तीनवेळा पाणी स्त्रोतांची टेस्ट केली जाते, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी दिली.

आषाढीवारी सोहळा काळात पंढरपूरकडे येणाऱ्या मानाच्या पालख्यांसोबत असलेल्या वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे आहे. वारकऱ्यांची गर्दी असताना व रस्त्यावर मोठे ट्रॅफिक असताना पाण्याचे टँकर वाहतूक करून वारकऱ्यांना येण्याचे शुद्ध पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी पाणीपुरवठा विभागाने यशस्वी पार पाडली आहे. कार्यकारी अभियंता धनशेट्टी म्हणाले की ,जिल्हा प्रशासनाकडून मानाच्या दोन्ही पालखी सोहळ्यासाठी यंदा




२३४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला. यासाठी टँकरमध्ये पाणी भरण्यासाठी ११२ फिडिंग सेंटर व देखरेख ठेवण्यासाठी १४२ कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये पालखी मार्गावरील विहिरी, बोअर अधिग्रहण करण्यात आले होते. ज्या ठिकाणावरून टँकर मध्ये पिण्याचे पाणी भरले जाणार आहे त्या ठिकाणचे पाणी पिण्यायोग्य आहे का? याची १५ दिवस अगोदर तीन वेळा तपासणी केली जाते. त्यानंतर प्रत्यक्ष टँकर मध्ये पाणी भरताना टीशियल पावडर व मेडिक्लोरचा उपयोग केला जातो. पालखी सोहळा विसावा व मुक्कामाच्या ठिकाणी येण्याआधी टँकर तयार ठेवले जातात. रिंगण सोहळ्यावेळी मोठी गर्दी होते. गर्दीतून टँकर काढून ठरलेल्या ठिकाणी पोहोच करणे जबाबदारीचे काम असते. पालखी सोहळयाबरोबर पुण्याहूनही काही टँकर आलेले असतात. टँकर गर्दीतून मार्ग काढत जात असताना वाहतूक पोलिसांचेही मोठे सहकार्य लाभते. शुद्ध पाणीपुरवठ्यावर देखरेख करण्यासाठी आरोग्य विभागाचे कर्मचारीही काम करीत असतात. पंढरपूर विभागीय कार्यालयाच्या माध्यमातून ११ उप अभियंते टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी लक्ष ठेवून असतात होते . दोन्ही पालख्या वाखरीतळावर मुक्कामाला आल्यानंतर मोठी गर्दी होते. या गर्दीतून पाण्याचे टँकर बाहेर काढण्यासाठी नियोजन करावे लागते. एमआयटी कॉलेज ते पालखीतळ व कराड-सातारा रोडवर या काळात पिण्याचे टँकर उभे केले जातात.

**टँकर स्पॉट फिक्स करणार**

पालखी मार्गावर प्रत्येक यंत्रणेचे ठिकाण ठरलेले आहे. त्यामुळे वारकऱ्यांना सुविधा सहजपणे मिळतात. पाण्याचे टँकर रिकामे होईल तसे बदलावे लागतात. यासाठी टँकरची जागा फिक्स करणे गरजेचे ठरते. त्यामुळे आता पुढील पालखी सोहळ्यासाठी टँकरच्या जागा फिक्स करण्यासाठी त्या ठिकाणी फलक लावण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अभियंता धनशेट्टी यांनी सांगितले.

**दहा पालख्यांची व्यवस्था**

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला जिल्ह्यात विविध ठिकाणाहून प्रवेशित होणाऱ्या मानाच्या दहा पालख्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यात आले. यामध्ये २०० सरकारी तर खाजगी ३४ टँकर उपलब्ध करण्यात आले होते. संपूर्ण पाणीपुरवठा सुरळीत पार पाडण्यासाठी उपकार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, सहाय्यक प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, रणजीत घोडके, रवींद्र करजगीकर, प्रवीण चव्हाण यांनी परिश्रम घेतले.